फेब्रुवारी २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

बोला मराठी...साहित्य मराठी...

अभिजात मराठी

ऐतिहासिक क्षण...

७३व्या प्रजासत्ताकदिनी दिल्लीतील ऐतिहासिक राजपथावरील पथसंचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाने शानदार सादरीकरण केले. या वर्षी पहिल्यांदा केंद्र सरकारने जनतेच्या मतदानाद्वारे एका उत्कृष्ट चित्ररथाची निवड करण्यासाठी लोकप्रिय निवड श्रेणी सुरू केली. या श्रेणीत सर्वोत्तम ठरत महाराष्ट्राने या श्रेणीतील पहिलावहिला पुरस्कार पटकावून इतिहास रचला आहे. राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने या चित्ररथाला ऑनलाईन मतदान करण्यासंदर्भात आवाहन करण्यासाठी सर्व समाजमाध्यमांच्याद्वारे विशेष मोहीम राबवली होती. चित्ररथाच्या दर्शनी भागातील 'ब्ल्यू मॉरमॉन', राज्यवृक्ष 'आंबा', राज्यफूल 'ताम्हण'चे रंगीत गुच्छ, या फुलांवरील छोट्या आकर्षक फुलपाखरांच्या लोभस प्रतिकृती, 'हरियाल' पक्षाची प्रतिकृती, 'शेकरू' हा राज्यप्राणी तसेच युनेस्कोच्या सूचीमध्ये समावेश असलेले 'कास पठार' दर्शवण्यात आले आहे. तसेच चित्ररथावरील माळढोक पक्षी, खेकडा, मासा, वाघ, आंबोली झरा, फ्लेमिंगो, गिधाड, घुबड पक्ष्यांच्या प्रतिकृतींनीही उपस्थितांची मनं जिंकली.

६ मराठी अभिजातच

साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २००० वर्षांचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ रूप व आजचे रूप यांचे नाते असणे हे केंद्र शासनाने एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निश्चित केलेले चारही निकष मराठी सहज पूर्ण करते. आपण तसे सिद्धही केले आहे. आता गरज आहे ती लोकअभियानाची.

९ बोलतो...लिहतोही मराठी!

'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी' असे अभिमानाने बोलावे अशी मराठी भाषेची थोरवी आहे. अडीच हजार वर्षांची परंपरा असलेली ही आपली माय मराठी. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याला आता यश येत आहे. त्याचबरोबर 'अभिजात' भाषा दर्जाविषयी जनजागृतीसाठी जनअभियान राबवले जात आहे.

११ शासकीय प्रयोजनात मराठी

प्रशासकीय कामकाज मराठीतून करणे आवश्यक आहे, हे आपल्याला माहीत आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने शासकीय प्रयोजनांमध्ये मराठीचा वापर कसा सुरू झाला आणि आता तो कोणत्या टप्प्यात आहे, हे सर्व मराठीजनांना माहिती होणे आवश्यक आहे.

१३ 'मराठी'साठी सर्वकाही

कोणतीही भाषा समृद्ध होत असते ती त्या भाषेत निर्माण होणाऱ्या साहित्यावर. साहित्य हे केवळ भाषेचा अलंकार नसून ते संस्कृती, परंपरा आणि लोकजीवनातील घडामोडींचे वाहक असते. या साहित्याचे भरणपोषण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करत आहे. भाषा ही संस्कृतीची वाहक असते त्यामुळे तिच्या जतनासाठी मंडळ विविध उपक्रम राबवत असते.

१५ राजधानी दिल्लीतील मराठी

अर्थकारणात, कृषिक्षेत्रात, आद्योगिक क्षेत्रात, शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्राने देशात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे आणि आपण सतत प्रथम क्रमांकावर असतो, ही गोष्ट नोंद करण्यासारखी आहे. पण सांस्कृतिक क्षेत्रात, भाषा आणि साहित्यविषयक घडामोडीत दिल्लीच्या या झंझावाती वातावरणात मराठी माणूस व भाषा मागे पडली ही वस्तुस्थिती आहे.

२२ समग्र सयाजीराव महाराज

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्य, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांत मोठ्या सुधारणा केल्या. या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या कार्याची ओळख सर्वांना व्हावी यासाठी राज्य शासनाच्या 'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती'मार्फत गेल्या तीन वर्षांत ६२ ग्रथांची निर्मिती केली.

२९ महिलांसाठी 'शक्ती' कवच

महिलांना सन्मानाने जगण्यासाठी आणि त्यांना घरात व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. आता तर शक्ती विधेयकासारख्या महत्त्वाच्या पावलामुळे महिला सुरक्षेला बळही मिळेल.

३१ कोविड-१९ चे उत्परिवर्तन

कोविड-१९ या विषाणूने गेली दोन वर्षे अवघे जग मेटाकुटीला आले आहे. त्यातच त्याची अल्फा, बीटा, गॅमा, डेल्टा, ओमायक्रॉन अशी विविध रूपे म्हणजेच उत्परिवर्तन (चींरींळेप) हे सर्वांची चिंता वाढवत आले आहे. या विषाणुजन्य आजारावर विशिष्ट औषध सध्या तरी उपलब्ध नसल्याने कोविड अनुरूप वर्तन हाच त्यावर उपाय आहे. जाणून घेऊ या, या विषाणूच्या उत्परिवर्तनाविषयी...

मराठी अभिजातच	६
बोलतो...लिहतोही मराठी!	९
शासकीय प्रयोजनात मराठी	११
'मराठी'साठी सर्वकाही	१३
राजधानी दिल्लीतील मराठी	१५
वारसा हस्तलिखितांचा	१७
पोषणकर्ते साहित्य	१९
समग्र सयाजीराव महाराज	२२
ऐतिहासिक अधिवेशन...	२६
महिलांसाठी 'शक्ती' कवच	२९
कोविड-१९ चे उत्परिवर्तन	३१
कोविड : तथ्य व खबरदारी	३४
स्वरसम्राज्ञीला आदरांजली	३५
पाऊल पडते पुढे	३७
मंत्रिमंडळात ठरले	४९
वसा पशुसंवर्धनाचा	५४
समाजनिर्मितीची रूपरेषा	५६

वर्ष ७३ वे | अंक ७ | फेब्रुवारी २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

साहित्य अकादमीचे पुरस्कार

साहित्य अकादमीने २०२१ या वर्षाच्या पुरस्कारांची घोषणा केली असून यात प्रसिद्ध लेखक सुधीर रसाळ, कवी किशोर कदम (सौमित्र), युवा लेखक प्रणव सखदेव व बालसाहित्यकार किरण गुरव यांच्या साहित्यकृतींचा समावेश आहे.

साहित्य अकादमीने २२ भाषांतील पुरस्कार प्राप्त साहित्यकांची घोषणा केली. यात मराठीत युवा लेखक प्रणव सखदेव यांच्या 'काळे करडे स्ट्रोक्स' या कादंबरीला युवा लेखक पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय बालसाहित्यामध्ये किरण गुरव यांच्या 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' व तसेच त्यांना 'जुगाड' या कादंबरीलासुद्धा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

ज्येष्ठ समीक्षक व लेखक डॉ. सुधीर रसाळ यांच्या 'मर्ढेकरांची कविता : जीवनाचे अंतस्वरूप' या समीक्षा ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय हरीश्चंद्र थोरात यांच्या 'मूल्यभानाची सामग्री' या समीक्षाग्रंथाला, बालाजी सुतार यांच्या 'दोन शेतकऱ्यांच्या सांध्यावरच्या नोंदी' या लघुकथेची साहित्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे. रमेश वानखेडे यांच्या 'सायबर संस्कृती' या निबंधाला, तर प्रसिद्ध कवी किशोर कदम (सौमित्र) यांच्या 'बाऊल' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. जी. के. ऐनापुरे यांच्या 'चिंचपोकळी' कथासंग्रहाला, ज्येष्ठ लेखक व माजी खासदार जनार्दन वाघमारे यांच्या 'यमुनेचे पाणी' या आत्मचरित्राला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

साहित्य अकादेमी

प्रसिद्ध लेखिका सोनाली नवांगुळ यांना मराठी भाषेसाठी तर ख्यातनाम लेखिका डॉ. मंजुषा कुलकर्णी यांना संस्कृत भाषेकरिता साहित्य अकादमीचे मानाचे अनुवाद पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे कार्य गतीने सुरू

देशाला मराठी भाषा व साहित्याचा अभिमान आहे, या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारकडून गतीने कार्य होत असून मराठीला लवकरच अभिजात भाषेचा दर्जा देण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी संसदेत दिली.

राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या सत्रात उपस्थित विषयावर बोलताना श्री. मेघवाल यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेच्या दर्जाबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीविषयी माहिती दिली. महाराष्ट्र शासनाचा प्रस्ताव हा सांस्कृतिक मंत्रालयाकडून भाषा तज्ज्ञांच्या समितीकडे पाठवण्यात आला. या समितीचा अहवाल साहित्य अकादमीकडे गेला व तेथे काही त्रुटींची पूर्तता झाली आहे. सध्या, हा प्रस्ताव आंतरमंत्रालय स्तरावर विचाराधीन आहे. केंद्रीय गृह मंत्रालय, सांस्कृतिक मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आदी मंत्रालयांतर्गत सध्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत सकारात्मक चर्चा सुरू आहे असे, श्री. मेघवाल यांनी सांगितले.

खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पूरक प्रश्नाद्वारे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आणि रजनीताई पाटील यांनी चर्चेत सहभाग घेतला.

मराठी संस्कृतिवाहक

'संस्कृत भाषा देवे केली, प्राकृत काय चोरापासून झाली?' संत एकनाथ महाराजांनी १६ व्या शतकात उपस्थित केलेला हा प्रश्न संस्कृतला कमीपणा आणण्यासाठी नाही तर मराठी संस्कृतइतकी किंबहुना संस्कृतपेक्षा सरस भाषा आहे आणि तिचा सन्मान झालाच पाहिजे, या संदर्भाने होता. मराठी केवळ संवादाची भाषा नाही, तर ती १२ कोटींहून अधिक लोकांची संस्कृतिवाहक आणि आपल्या उज्ज्वल परंपरांशी जोडणारी नाळ आहे.

मराठी भाषा अभिजात आहे, याबद्दल मराठीजनांत कोणतीही शंका नाही. राज्य शासन मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी प्रयत्नशील असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे विशेष आग्रही आहेत. मराठी भाषेची मुळे शोधली की ती किती प्राचीन आहे, याची प्रचिती येते. संत वाङ्मयाने मराठी सशक्त आणि ज्ञानभाषा केली आहे. येथील साहित्यिकांनी जगभरातील साहित्यप्रकारांना मराठीच्या अंगणात आणून तिचे रंग अधिक गहिरे केले. मराठी कोणत्याही भाषेच्या तुलनेत कधीच कमी नव्हती. जे-जे इतरांमधील चांगले ते-ते स्वीकारत आपली ओळख अधिक स्पष्ट करत मराठी समृद्ध आणि प्रवाही होत राहिली आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठीच्या विकासात राज्य शासनाने केलेल्या विविध प्रयत्नांमुळे आज मराठी महाराष्ट्राची केवळ राजभाषा नाही, तर ती लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारीही आहे. मराठी लोकव्यवहाराची भाषा असली तरी ती अधिक सशक्त होण्यासाठी आणि नव्या पिढीने ती आत्मसात करण्यासाठी राज्य शासनाने पहिलीपासून सर्व शाळांना मराठी सक्तीची केली आहे. नवलेखकांना प्रोत्साहन, साहित्य संमेलनाला अनुदान, मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन अशा विविध उपक्रमांतून राज्य शासन मराठीच्या विकासाला आपले पाठबळ देत आहे.

संपूर्ण जग आज एका संक्रमणकाळातून जात आहे. वैश्विकीकरणाने संस्कृतीचे आदानप्रदान खूप वेगात होत आहे. यात आपली संस्कृती अधिक जोपासली जावी, तिचा विकास व्हावा आणि जगाने ती स्वीकारली जावी, यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. जगभरात पसरलेली बृहन्महाराष्ट्र मंडळे हे काम आतापर्यंत करत आली आहेतच पण त्यातील सुसूत्रता अधिक घट्ट होत आहे.

कोणत्याही भाषेच्या विकासाचे परिमाण शोधायचे असतील तर ती भाषा समाजाच्या सर्व व्यवहार क्षेत्रांत किती प्रमाणात वापरली जाते यावर अवलंबून आहे. याचाच अर्थ भाषेच्या विकासात तिच्या वापरावर भर देणे आवश्यक आहे. राज्य शासनाने मराठी भाषेच्या वापराचे बंधन घातले असले तरी सर्वसामान्यांनीही मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि तिच्या संवर्धनासाठी सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात तिचा वापर अधिकाधिक करणे आवश्यक आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी मराठी भाषेचा परीघ विस्तारला जावा, त्यातून माहिती आणि ज्ञानाचे पाट प्रवाहित व्हावेत, यासाठी पर्यायी शब्दांच्या निर्मितीसह तिच्या वापराचा आग्रह धरला, तर हा भाषाव्यवहार अधिक जोमाने होईल, यात शंका नाही. समाजाच्या आर्थिक विकासाला जसे प्रोत्साहन जरूरी असते तसेच प्रोत्साहन भाषा विकासालाही आवश्यक असते. सध्याचे राज्य शासन भाषा विकासात महत्त्वाचे कार्य करत असून त्याला समाजातील सर्व स्तरातून पाठिंबा मिळाल्यास अभिजात भाषेचा दर्जा तर मराठी मिळवेलच, पण अटकेपार झेंडा रोवणाऱ्या महाराष्ट्राच्या मराठी भाषेची दखल वैश्विक पातळीवर महत्त्वाची भाषा म्हणून घेतली जाईल, यात शंका नाही.

दीपक कपूर
(मुख्य संपादक)

साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २००० वर्षांचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ रूप व आजचे रूप यांचे नाते असणे हे केंद्र शासनाने एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निश्चित केलेले चारही निकष मराठी सहज पूर्ण करते. आपण तसे सिद्धही केले आहे. आता गरज आहे ती लोकअभियानाची.

मराठी अभिजातच

भूषण गगराणी

मराठी ही लोकभाषा, राजभाषा, ज्ञानभाषा आणि महानुभावांची धर्मभाषा आहे. कोणताही माणूस मातृभाषेतून विचार करतो. मातृभाषा ही एक प्रकारे माणसाच्या अस्तित्वाला विचारांचा प्राणवायू पुरवत असते. ते त्याचे ओळखपत्र असते. मातृभाषा ही माणसाची अस्मिता आणि अस्तित्वखूण असते. साहित्याची श्रेष्ठता, भाषेच्या वयाचे १५०० ते २००० वर्षांचे लिखित पुरावे, भाषेची स्वतंत्रता आणि भाषेचे मूळ रूप व आजचे रूप यांचे नाते असणे हे केंद्र शासनाने एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निश्चित केलेले चारही निकष मराठी सहज पूर्ण करते. आपण तसे सिद्धही केले आहे. आता गरज आहे ती लोक अभियानाची. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी गेली चौदा वर्षे आपण अहोरात्र झटत आहोत. डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेला अभिजात मराठी भाषेचा अहवाल केंद्र सरकारने नेमलेल्या भाषातज्ज्ञांनी सर्वानुमते मंजूर केला, त्याला ७ वर्षे उलटून गेली.

मराठी जगणारच

अभिजात मराठी भाषा म्हणजे श्रेष्ठ मराठी भाषा. ज्या भाषेतले साहित्य श्रेष्ठ दर्जाचे असते तिला अभिजात दर्जा मिळतो. मराठी 'अमृतातेंही पैजां जिंकणारी असल्याची' ग्वाही संत ज्ञानेश्वर देऊन गेलेत. जगातील सर्व भाषा मेल्या आणि अवघ्या चार जगल्या तरी मराठी जगणार आहे. स्वत:चे राज्य आणि श्रेष्ठ साहित्य असलेली मराठी ही जगातली चौथ्या क्रमांकाची राज्यभाषा आहे. मराठीतले कोशवाङ्मय तर जगातले दुसऱ्या क्रमांकाचे कोशवाङ्मय आहे.

१७ वर्षांपूर्वी तमीळ भाषेला अभिजात दर्जा दिला गेला. त्यानंतर संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि उडिया यांनाही तो मिळाला. मराठीला हा दर्जा द्यावा अशी साहित्य अकादमीने एकमताने केलेली लेखी शिफारस भारत सरकारने गेली ७ वर्ष दुर्लक्षित केली आहे. त्यामुळे मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, शिक्षण हे सारेच विषय मागे गेले आहेत. मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ, मराठीचे २५ वर्षांचे धोरण, सांस्कृतिक धोरण आणि अभिजात दर्जा या बाबतीत तडजोड होता कामा नये.

समृद्ध मराठी

१९०७ मध्ये ग्रियर्सनने भारतीय भाषांचे सखोल सर्वेक्षण केले. तो म्हणतो की, जी भाषा रोजगार देते तिच जगते. जी भाषा रोजगारक्षम नसते ती मरते, नष्ट होते. बोलीभाषांची विविधता हे मराठीचे खरे वैभव असून मराठीच्या ५२ बोलीभाषा आहेत. त्याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे. जिला जास्त ओढे ती नदी मोठी, याच न्यायाने मराठीला रसद पुरवणाऱ्या या सर्व बोली महत्त्वाच्या आहेत. या सर्वच

बोलीभाषांतील साहित्य खूप सकस आहे. बहिणाबाई, उद्धव शेळके, शांता शेळके, भुजंग मेश्राम, सदानंद देशमुख, व्यंकटेश माडगूळकर, राम नगरकर, आनंद विंगकर, राजन गवस, मच्छिंद्र कांबळी, प्र.ई. सोनकांबळे, बा. भ. बोरकर, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ आदींमुळेच मराठी समृद्ध झालेली आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई, सावता महाराज, एकनाथ, तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, जी. ए. कुलकर्णी, बा. सी. मर्ढेकर, भालचंद्र नेमाडे, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, भाऊ पाध्ये, अरुण कोलटकर, महेश एलकुंचवार, रंगनाथ पठारे अशा अनेकांमुळे मराठी समृद्ध झालेली आहे. दलित साहित्याने मराठीला सामाजिक दस्तऐवज देऊन तिला खूप श्रीमंत केलेले आहे. इरावती कर्वे, नरहर कुरुंदकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, राजारामशास्त्री भागवत, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, त्र्यंबक शंकर शेजवलकर, गणेश देवी, रामचंद्र चिंतामण ढेरे, सदानंद मोरे, दिलीप चित्रे, कमल देसाई, मालती बेडेकर, शरद पाटील, अरुण साधू, गंगाधर गाडगीळ, आ. ह. साळुंखे यांचे लेखन श्रेष्ठ प्रतीचे आहे. तसेच शाहीर होनाजी बाळा, विष्णुशास्त्री चिपळूणकर, ह. ना. आपटे, वि. दा. सावरकर, आचार्य अत्रे, चिं. वि. जोशी, वि. का. राजवाडे, दया पवार, ऊर्मिला पवार यांचाही उल्लेख आपणास करावयास हवा.

एक होता कावळा नि एक होती चिमणी.. ही प्रत्येक मराठी घरात आजही सांगितली जाणारी गोष्ट आहे. ती पहिल्यांदा ग्रंथात लिहिली गेली ८०० वर्षांपूर्वी. लीळाचरित्रात धानाई नावाच्या हट्टी मुलीला श्रीचक्रधरांनी ती सांगितली असली तरी ती त्याआधी हजार-बाराशे वर्षे मराठी लोकजीवनात सांगितली जात होती. ती विलक्षण लोकप्रिय होती.

खरी जिवंत भाषा

महाराष्ट्री प्राकृत किंवा महारठ्ठी या नावाने दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी प्रचलित, लोकप्रिय व मान्यताप्राप्त असलेली भाषा ही संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे म. म. राजारामशास्त्री भागवत (विदुषी दुर्गा भागवत यांचे आजोबा) यांनी १८८५ मध्येच दाखवून दिले होते. 'मराठ्यासंबंधी चार उद्‌गार' हा त्यांचा ग्रंथ जिज्ञासूंनी अवश्य वाचावा. त्यांचा 'मराठीची विचिकित्सा' हा ग्रंथही महत्त्वाचा आहे.

राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना दुर्गा भागवतांनी म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे. मराठी संस्कृतोद्‌भव नाही. ती संस्कृतपेक्षा जुनी भाषा आहे. नात्याने ती संस्कृतची मावशी आहे. १९२७ मध्ये ज्ञानकोशकार केतकर यांनी प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास दोन खंडांत लिहिला. त्यात त्यांनी मराठीचे वय किमान अडीच हजार वर्ष असल्याचे पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. १९३२ मध्ये पांगारकरांनी



दाखवून दिलेले आहे की, महाराष्ट्री, महारठ्ठी, मऱ्हाठी, मराठी या वेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन रूपे आहेत.

गाथा सप्तशतीतील मराठी महाराष्ट्री प्राकृत या नावाने ओळखले गेली. हरिभद्र, भद्रबाहू, उद्योतन सुरी आदीचे लेखन आणि चक्रधर, चोखा, चोंभा, बखरकार ते फुले-आंबेडकर, अण्णाभाऊ, लोकहितवादी, आगरकर, रानडे, टिळक, विष्णुभट गोडसे, लक्ष्मीबाई टिळक, विश्राम बेडेकर, हमीद दलवाई, फादर स्टिफन्स यांच्या साहित्याची महत्ता आणि त्यांचे जैविक नाते महत्त्वाचे आहे.

मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ आहे, गाहा सत्तसई (गाथा सप्तशती). गाथा म्हणजे कविता. सातशे लोककवितांचा संग्रह म्हणजे हा ग्रंथ होय. पैठणच्या हाल या सातवाहन राजाने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी पन्नास कवींच्या या कविता संकलित केल्या. सातवाहनांची राजभाषा मराठी असल्याने त्यांचे जिथे-जिथे राज्य होते तिथे-तिथे या ग्रंथाची हस्तलिखिते मिळालेली आहेत. सातवाहनांचे संपूर्ण भारतावर तर राज्य होतेच. शिवाय पार अफगाणिस्तानपर्यंत राजभाषा मराठीची पताका फडकत होती.

संगम साहित्यात मराठी

तमीळ भाषेला अभिजात दर्जा मिळण्यात 'संगम साहित्याचा' मोठा वाटा आहे. हे साहित्य २३०० ते २६०० वर्ष जुने आहे. कावेरी नदीवर धरण बांधले जात असल्याचा प्रसंग त्यात आला आहे. या धरणाच्या कामासाठी जगभरातून तज्ज्ञ मागवण्यात आलेले होते. महाराष्ट्रातील मराठी गवंडी मोठे कुशल असल्याचे वर्णन त्यात आले आहे. ते आपापसात मराठीतून बोलत असत.

इसवीसनाच्या दुसऱ्या शतकात वररुचीने 'प्राकृतप्रकाश' हा व्याकरण ग्रंथ लिहिला. त्यात त्याने शौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री या प्राकृत भाषांचे व्याकरण सिद्ध केले. आधीचे सगळे नियम सांगून झाल्यानंतर शेवटचा नियम सांगताना तो म्हणतो, शेषं महाराष्ट्रीवत. यावरून देशाच्या वेगवेगळ्या भागात प्रचलित असलेल्या सगळ्या भाषांना मराठीचे नियम लागू पडत होते. यातून मराठीची प्रतिष्ठा, मान्यता आणि श्रेष्ठता स्पष्ट होते.

संस्कृत महाकवी कालिदास आणि शूद्रक यांच्या 'शाकुंतल' आणि 'मृच्छकटिक' या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठीत आहेत. महाभारत या जगप्रसिद्ध महाकाव्यात अनेक मराठी शब्द आलेले आहेत. यज्ञाच्या वेळी पंडितांना मराठीत बोलायला बंदी घालण्यात आल्याची नोंद श्री. भागवत यांनी दाखवून दिलेली आहे. संस्कृती ही धर्मभाषा असली तरी हे पंडित खासगीत मराठीत बोलत असत हे यातून उघड होते. संत एकनाथांनी संस्कृत वाणी देवे केली मग प्राकृत काय चोरापासोनी झाली? असे संतप्त उद्‌गार काढले होते. 'विंचू चावला... या भारुडाची मराठी आजची अस्सल मराठी असूनही ते तिला प्राकृत म्हणतात कारण महाराष्ट्री प्राकृत हीच मराठी आहे.

रघुनाथराव गोडबोले यांनी १८६३ साली प्रकाशित केलेल्या मराठी शब्दकोशाला 'महाराष्ट्रीय भाषेचा कोश' म्हटले आहे, ते यामुळेच.

जुन्या काळात धर्मग्रंथांची भाषा होती संस्कृत, पण तिचा जन्म झाला वैदिक भाषेपासून आणि वैदिकची आई होती वैदिकपूर्व बोली भाषा. हॉर्वर्ड विद्यापीठाचे डॉ. मायकेल विट्झेल यांनी आपल्या 'ट्रेसिंग दि वैदिक डायलेक्ट्स' या ग्रंथात हे दाखवून दिले आहे. तेव्हा संस्कृत ही सर्व भाषांची जननी होती हा प्रचार खरा नाही. पाणिनीने जेव्हा या भाषेचे व्याकरण लिहिले तेव्हा तो तिला 'छंद' भाषा म्हणतो.

मूल लहान असताना, रांगत असताना पीएच.डी. करू शकेल का? नाही. मग कोणतीही भाषा बालवयातच ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र आणि विवेकसिंधू यांसारखे जागतिक दर्जाचे श्रेष्ठ ग्रंथ कसे प्रसवू शकेल? आठशे वर्षांपूर्वी मराठीत हे ग्रंथ लिहिले गेले तेव्हा मराठी बालभाषा नव्हती, तर ती एक परिपक्व झालेली समृद्ध भाषा होती. संत ज्ञानेश्वर मराठीची गोडी अमृताहूनही जास्त असल्याचे प्रतिपादन कोणाला उद्देशून करत होते? संस्कृतलाच ना? ज्ञाननिर्मिती, साहित्य, विचार, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांची त्या आधीची फार मोठी परंपरा मराठीला होती. गाथा सप्तशती, पादलिप्त, हरिभद्राची 'समरादित्याची कथा', उद्योतन सुरीची कुवलयमाला, चक्रधरांचे लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथांची भारुडे, माझा प्रवास, गावगाडा, धग, कोसला, बनगरवाडी, बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, गोलपिठा, शांतता कोर्ट चालू आहे हे ग्रंथ इतके चिरेबंदी आहेत की, मराठीची श्रेष्ठता स्वयंस्पष्ट आहे.

आम्ही आग्रही

आम्ही सर्वच भाषांचा आदर करतो. ज्यांना कोणाला इंग्रजी, हिंदी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगू, सिंधी, उर्दू, बंगाली अशा कोणत्याही भाषेच्या माध्यमातून कोणत्याही बोर्डाच्या शाळेतून शिकायचे वा बोलायचे, लिहायचे असेल त्यांना आम्ही अडवत नाही. कारण आमचा इतर कोणत्याही भाषेला विरोध नाही. मराठीसाठी मात्र आम्ही आग्रही आहोत. आपण दक्षिण

भारतात गेलो की तिथली सगळी माणसे त्यांच्या मातृभाषेबद्दल आग्रही असलेली दिसतात. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम हे सगळेच लोक आपापल्या मातृभाषेचा अभिमान बाळगतात. या बहुतेक सर्व राज्यांनी शिक्षण, साहित्य, संस्कृती, कला आदी क्षेत्रात फार मोठी भरारी घेतलेली आहे. मानव विकास निर्देशांकात ही राज्ये पुढे आहेत. हे सारे आपले शेजारी असून आपण त्यांच्याकडून मातृभाषाप्रेम शिकायला हवे. तिथल्या सरकारांनी स्थानिक भाषेच्या सक्तीबाबत अतिशय कडक पावले उचललेली आहेत.

मराठीला अभिजात दर्जा मिळणे म्हणजे मराठीच्या जागतिक प्रतिष्ठेवर शिक्कामोर्तब होणे. त्यामुळे मराठी माणसाचा न्यूनगंड कमी होईल. मराठी शिकवण्याची सोय देशातील ४५० विद्यापीठांमध्ये होईल. मराठीच्या समग्र विकासासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी अनुदान मिळेल. मराठी शाळा, शिक्षण, शिक्षक यांची दर्जावाढ; वाचन संस्कृती वाढणे; ग्रंथालये संवर्धित केली जाणे; मराठी पुस्तके स्वस्तात मिळणे; मराठी मुलामुलींना अधिकाधिक रोजगार मिळणे या सगळ्यामुळे मराठीचा दर्जा आणखी सुधारण्यास खूप मदत होईल. विशेषतः बृहन्महाराष्ट्रात मराठीच्या संवर्धनाला यातून अर्थबळ पुरवता येईल. मराठीचे गोमटे व्हायला अभिजात दर्जा गती देईल. त्यामुळे मराठीचा हा सन्मान महत्त्वाचा आहे.

जनचळवळ

मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना समक्ष भेटून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत मागणी केलेली आहे. नाशिक येथे झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषा विभागाच्या वतीने अभिजात मराठीची माहिती देणारे देखणे प्रदर्शन उभे केले होते. त्याला हजारो रसिकांनी भेट देऊन मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राष्ट्रपती महोदयांना वैयक्तिक पत्रांद्वारे विनंती केली. 'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' ह्या लघुपटाला हजारो मराठीजनांनी उचलून धरले. प्रदर्शनास भेट देणाऱ्या मराठी जनांनी आपापल्या भ्रमणध्वनीवरून क्यूआर कोड स्कॅन करून मराठीला अभिजात दर्जा मिळावा, या विषयावरील याचिकेवर सह्या केलेल्या आहेत. महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन, २०२२ दरम्यान विधानमंडळाच्या प्रवेशद्वारासमोर २२ डिसेंबर २०२१ ते २८ डिसेंबर २०२१ या कालावधीत अभिजात मराठी भाषा दालन उभारण्यात आले. तसेच 'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' या लघुपटाचे सादरीकरणही करण्यात आले. या कालावधीतदेखील रसिकांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राष्ट्रपती महोदयांना वैयक्तिक पत्रांद्वारे विनंती केली आहे. २९ डिसेंबर २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधील अभिजात मराठी भाषेचे हे दालन सर्वांसाठी खुले करण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०२२ वर्षाची दिनदर्शिका अभिजात मराठी भाषा या विषयाच्या अनुषंगाने तयार करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेद्वारे अभिजात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर मिळावा याकरिता सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग

'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी' असे अभिमानाने बोलावे अशी मराठी भाषेची थोरवी आहे. अडीच हजार वर्षांची परंपरा असलेली ही आपली माय मराठी. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याला आता यश येत आहे. त्याचबरोबर 'अभिजात' भाषा दर्जाविषयी जनजागृतीसाठी जनअभियान राबवले जात आहे.

बोलतो...लिहतोही मराठी!

अर्चना शंभरकर

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी मराठी भाषेचे पुरावे गोळा करून शिफारस केंद्राकडे केवळ पाठवलीच नाही, तर सातत्याने या गोष्टीचा शासकीय स्तरावर पाठपुरावा केला जात आहे. त्याचबरोबर हा विषय सोप्या भाषेत समजावून सांगण्यासाठी या विषयावरचा 'शांतता मराठीचे कोर्ट चालू आहे..' हा लघुपट तयार केला आहे. नाशिकच्या साहित्य संमेलनात तो दाखवला गेला. अधिवेशन कालावधीत तो विधान भवनात आमदार आणि मंत्र्यांना दाखवण्यात आला. मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणातही त्याचे प्रदर्शन केले गेले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत समाज माध्यमांवरूनही हा चित्रपट प्रदर्शित केला गेला. त्याचबरोबर महाविद्यालयांतही हा लघुपट दाखवण्यात आला. या सर्व माध्यमांतून जनमत तयार केले गेले.

जनमताचा फायदा

नाशिकचे साहित्य संमेलन किंवा वेगवेगळ्या ठिकाणी केलेले प्रदर्शन येथून सामान्य जनतेने देशाचे माननीय राष्ट्रपती यांना सुमारे दहा हजार पत्रे पाठवून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी विनंती केली आहे. याचा सकारात्मक परिणाम होऊन केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी याबाबत संसदेत निवेदन केले. राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला हा विषय उपस्थित झाला होता. महाराष्ट्र शासनाचा प्रस्ताव हा सांस्कृतिक मंत्रालयाकडून भाषा तज्ज्ञांच्या समितीकडे पाठवण्यात आला. या समितीचा अहवाल साहित्य अकादमीकडे गेला व तेथे काही त्रुटींची पूर्तता झाली आहे. सध्या, हा प्रस्ताव आंतरमंत्रालय स्तरावर विचाराधीन आहे. केंद्रीय गृह मंत्रालय, सांस्कृतिक मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आदी मंत्रालयांतर्गत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून या विषयाला गती आली आहे.

'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' या माहितीपटातील क्षणचित्र.

मराठी भाषा अनिवार्य

राज्यात अनेक मंडळाच्या शाळांमधुन शिक्षण दिले जाते. यात सिबीएससी, आसीएससी, आयबी असे वेगवेगळे बोर्ड आहेत. मराठी भाषा सर्व मंडळाच्या शाळांमधून शिकवावी अशा सूचना होत्या मात्र त्याची अंमलबजावणी होत नव्हती. राज्य शासनाने या विषयावर गंभीरतेने विचारपूर्वक कार्यवाही केली. पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय घेण्यात आला. त्यानंतर मसुदा तयार करून सर्वपक्षीय आमदारांनी अधिवेशनात यास मंजुरी दिली.

भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी तिचा अभ्यास शालेय स्तरापासून करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षणामध्ये इयत्ता पहिली

सुभाष देसाई
मराठी भाषा मंत्री

जनअभियान राबवणार

मराठीला 'अभिजात' भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी जनअभियान राबवणार आहोत. 'अभिजात' दर्जासाठीच्या सर्व निकषांवर मराठी भाषा पात्र आहे. तसा अहवालही रंगनाथ पठारे समितीकडून केंद्राला सादर केला आहे. मराठी भाषिकांनी या दर्जासाठी आग्रही असणे आवश्यक आहे. यासाठी 'जनभियान' सुरू केले जात असून पोस्टकार्ड, महाजाल (इंटरनेट)द्वारे आदी विविध माध्यमातून मराठीचा आवाज राष्ट्रपतींपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. सर्व मराठी माणसांनी या अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे.

डॉ. विश्वजीत कदम
मराठी भाषा राज्यमंत्री

तरुणाईची भाषा मराठी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात तरूणाई विविध समाज माध्यमांद्वारे मराठीतून व्यक्त होत आहे. माहितीच्या महाजालावर मराठी भाषा जास्तीत जास्त प्रमाणात वापरण्याच्या दृष्टीने तरुणाईच्या आवडीच्या ब्लॉग रायटिंग, विकीपीडिया, फेसबूक, ट्वीटर यांसारख्या समाज माध्यमांवर लिखाणासाठी शासन प्रोत्साहन देत आहे. तसेच मराठी भाषेला तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी काही तांत्रिक संस्थांच्या सहकार्याने स्पेलचेकर, स्पीच टू टेक्स्ट इत्यादींसारख्या सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करणे विचाराधीन आहे. युनिकोडचा १०० टक्के वापर होण्यासाठीही प्रयत्न आहेत.

ते दहावीपर्यंतच्या राज्यातील सर्व प्रकारच्या शिक्षण मंडळांच्या शाळांमधून मराठी भाषा विषय अनिवार्य करण्याबाबतचा महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम २०२० हा दिनांक १ एप्रिल २०२१ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला. याची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभागामार्फत होत आहे.

'पुस्तकाचे गाव'चा विस्तार

हे ऑन वे या वेल्स (इंग्लंड) मधील पुस्तकाच्या गावाच्या धर्तीवर 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना अस्तित्वात आली. 'पुस्तकांचे गाव' या योजनेचे आंतरराष्ट्रीय स्वरूप लक्षात घेऊन मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी तसेच भाषेची आवड वाढावी, या उद्देशाने 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना मे २०१७ मध्ये आकारास आली.

या संकल्पनेचा विस्तार करण्याचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी निर्धार केला. त्यासाठी मराठी भाषेचा विकास, प्रचार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी, या दृष्टीने व मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी तसेच 'पुस्तकाचे गाव' हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबवण्याच्या उद्देशाने २०१९-२० या वर्षापासून 'पुस्तकाचे गाव' या योजनेस व या योजनेची भविष्यातील व्यापकता लक्षात घेऊन त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडून निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

'पुस्तकांचे गाव' ही योजना विस्तारित स्वरूपात सुरू करताना पहिल्या टप्प्यात 'पुस्तकाचे गाव' विभागीय स्तरावर सहा महसुली विभागात सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यात जिल्हा स्तरावर प्रत्येक जिल्ह्यात 'पुस्तकाचे गाव' सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मराठी भाषा भवन

जवाहर भवन, चर्नी रोड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून भव्य मराठी भाषा भवन उभे करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच ऐरोली, नवी मुंबई येथील जागेवर मराठी भाषा भवन उपकेंद्र या इमारतीकरीतीसाठी दीर्घकालीन भाडेपट्टी करार सिडको महामंडळासमवेत करण्यात आला आहे.

मराठी भाषा पंधरवडा

मराठी भाषा विभागाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले. कोविडच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रमांच्या नियोजनात मर्यादा होत्या. लोकांना सहभागी करून घेताना सामाजिक अंतराचे भान राखणे आवश्यक असल्याने ऑनलाईन कार्यक्रमांवर भर देण्यात आला. दरवर्षी मराठीत योगदान देणाऱ्या लोकांचे कौतुक केले गेले. मराठी भाषेसाठी तळमळीने काम करणाऱ्या मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी यांचेही कौतुक केले गेले. दरम्यान भाषा संवर्धन पंधरवडादरम्यान युवा साहित्यिकांचा सहभागही निश्चितच कौतुकास्पद होता.

मराठीतून कामकाज

शासकीय कार्यालयांमधून प्रशासकीय कामकाजात मराठीचा १०० टक्के वापर व्हावा यासाठी राजभाषा अधिनियम १९६४ आहे. त्याचप्रमाणे राज्यातील खासगी आस्थापनांमधून मराठीचा वापर वाढण्याच्या दृष्टीने मराठी बोला, मराठीत व्यवहार करा ही चळवळ वाढीस लागेल या दृष्टीने शासन प्रयत्न करत आहे.

प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभाग व शासकीय कार्यालये यांना शासन निर्णय व परिपत्रकांद्वारे सूचना देण्यात येतात. शासकीय कामकाज, टिप्पणी, सादरीकरण हे मराठीतूनच असावे असा आग्रह आता मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या सोबतच 'वापरतो मराठी' असे असावे यासाठीची सुरुवात निश्चितच झालेली आहे.

'प्रबोधनमधील प्रबोधनकार'चे प्रकाशन

१०० वर्षांपूर्वी चुकीच्या रूढी परंपरा तोडण्यासाठी केलेल्या चळवळीच्या इतिहासातून आजच्या पिढीला शिकता यावे, यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांचे ग्रंथसाहित्य आजही समर्पक आणि मार्गदर्शक आहे. प्रबोधन नियतकालिकेतील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख असलेले 'प्रबोधनमधील प्रबोधनकार' या त्रिखंडात्मक ग्रंथांचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.

विभागीय संपर्क अधिकारी

प्रशासकीय कामकाज मराठीतून करणे आवश्यक आहे, हे आपल्याला माहीत आहे. पण याची सुरुवात नक्की कधीपासून झाली, कोणत्या नियमान्वये झाली याची माहिती आपल्यापैकी बऱ्याच जणांना नसेल. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने शासकीय प्रयोजनांमध्ये मराठीचा वापर कसा सुरू झाला आणि आता तो कोणत्या टप्प्यात आहे, हे सर्व मराठीजनांना माहिती होणे आवश्यक आहे.

शासकीय प्रयोजनात मराठी

राजश्री उदय बापट

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येतो. तुम्हाला प्रश्न पडला असेल का बरे साजरा करण्यात येतो हा भाषा पंधरवडा? त्याबद्दल थोडक्यात जाणून घेऊ या .

मराठी भाषेचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टिकोनातून २०१० मध्ये स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन करण्यात आला. प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी सर्वांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, मराठी भाषा वृद्धिंगत होण्यासाठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करणे आदी विभागाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विभागामार्फत विविध योजना, उपक्रम राबवण्यात येतात. या उपक्रमांचाच एक भाग म्हणून मराठीचे वैभव जपण्यासाठी, मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. भाषा पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्रातील सर्व शासकीय/केंद्रशासकीय कार्यालये, बँका, शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत मराठी भाषेत विविध स्पर्धा, कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. अमराठी कर्मचाऱ्यांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात येते.

धोरण जाहीर

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आल्यानंतर, राज्य शासनाने शक्य तितक्या लवकर इंग्रजीऐवजी मराठीतून राज्यकारभार करण्याचे धोरण जाहीर केले. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ या अधिनियमान्वये २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला. राज्य सरकार वेळोवेळी निर्दिष्ट करील अशी वर्जित प्रयोजने वगळता उर्वरित सर्व शासकीय प्रयोजनांकरिता महाराष्ट्र राज्याच्या संबंधात उपयोगात आणावयाची भाषा मराठी असेल. अशी तरतूद या अधिनियमाद्वारे करण्यात आली.

राजभाषा अधिनियमान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून ३०.०४.१९६६ च्या अधिसूचनेन्वये काही वर्जित प्रयोजने निर्दिष्ट करण्यात आली. १ मे १९६६ पासून सदर वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य करण्यात आले.

वर्जित प्रयोजने म्हणजे अशी शासकीय कामकाजाची प्रयोजने ज्यामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याची सक्ती नाही. त्यामध्ये साधारणपणे केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये, अन्य राज्ये, परराष्ट्रांचे दूतावास, महालेखापाल यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच, वैद्यकीय औषधी योजना व अहवाल आणि वैद्यकीय विभागातील तांत्रिक बाबी इत्यादींचा समावेश आहे.

विविध उपाययोजना

शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ व्हावे म्हणून शासनाने बऱ्याच उपाययोजना केल्या. शासकीय कर्मचाऱ्यांना





मराठीतून टिपण्या व पत्रव्यवहार करणे सुलभ व्हावे या उद्देशाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल असे साहित्य, पुस्तके, शुद्धलेखन नियमावली, विविध परिभाषा कोश, शब्दावल्या तयार करण्यात आल्या व त्यांच्या प्रती शासकीय कार्यालयांना पुरवण्यात आल्या. सध्या या सर्वांचे भ्रमणध्वनी उपयोजकदेखील उपलब्ध आहे. इंग्रजी टंकलेखकांना व लघुलेखकांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्यात आले. अमराठी भाषिक अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी मराठीचे प्रशिक्षण वर्ग चालवण्यात आले. एतदर्थ मंडळामार्फत मराठी भाषा परीक्षा घेण्यात येऊ लागल्या. मराठी भाषेचा वापर शासकीय प्रयोजनांमध्ये सर्व विभागांनी व प्रशासकीय कार्यालयांनी करावा, यासाठी मराठी भाषा विभागामार्फत वेळोवेळी परिपत्रके, शासन निर्णये इत्यादींद्वारे सूचना देण्यात आल्या. या सर्व सूचना ७ मे २०१८ च्या परिपत्रकामध्ये एकत्रितरीत्या पुन्हा सर्व कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.

वर नमूद केलेले सर्व प्रयत्न करूनही मराठी भाषेच्या वापराबाबत शासनाने ठरवलेले उद्दिष्ट साध्य होत नसल्याने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये काही महत्त्वाच्या सुधारणा महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ नुसार करण्यात आल्या. यामध्ये नक्की कोणकोणत्या शासकीय प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ती शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत. वर्जित प्रयोजने वगळता उर्वरित शासकीय प्रयोजनात मराठी भाषेचा वापर होतो आहे ना, हे पाहण्यासाठी प्रत्येक कार्यालयात मराठी भाषा अधिकारी नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मराठी व्यवहारात

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मधील तरतुदी फक्त प्रशासकीय कामकाजापुरत्याच मर्यादित आहेत. मात्र, दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या अनेक गोष्टी मराठी भाषेत उपलब्ध असाव्यात, अशी अपेक्षा सर्वसामान्य लोकांची असते. त्यानुसार तक्रारी मराठी भाषा विभागाकडे प्राप्त होतात. त्या वेगवेगळ्या विभागांशी संबंधित असतात. उदाहरणार्थ - रस्ते, उद्याने, दुकाने, गृहनिर्माण संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या पाट्या, वस्तूंची वेष्टणे व त्यावर लिहिलेली माहिती, नगरपालिकांमार्फत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या जाहिराती इ. माहिती त्यांना मराठी भाषेत हवी असते. संबंधित विभागांनी ती माहिती मराठी भाषेत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यासंबंधी त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल आणि सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनावर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील, अशी तरतूद अधिनियमात करण्यात आली आहे.

मराठी भाषेचा वापर न केल्याबाबत येणाऱ्या तक्रारींची जिल्हापातळीवरच दखल घेऊन लगेच कार्यवाही करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती स्थापन करण्यात येणार आहे. सदर समिती जिल्ह्यामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करेल आणि मराठी भाषेबाबतचे उपक्रम आपापल्या जिल्ह्यात राबवेल. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी तसेच सल्ला देण्यासाठी राज्यस्तरावरदेखील एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूददेखील अधिनियमात करण्यात आलेली आहे.

प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी वरीलप्रमाणे अनेक उपाययोजना विभागाकडून निरंतर सुरू आहेत. अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी इतर विभागांचा व प्रशासकीय कार्यालयांचा सहभागदेखील मोलाचा आहे. त्यामुळे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राजभाषा अधिनियमातील तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा संकल्प करून आपण मराठी भाषेचे संवर्धन करू या.

कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग

कोणतीही भाषा समृद्ध होत असते ती त्या भाषेत निर्माण होणाऱ्या साहित्यावर. साहित्य हे केवळ भाषेचा अलंकार नसून ते संस्कृती, परंपरा आणि लोकजीवनातील घडामोडींचे वाहक असते. या साहित्याचे भरणपोषण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करत आहे. भाषा ही संस्कृतीची वाहक असते त्यामुळे तिच्या जतनासाठी मंडळ विविध उपक्रम राबवत असते.

'मराठी'साठी सर्वकाही

प्रा. डॉ. राजशेखर शिंदे

मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे. साहित्य संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरूप असे मौलिक ग्रंथ स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत विविध वाङ्मयीन योजना राबवल्या जातात.

पुस्तक प्रकाशन योजना

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मुख्य उद्दिष्टास अनुसरून मंडळाकडून राबवली जाणारी 'पुस्तक प्रकाशन योजना' ही एक मंडळाची महत्त्वपूर्ण योजना आहे. खासगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो, अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकास कमी किंमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. या योजनेत मौलिक स्वरूपाचे दर्जेदार व उत्तमोत्तम ग्रंथ मराठीमध्ये प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. या योजनेंतर्गत विविध विषयांवरील अत्यंत मौलिक स्वरूपाची ५९२ पुस्तके मंडळाने प्रकाशित केलेली आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने प्रकाशित झालेली पुस्तके ही वैविध्यपूर्ण विषयांवरील मौलिक व बहुविध स्वरूपाची असून ही पुस्तके महाविद्यालयीन विद्यार्थी / विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक यांच्यासाठी पूरक संदर्भग्रंथ म्हणून अत्यंत उपयुक्त अशी आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने 'पुस्तक प्रकाशन योजना' व 'बृहद्ग्रंथ प्रकल्प योजना' राबवण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यासारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यांसारख्या विषयांवर वैचारिक, सामाजिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नावीन्यपूर्ण व दुर्मीळ स्वरूपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जातात.

आर्थिक साहाय्य

मंडळाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या 'ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान' या योजनेंतर्गत मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा, तसेच ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो. याबरोबरच मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान देण्यासाठीची योजनादेखील मंडळाकडून राबवण्यात येते. मंडळाच्या या 'नियतकालिक अनुदान' योजनेंतर्गत मंडळाकडून दरवर्षी ५६ नियतकालिकांना अनुदान वितरित केले जाते.

नवलेखकांना प्रोत्साहन देणारी 'नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना' ही एक मंडळाची महत्त्वपूर्ण अशी योजना आहे. या योजनेंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना कथा,

कादंबरी, ललितगद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. याबरोबरच नवलेखकांसाठीच राबवली जाणारी मंडळाची दुसरी योजना म्हणजे 'नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना' ही योजना होय. नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून या योजनेंतर्गत महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांसाठी १० चर्चासत्रे / कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मराठी साहित्य संस्कृतीच्या विकासासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या सात साहित्य संस्थांना मराठी साहित्य संस्कृतीच्या विकासासाठी दरवर्षी प्रत्येकी रक्कम १० लाख रुपये इतके अनुदान मंडळाकडून देण्यात येते.

संमेलनांना अनुदान

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी २५ लाख रुपयांचे अनुदान मंडळामार्फत पूर्वी दिले जात होते. आता वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून हे अनुदान ५० लाख रुपये करण्यात आले आहे. मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणेच मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळ्या प्रवाहातील जनसमूहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे, या सांस्कृतिक धोरणातील सूचनेनुसार, 'अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान' देण्याची योजना मंडळाकडून राबवली जात आहे. या योजनेंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात साहित्यिक व सांस्कृतिक अभिसरण घडून येण्यासाठी मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळ्या प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना हक्काचे व्यासपीठ मिळण्यासाठी मंडळाकडून दरवर्षी प्रत्येकी २ लाख रुपयांचे अनुदान ३० अन्य संमेलनांना देण्यात येते.

गौरव साहित्यिकांचा

साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्या वतीने २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहेत. या पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे. या पुरस्काराबरोबरच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप तीन लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे. वरील दोन मुख्य पुरस्काराबरोबरच

मराठीतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीस पुरस्कार देण्याकरिता 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार' ही योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार मंडळाच्या वतीने प्रदान केले जातात.

वाचन प्रेरणा दिन

याबरोबरच माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस दरवर्षी 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून शासनाच्या वतीने साजरा केला जातो. वाचन प्रेरणा दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने दरवर्षी अखिल भारतीय साहित्य महामंडळ व महामंडळाच्या घटक संस्था तसेच महाराष्ट्रातील अन्य साहित्य संस्था यांच्या सहकार्याने दरवर्षी विविध वाङ्मयीन उपक्रम / कार्यक्रम आयोजित केले जातात. वाचन प्रेरणा दिनानिमित्त या वर्षी सदर साहित्य संस्थांच्या सहकार्याने १८ कार्यक्रम आयोजित केले होते. याबरोबरच शासनाच्या वतीने १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये साहित्यविषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अधीनस्थ महाराष्ट्रातील सात साहित्य संस्थांच्या सहकार्याने केले जाते.

प्रबोधन ग्रंथांचे प्रकाशन

'महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती आणि इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सदर मुख्य उद्दिष्टानुसारच, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी सुरू केलेल्या 'प्रबोधन' या नियतकालिकाच्या १६ ऑक्टोबर २०२० ते १५ ऑक्टोबर २०२१ या शताब्दीवर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने संपादित करण्यात आलेल्या 'प्रबोधन'मधील प्रबोधनकार' प्रबोधन नियतकालिकातील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख या त्रिखंडात्मक ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमांतून मराठी साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्याचे कार्य मंडळाच्या वतीने फार उत्तमरीत्या सुरू आहे.

द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर

अर्थकारणात, कृषिक्षेत्रात, आद्योगिक क्षेत्रात, शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्राने देशात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे आणि आपण सतत प्रथम क्रमांकावर असतो, ही गोष्ट नोंद करण्यासारखी आहे. पण सांस्कृतिक क्षेत्रात, भाषा आणि साहित्यविषयक घडामोडीत दिल्लीच्या या झंझावाती वातावरणात मराठी माणूस व भाषा मागे पडली ही वस्तुस्थिती आहे.

राजधानी दिल्लीतील मराठी

ज्ञानेश्वर मुळे

महाराष्ट्र आणि दिल्ली यांचा दृढसंबंध समकालीन मराठी युवकाला कितपत उमजतो, याबद्दल मी साशंक आहे. दिल्लीतील संसद आणि तिथे असणारे मंत्री, खासदार आणि अधिकारी यापलीकडे दिल्लीतील मराठी स्थान समजून घ्यायला आवश्यक असणारा अवकाश आपल्या मराठी माणसाकडे नाही. मराठी माणूस जेव्हा महाराष्ट्राचा विचार करून संपूर्ण भारतभर पसरला, स्वतःच्या कर्तृत्वाचा झेंडा मिरवत होता, तेव्हा मराठी भाषा, मराठी संस्कृतीसुद्धा दूरवर अटकेपार, बंगालच्या पुढे, दक्षिणेकडे रामेश्वरपर्यंत सर्वत्र पसरली होती. स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर जनताच अंतर्मुख झाली असे नसून महाराष्ट्राचे नेतेसुद्धा अंतर्मुख झाले. याचा परिणाम म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर संपूर्ण भारतभर गारूड असणारे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या वाट्याला आले नाही. नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर अटल बिहारी वाजपेयी आणि ए.पी.जे अब्दुल कलाम यांना अशा प्रकारे 'समग्र' भारतीयांवर प्रभाव टाकता आला. पण त्याचे मुख्य कारण या दोनही व्यक्ती बहिर्मुख होत्या. भारताच्या कानाकोपऱ्यांत ते आणि त्यांची किर्ती दोन्ही पोहोचली होती.

नवी दिल्ली येथे आयोजित मराठी सांस्कृतिक कार्यक्रमातील क्षणचित्र.

देशभरात मराठी

याबाबतीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाच्या पुण्याईने महाराष्ट्राने १७व्या शतकापासून ते २०व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात अद्‌भुत काम करणाऱ्या असंख्य 'राष्ट्रीय' पातळीवर महत्त्वाचे योगदान करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना जन्म दिला. याचाच परिणाम म्हणून महराष्ट्रातल्या मराठी माणसाने दुर्लक्ष करूनही देशभरातल्या अनेक भागांमध्ये मराठी माणूस, भाषा व संस्कृती टिकून आहे. मध्य प्रदेशातील इंदूर, देवास, धार, भोपाळ, ग्वाल्हेर, उत्तरप्रदेशातील कानपूर, बनारस, आग्रा, गुजरातमधील बडोदा, दक्षिणेत तंजावर आणि एकूणच तमिळनाडू, पटियाला, पानिपत इत्यादी ठिकाणी मराठी जनसंख्या आणि भाषा विविध बोली आणि वैविध्यासह टिकून आहे. दिल्लीतही कमीतकमी पाच-सहा लाख मराठी लोक असावेत, असा अंदाज आहे. पण मराठी वर सांगितल्याप्रमाणे अंतर्मुख झाला आणि त्यामुळे इतर राज्यांमधल्या मराठी माणसाकडे त्याने दुर्लक्ष केले. यामुळे मराठी भाषा आणि भारतभरच्या मराठी प्रभावावरती निश्चित विपरीत परिणाम झाला आहे.

'दिल्लीचेही तख्त राखणारा' मराठी माणूस आणि दिल्लीतील मराठी भाषा यांच्यावरही वरील कारणांमुळे संक्रांत आली आहे. अर्थातच मराठी भाषेचे शिलेदार इथेही खिंड लढवत आहेत आणि त्यातही दिल्लीचे महाराष्ट्र माहिती केंद्र एक प्रमुख भूमिका निभावत आहे, ही सुखद गोष्ट आहे. पण आज महाराष्ट्राचे जे स्थान देशभरात आहे, ते स्थान महाराष्ट्राच्या भाषेचे महाराष्ट्राबाहेर नाही. अर्थकारणात, कृषिक्षेत्रात, आद्योगिक क्षेत्रात, शिक्षणक्षेत्रात महाराष्ट्राने देशात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे आणि आपण सतत प्रथम क्रमांकावर असतो, ही गोष्ट नोंद करण्यासारखी आहे. पण सांस्कृतिक क्षेत्रात, भाषा आणि साहित्यविषयक घडामोडीत दिल्लीच्या या झंझावाती वातावरणात मराठी माणूस व भाषा मागे पडली ही वस्तुस्थिती आहे. पण यातला चांगला भाग म्हणजे ही परिस्थिती थोड्याशा प्रयत्नांनी बदलू शकते.

संस्थांचे पुनरुज्जीवन महत्त्वाचे

दिल्लीत महाराष्ट्राशी संबंधित संस्थांचे पुनरुज्जीवन करणे फारच महत्त्वाचे व तातडीने करायचे काम आहे. नूतन मराठी विद्यालय जवळ जवळ १०० वर्ष पूर्ण करतेय, तर महाराष्ट्र स्नेहवर्धिनीने १०० वर्ष ओलांडली आहेत. या शाळेचे एके काळचे वैभव दृष्ट लागण्यासारखे होते. या मराठी शाळेत फक्त मराठी शिकवले जात नव्हते, तर इथे मराठी भाषा, संस्कृती, नाटक व लोककला यांचे हे सुंदर राष्ट्रीय केंद्र होते. या शाळेचे ७०० आसनांचे सभागृह एके काळी अखिल भारतीय मराठी नाट्यस्पर्धांचे यजमानत्व करत होते. इथला रंगमंच अत्याधुनिक तर होताच पण सर्व सुविधांनी युक्त असा होता. आज महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्याकडून दुर्लक्षित झाल्याने या सभागृहाची रया गेली आहे. गेली काही वर्ष हा प्रश्न मी सातत्याने मांडत आहे, पण लक्षात कोण घेतो? जी परिस्थिती सभागृहाची तीच शाळेची. या शाळेत मराठी शिक्षक आहेत पण विद्यार्थी नाहीत, अशी शोकांतिका आहे. या सर्वांना दिल्लीतील मराठी माणसाचा आत्मसंतुष्टपणा आणि अदूरदर्शित्व कारणीभूत आहे, हे केवढे दुर्दैव आहे. महराष्ट्र शासनाने तातडीने याबाबत काही करणे गरजेचे आहे.

नवी दिल्ली येथे आयोजित मराठी सांस्कृतिक कार्यक्रमातील क्षणचित्र.

भाषा विकासाचे केंद्र व्हावे

याबाबतीत महाराष्ट्राने तमीळ, तेलुगू व कर्नाटक राज्यांकडून शिकणे आवश्यक आहे. मध्यवर्ती दिल्लीतील प्रशस्त जागांमधल्या या भाषांच्या शाळा फक्त त्या राज्यांच्या वैभवात भर घालत नाहीत, तर त्या भाषांच्या विकासाची केंद्रे झाली आहेत. त्यांना त्यांच्या शासनाची नियमित आर्थिक मदत व साहाय्य मिळते. आपल्याकडे अशा प्रकारची मदतीची योजना असली तरी ती कितपत चांगली चालली आहे, याचे मूल्यमापन करता येत नाही.

महाराष्ट्राशी संबंधित इतर अनेक सूचना दिल्लीतील मराठी भाषेच्या स्थानाविषयी करता येतील. दिल्लीत मराठी स्त्रियांची वनिता समाज ही संस्था आहे. चौगुले प्रशाला ही आणखी एक शाळीही आहे. कुतुबमिनारच्या आसपास छत्रपती शिवाजी महाराज म्युझियम आहे. शिवाय आर. के. पूरममधील विठ्ठलमंदिर आणि टिळकनगरजवळील दत्तमंदिर या महाराष्ट्राच्या खुणा आहेत. शासनमान्य स्मारकांमध्ये टिळक ब्रिज, शिवाजी ब्रिज, टिळक रोड, टिळकांचा पुतळा, संसद परिसरातील गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, शाहू महाराज, शिवाजी स्टेडियम, महात्मा फुले रोड, मधु लिमये रोड, पेशवा रोड वगैरेंचा समावेश होतो. पण या शिवायसुद्धा मराठी इतिहासाच्या अनेक खुणा दिल्लीत आहेत. ज्या इतिहासाच्या आपल्या अनास्थेमुळे दिसेनाशा झाल्या आहेत. इतिहास जपला, स्मारके जपली तरच आपली भाषा जिवंत राहील. शासनाने याही बाबतीत लक्ष घातले पाहिजे.

२०१६ पासून मी आणि काही मराठी अधिकाऱ्यांनी 'पुढचे पाऊल' नावाची मराठी अधिकाऱ्यांची संस्था सुरू केली आहे. ३-४ वर्षे प्रत्येक महिन्याला या संस्थेमार्फत भाषणे, भेटीगाठी व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. ही संस्था नोंदणीकृत संस्था असून 'पुढचे पाऊल' याच नावाने नोंद झाली आहे. महाराष्ट्राच्या राजधानी दिल्लीसह संपूर्ण भारतात मराठी भाषा संस्कृती, साहित्य कला व इतर सर्व क्षेत्रात महाराष्ट्राला पुढे नेणे या ध्येयालाच 'पुढचे पाऊल' हे नाव आम्ही दिले. या उपक्रमात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री महाराष्ट्राच्या संसदेतील खासदार वगैरेंनी सहभाग दिला. प्रकाश आमटेंपासून ते बाबासाहेब पुरंदरे यांच्यापर्यंत अनेकांचे विचार या मंचाने ऐकले आहेत. या संस्थेसोबत दिल्लीतील निरनिराळ्या मराठी संस्थांनी एकत्र येऊन राज्यासाठी व मराठी भाषेसाठी काम करणे गरजेचे आहे, असे वाटते. त्याद्वारे मराठी भाषेला 'अभिजात' भाषेच्या श्रेणीत बसवण्यापासून ते मराठी भाषेला दिल्लीमधील सर्व शाळांमध्ये ऐच्छिक भाषा घोषित करण्यापर्यंत अनेक कामे होऊ शकतात. दिल्ली सरकारने अनेक भाषांच्या ॲकॅडमी स्थापण्यासाठी मदत केली आहे. दिल्लीतल्या मराठी समुदायाने मराठी अकादमीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

दिल्लीतील मराठी माणूस मराठीप्रेमी आहे. तो गणेशोत्सव जवळ जवळ ४०-५० ठिकाणी साजरा करतो. इतर सणही घरगुती पद्धतीने साजरे करतो. पण मराठीच्या स्थानासाठी प्रयत्न करण्यात मात्र, तो मागे पडतो. त्याची एकजूट कमी पडते आणि जात-पात, उच्च-नीच या संकल्पनातून तो अजून पूर्णपणे बाहेर पडला नाही. छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी, बाजीराव इत्यादींच्या महाराष्ट्राबाहेरीत तेजस्वी कार्यामुळे आजही तंजावरपासून लाहोरपर्यंत मराठी खुणा दिसताहेत. मराठी भाषा सर्वत्र दिसावी असे वाटत असले तर आपले क्षात्रतेज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उद्योग व्यवसाय, तंत्रज्ञान, गुंतवणूक, साहित्य, कला व संस्कृती यांच्याद्वारे तळपायला हवे.

पूर्व सचिव व राजदूत, भारत सरकार
सदस्य, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली.

आजच्या डिजिटायझेशच्या युगातही आपली मुळे तपासण्याचे मुख्य स्रोत आपले जुने ग्रंथ हेच आहेत. त्यातही त्या ग्रंथांच्या हस्तलिखितांचे महत्त्व भाषा, संस्कृती आणि इतिहासाचा मागोवा घेणाऱ्या अभ्यासकांसाठी अतिशय मोलाचे आहे. त्यामुळे त्यांचे जतन हे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य आहे. त्यांच्या जतनातूनच पुढील पिढीसाठी अभ्यासाची दालने खुली राहतील.

वारसा हस्तलिखितांचा

प्रा. डॉ. उमेश आकरे

मराठी भाषेला प्राचीन वारसा आहे हे मराठी साहित्यातील वाङमयीन वैभव बघता म्हणावे लागते. या प्राचीन साहित्यातील वैभवाला आपल्याला आजही मराठीत अनुभवता येते. संतपरंपरेने ज्ञानाचा अथांग सागर मराठी साहित्यात प्रवाहित केला. हा केवळ प्राचीन साहित्याचा सरसकट अनुवाद नव्हे तर ते त्या संत परंपरेला आकलन झालेले नवरूपातील तत्त्वज्ञान आहे. पुष्कळदा तो सारगर्भित अर्थ एका वेगळ्याच

वाटेचे तत्त्वज्ञान सांगून जाणार असतो. ही बहुविधता मराठी साहित्यातील संत साहित्यात ठासून भरलेली आहे. एकीकडे हे साहित्य आपली नाळ प्राचीन साहित्याशी संबंध ठेवणारी असते, तर दुसरीकडे तेवढीच ती अपूर्वाई सांगणारी, निर्भेळ आनंद देणारी, स्वतंत्र अभिव्यक्तीची पखरण करणारीही आहे. मराठीतील महत्त्वाच्या ग्रंथांची नावे जरी घेतलीत तरी त्यातील वैभवाची आपल्याला खात्री पटेल. आद्य ग्रंथ लीळाचरित्र, ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांनी आपले श्रीमद्भगवत गीतेशी असलेले सख्य मोठ्या प्रमाणात मराठीतून दिग्दर्शित केले आहे, हे अभ्यासकांना नवे नाही.

अभ्यासकांसमोर आव्हान

अशा प्राचीन साहित्याचा वारसा सांगणाऱ्या व स्वतंत्र संपन्न विचारधारा म्हणून आपली ओळख जगाला देणाऱ्या अशा अभिजात मराठी साहित्याच्या अभ्यासात हस्तलिखितांचे महत्त्व खूप मोठे आहे. जोवर अभ्यासकांना प्रमाणित हस्तलिखिते पुरवली जाणार नाहीत तोवर त्यातून दिग्दर्शित होणारी तत्त्वे निर्मळ स्वरूपात जगासमोर येऊ शकणार नाहीत. यात मुख्य अडसर हा प्रक्षिप्ततेचा आहे. काळाच्या ओघात मुख्य हस्तलिखितांचा वापर करून त्याच्या कित्येक प्रतिलिपी तयार केल्या गेल्या. हे करत असताना काही जाणीवपूर्वक तर काही अजाणतेपणे प्रक्षेप-विक्षेप या साहित्यात घुसलेत. अभ्यासकांना जर विशुद्ध प्रत असलेले हस्तलिखित हाताशी लागले नाही तर त्यातील प्रक्षिप्ततेचा प्रवाह पुन्हा पुढे जातो. जो त्या साहित्याला वादग्रस्त करत जातो. जुन्यात जुन्या हस्तलिखितापर्यंत पोहोचण्यासाठी अशा हस्तलिखितांचा धांडोळा घेतला जावा. ते संग्रही ठेवले जावे. त्यांच्यातून प्रामाणिक प्रती कसोटी लावून निवडल्या जाव्यात आणि त्यातील विशुद्ध सांस्कृतिक संचित हे पुढील पिढीला उपलब्ध करून दिले जावे हे खरे तर अभ्यासकांसमोर आजही आव्हान आहे. यासाठी मिळतील तेवढी हस्तलिखित जतन करणे अत्यावश्यक आहे. मराठी साहित्यात हस्तलिखितांची मोठी संख्या आहे. म्हणून मराठी हस्तलिखितांची काळजी वाहणे ही काळाची गरज आहे.

हस्तलिखितांचे जतन महत्त्वाचे

जगभरातील धार्मिक स्थळी मठ मंदिर आश्रमातून तसेच देशात विखुरलेल्या प्रत्येक विद्यापीठाच्या संग्रहालयात हस्तलिखिते बहुसंख्येने पाहायला मिळतात. या हस्तलिखितांतून भाषा, कला, विज्ञान, तत्कालीन इतिहास आणि आध्यात्मिक ज्ञान अभ्यासायला मिळते. हे आपले भाषिक सांस्कृतिक संचित आहे आणि ते जतन करणे आपले कर्तव्यदेखील आहे. हा आपला भाषिक ज्ञानाचा वारसा जतन करण्यासाठी या हस्तलिखितांवर विशिष्ट रासायनिक प्रक्रिया करावी लागते. त्यातून त्यांचे संरक्षण होते. बहुधा या विषयाचे ज्ञान आणि माहिती नसल्यामुळे याकडे धार्मिक संस्थानांचे दुर्लक्ष झाले आहे. ही रासायनिक प्रक्रिया महागाची आहे. ही करताना हस्तलिखितांची हाताळणी करावी लागते. काही हस्तलिखिते इतकी जीर्ण आहेत की त्यांना स्पर्शदेखील केला की त्याचा भुगा होतो. कागद अतिजीर्ण झाल्याने तो फाटतो. अशा वेळी हस्तलिखित कसे सांभाळायचे हा मोठा यक्ष प्रश्न आहे. देशभरातील विद्यापीठांतून, संग्रहालयांतून हे सांस्कृतिक धन यापुढच्या पिढीला दिसेल का? ही काळजी आजच करण्याची गरज आहे.

हस्तलिखिताची डिजिटल आवृत्ती

यासाठी मराठीतून लिहिल्या गेलेल्या विविध मठ, मंदिर, आश्रमात किंवा विद्यापीठात संग्रहित असलेल्या हस्तलिखितांना स्कॅन करून छायाचित्र घेतले जावे. त्याचे आहे तसे यथातथ्य संवर्धन करण्यासाठी संबंधित तांत्रिक माध्यमे आणि प्रगत साधनसामग्री विचारपूर्वक योजून त्याची जास्तीत जास्त मेमरी साईजने आकुंचित असलेली तरीही मूळ प्रतीचे सर्व गुणधर्म जैसे थे संरक्षित करून संक्षिप्त रूप निर्माण करणे आज शक्य होते. या छायाचित्रांचे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पृथक्करण केले जाते. स्कॅनरद्वारे प्राप्त झालेले प्रत्येक छायाचित्र हे बहुपदरी असते. त्या छायाचित्रात उपलब्ध असलेली माहिती जसे की त्यात असलेले वाक्य, रेखाटने, चित्र इत्यादी सर्व प्रकार हे वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभागलेले असतात. यातील सर्व स्तर इमेज प्रोसेसिंग करून वेगळे केले जाऊ शकतात. या सर्व वेगळे केलेल्या स्तरांवर त्यात या स्तराला उपयुक्त असलेले वेगवेगळी पद्धत वापरून त्याचे संक्षिप्त रूप तयार केले जाऊ शकते. हे करत असताना त्यातील लिहिलेल्या प्रत्येक अक्षराचा शब्दाचा आणि वाक्यांचा आकार त्याच्या आहे त्या गुणधर्मांसहित जैसे थे राखला जाणे अपेक्षित आहे. त्याचे दृश्य रूपातील गुणधर्म जैसे थे संरक्षित केले जावेत. त्यातील रेखाटन यांचा स्वतंत्रपणे विचार करून त्याचेसुद्धा जैसे येथे संरक्षण केले जावे. त्यात चित्र किंवा त्या कागदाचा जो रंग असेल तो वेगळा केला जावा. त्याचे वेगळ्या पद्धतीने संक्षिप्त रूप तयार केले जावे. सरतेशेवटी ही सारी वेगवेगळी संक्षिप्त रूपे एकत्रित करून पुन्हा एकदा समग्र छायाचित्र बनवले जावे. प्रयोगाअंती बनवले गेलेले हे छायाचित्र आणि आधीचे मूळ छायाचित्र यात बघताक्षणी कुठलाही फरक दृष्टीला जाणवू नये. मुळात तो जाणवू नये एवढेच आकुंचन करण्याचे धोरण आखले जावे. त्यामुळे त्या पोथीतील पानांची आहेत तशी जैसे थे त्यांच्या समग्र गुणधर्मांसहित जशीच्या तशी आवृत्ती तयार केली जाऊ शकते. ही त्याची हुबेहूब मूळप्रत असल्याचे जाणवेल. त्याच्या मुळ प्रतीत असलेल्या सर्व बाबी यथातथ्य जैसे थे या छायाचित्रातसुद्धा संरक्षित केल्या गेल्या असल्याने हे खऱ्या प्रकारे त्या मूळ प्रतीचे जतन केल्यासारखे आहे. हे करत असताना मुळात स्कॅन केलेल्या छायाचित्रांच्या मेमरी साईजच्या तुलनेत जवळजवळ एक तृतीयांशपर्यंत मेमरी साईज कमी करण्यात प्रस्तुत लेखकाला आचार्य पदवीसाठी संशोधनाच्या निमित्ताने यश मिळाले आहे.

डिजिटल आवृत्तीचे फायदे

या यशामुळे संगणकामध्ये अशी पुष्कळ हस्तलिखिते आता संग्रहित करण्याची व्याप्ती वाढली. कमीत कमी मेमरी साईज लागत असल्याने या प्रतीला इंटरनेटच्या माध्यमातून अपलोड आणि डाऊनलोड करायला कमी वेळ खर्च होईल अर्थात गती वाढेल आणि त्याचा फायदा सर्वदूर विखुरलेल्या साहित्यिक, अभ्यासक, संशोधक तसेच सर्वसामान्य जनतेला घरपोच प्राप्त होईल. एकाच वेळी जुन्या हस्तलिखितांचे जैसे थे संरक्षण आणि त्याच्यामुळे प्रतीला हाताळण्याचे स्वातंत्र्य मिळाल्यामुळे विज्ञान आणि माहितीच्या कक्षा रुंदावतील. प्रत्यक्षात मूळ पोथीला हाताळण्याची गरज उरणार नाही म्हणून त्या पोथीचे आयुष्यदेखील वाढेल. मूळ प्रतीची बनवली गेलेली ही डिजिटल आवृत्ती आपल्याला प्रिंट करून आपल्याकडे सांभाळून ठेवता येईल. जुन्या पोथीमधील ज्ञान आणि माहितीचा अभ्यास करणे शक्य होईल.

सांस्कृतिक इतिहासाचे जतन

काळाच्या ओघात आलेली बंधने झुगारून तत्कालीन विद्वानांनी आपल्यासाठी तयार केलेल्या या ग्रंथांचे अवलोकन आपणास करता येईल. यातूनच काळाआड गेलेल्या आपल्या संस्कृतीचा आपल्याला परिचय घडेल. इतिहास आणि संस्कृतीचे संरक्षण होईल संवर्धनदेखील होईल. ती हस्तलिखिते पुढील पिढीला आजच्या उपलब्ध स्थितीतच बघता येतील. त्यांना प्रत्यक्षात हात न लावता अभ्यासता येईल. त्यांना इंटरनेटच्या माध्यमातून जगातील सर्व संशोधकापर्यंत पोहोचवता येईल आणि प्रसारित होतील. जेणेकरून त्यातील ज्ञानाचा प्रचार-प्रसार होईल आणि पूर्वजांची ही धनदौलत आपल्याला मिळाल्याचा, त्याचा वारसा जपण्याचा आनंद प्राप्त करून घेता येईल.

मराठी हस्तलिखितांचा प्रसार

ज्ञानाचा मराठी भाषिकांचा हा ठेवा पुढे या प्रयत्नातून पोहोचवला जावा ही आशा व्यक्त करत समाजाने, शासनाने, धार्मिक संस्थांनी, विद्यापीठ आणि शिक्षण संस्थांनी हा वारसा जतन करण्यासाठी. पुढाकार घेणे आवश्यक आहे. आज उपलब्ध होत असलेले नवनवीन संशोधन आणि तंत्रज्ञान वापरल्यास हस्तलिखितांचे संवर्धन आणि संरक्षण शक्य होईल. सर्वांनी पूर्वजांचा हा ज्ञानसंग्रह परोपरीने सांभाळावा आणि त्या ज्ञानाचे भांडार पुढील पिढीलादेखील उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते.

मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध बोलीभाषा, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्तांसह अनेक प्रादेशिक, सीमावर्ती आणि परिघावरील लोकसमूहांच्या वैशिष्ट्यपूर्ण बोलीभाषांचा समावेश आहे. या बोलीभाषांनी मराठीचे पोषण केले, त्यातील साहित्याने मराठी अधिक समृद्ध करण्यात मोलाची भर टाकली. विशेषत: आदिवासी साहित्याने मराठीचे भावविश्व अधिक गहिरे केले आहे.

पोषणकर्ते साहित्य

डॉ. वैजनाथ अनमुलवाड

मराठी ही मुख्यतः महाराष्ट्राची राजभाषा आहे. मराठी ही इंडो-युरोपीय भाषा कुळातली एक महत्त्वाची भाषा असून वेदपूर्वकाळापासून चालत आलेल्या विविध बोलीभाषांमधून ती विकसित झाली असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध झाले आहेत. आजपर्यंतच्या 'मराठी'वर वैदिकपूर्व बोलीभाषांसह पाली, प्राकृत, अपभ्रंष, मागधी, पैशाची, द्रविड इत्यादी भाषांचा प्रभाव पडला आहे. असे असले तरी स्वतःचे वेगळेपण सिद्ध करत 'मराठी' प्रवाही राहिली आहे. कालांतराने 'छांदस' भाषाप्रणाली विकसित झाली. कुठल्यातरी लोकभाषेतून संस्कृत भाषेचा जन्म झाला.

मराठी भाषेला सुमारे दोन हजार वर्षांपासूनची अभिजात परंपरा आहे. वैभवशाली इतिहास आहे. त्याविषयीचे विविध पुरावे उपलब्ध असल्याचे अनेक अभ्यासकांची मते प्रमाण ठरत आहेत.

प्रकार आणि रूपे

१९६५ मध्ये 'मराठी' ही महाराष्ट्राची राजभाषा झाल्यानंतर महाराष्ट्रात भाषिक अस्मिता जागृत झाली. तत्पूर्वी मध्ययुगातील मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, म. चक्रधर, म्हाइंभट, कवी नरेंद्र, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज इत्यादींनी मराठी अस्मिता जोपासली. ग्रंथ निर्मितीबरोबरच उपयोजित आणि व्यावहारिक पातळीवर 'मराठी' चा अधिकप्रमाणावर वापर करण्यावर भर दिला. 'मराठी'चा गौरव करण्याची परंपरादेखील मध्ययुगीन काळापासूनच सुरू झाली आहे.

महाराष्ट्रात भौगोलिक रचनेनुसार बदलत गेलेल्या मराठी भाषेची-अहिराणी, आगर, कोहळी, खानदेशी लेवा, चंदगडी, कोंकणी, झाडी, तावरी, पोवारी, मालवणी, वऱ्हाडी, वाडवळी, सामवेदी, संगमेश्वरी अशी सुमारे चौदा रूपे आढळून येतात. त्याशिवाय आदिवासींच्या विविध बोलीभाषा आणि भटक्या-विमुक्तांच्या व अन्य बोलीभाषा मिळून ५६-६० रूपांच्या तपशिलात्मक नोंदी 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र' (संपादक अरुण जाखडे, मुख्य संपादक डॉ. गणेश देवी २०१३) या ग्रंथात केल्याचे

आढळून येते. प्रत्यक्षात मराठीला १५० हून अधिक बोली असल्याचे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. मागील ६० वर्षांत महाराष्ट्रातील काही ठरावीक बोलीभाषांवर संशोधन झाले असून बहुतांश बोलीभाषांवर संशोधन होणे आवश्यक आहे.

मराठी भाषेला समृद्ध करण्याच्या दृष्टीने अलीकडे शासन स्तरावरून अनेक उपक्रम राबवण्यात येत आहेत. 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' 'मातृभाषा दिन' 'मराठी भाषा गौरव दिन' 'वाचन प्रेरणा दिन' इ. मराठी भाषाभिवृद्धीसाठी अनेक प्रकारचे प्रयोग केले जात आहेत. थोडक्यात, मराठी भाषा आणि संस्कृतीमुळे मराठी माणसाच्या जीवनात चैतन्य निर्माण होते. 'मराठी' ही महाराष्ट्राची आण, बाण, शान आणि अभिमान आहे. प्रत्येकाच्या 'हृदयातली भाषा' म्हणजे 'माय मराठी. ती प्रवाही आहे. ओजस्वी आहे. प्रासादिक आहे. राकट, लवचिक आणि परिवर्तनीय आहे. मराठी भाषेला वैभव प्राप्त करून देण्याचे महत्कार्य संतादिक साहित्यिकांनी केले आहे. बदलत्या काळाबरोबर मराठी भाषा अधिक प्रगल्भ, व्यापक आणि सर्वार्थाने सक्षम होणे गरजेचे आहे.

अंतरीचे धावे...

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषतः १९६० नंतर मराठीमध्ये अनेक साहित्यप्रवाहांचा उदय झाला. प्रामुख्याने दलित, ग्रामीण, आदिवासी, साहित्यप्रवाहांचे मराठी भाषा समृद्धीसाठी मोठे योगदान राहिलेले आहे. संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' याचा अर्थ असा की, जे आपल्या मनात आहे ते आपल्या भाषेत व्यक्त करावे. आपले अनुभव आपण आपल्या बोलीभाषेत / मातृभाषेत जेवढ्या सहजतेने व्यक्त करतो, तेवढी सहजता इतर भाषेतून येत नाही. बोलीभाषेतून निर्माण झालेले सर्जनशील साहित्य प्रभावी आणि परिणामकारक असते. ही फक्त बोलीभाषेची स्वाभाविकता आहे. बोलीभाषा कमालीच्या लवचिक आणि अकृत्रिम असतात. सामन्यांचा तो स्वाभाविक हुंकार असतो. आपलेपणाला साद घालणारा विश्वासात्मक उद्‌गार असतो. महाराष्ट्रात ग्रामीण लोकांच्या, भटक्या विमुक्तांच्या,

डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या आणि विविध व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांच्या शेकडो बोलीभाषा अस्तित्वात आहेत. बोलीषांतून समूहजीवनाचा सहजाविष्कार होतो. विविधतेने नटलेल्या भारताचा प्राण हा खेडे, पाडे, कडे, कपारी, डोंगरदऱ्यांमध्ये आहे. ग्रामसंस्कृती, कृषिसंस्कृती आणि आदिवासी संस्कृती यांचे मुक्त दर्शन घडवणाऱ्या बोलीभाषा समृद्ध आणि सक्षम आहेत. खरे म्हणजे बोलीभाषा ह्या भारताचे मूलधन आहेत. ग्रामीण, दलित, आदिवासी संस्कृतीमधून निर्माण झालेले साहित्य हे उच्च, उदात्त आणि प्रभावी आहे. कारण, त्यापाठीमागे समृद्ध अशा मौखिक आविष्कारांतील मूल्यतत्त्वांचा विलक्षण आधार आहे. थोडक्यात, बोलीभाषांतील साहित्याने मानवी जीवनातील पावित्र्य जपले आहे. व्याकरणिकदृष्ट्या कर्ता, कर्म, क्रियापद, लिंग, वचन इ. संज्ञांचा बहुतांश वेळा वापर होत नसला, तरी बोलीभाषांमध्ये आंतरिक गोडवा आहे. हे आपल्याला मान्यच करावे लागेल.

आदिवासी बोलीभाषा

'धरतीची लेकरे' म्हणून ज्यांचा सन्मानाने उल्लेख केला जातो, तो आदिवासी समाज आज सुरक्षित आहे काय? तो ज्या जंगल-पहाडांच्या आश्रयाने जीवन जगत होता त्या जंगलावर व जंगल उपजवार त्याचा हक्क आहे काय? आदिवासी समाज, संस्कृती, भाषा आणि जीवन सुरक्षित आहे काय? नसेल तर त्यापाठीमागाची कारणे कोणती? आदिवासींचा खरा इतिहास अजूनही जगासमोर का येत नाही? आदिवासी जंगलाचा राजा असेल तर त्या राजाला जंगलातून हाकलून का दिले जात आहे? त्यांच्या विविध कलाविष्कारांसह त्यांच्या मुक्त आणि स्वच्छंदी जगण्यावर बंदी का घातली जात आहे? आदिवासी समाजाशी संबंधित अशा अनेक प्रश्नांचा शोध घेणे आवश्यक आहे.

आदिवासी समाज हा दीर्घकाळापासून जंगल, दऱ्या-खोरे, डोंगरमाथ्याशी व डोंगरपायथ्याशी, नदीकिनारी वसलेला आहे. निसर्गसानिध्यात स्वच्छंदी आणि मुक्तपणे जीवन जगणारा एक आदिम समाज आहे. स्वतःच्या प्रथा, परंपरा, चालीरिती, सण-वार, विधी उत्सव, नृत्य, नाट्य, संगीत, महोत्सव, श्रद्धा आणि काही प्रमाणात (बाह्य संस्कृतीच्या प्रभावामुळे) अंधश्रद्धा जोपासणारा या भू-भागावरील प्राचीन असा समूह म्हणजे आदिवासी. त्यांच्या बोलीभाषा वेगळ्या, त्यांची संस्कृती वेगळी, त्यांचे राहणीमान, पेहराव, खानपान हे सारे तथाकथित सुधारलेल्या ग्राम किंवा नागरी समाजापेक्षा त्यांचे जीवन पूर्णतः वेगळे आहे. आदिवासींचा वैभवशाली इतिहास, गड, किल्ले, वास्तू इत्यादी आजही डौलाने उभे आहेत. आदिवासींचा राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास भक्कम आहे. व्यापार, वैद्यक आणि वनस्पतीविषयीचे

त्यांना प्रचंड ज्ञान आहे. मातृभूमीविषयी विलक्षण आदर आहे. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेला संघर्ष हा अनेकांना प्रेरणादायी ठरू शकेल एवढा समर्थ आहे. आदिवासी शूरवीर, वीरांगना आणि क्रांतिकारकांच्या लढ्याचा इतिहास व्यापक स्वरूपाचा आहे. मौखिक व लिखित अशा साहित्यविषयक परंपरा समृद्ध आहेत. त्यांच्या बोलीभाषा वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांत विविध प्रकारचे ज्ञानभांडार आहे. वर्तमानात आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक इ. वास्तव जीवन का धोक्यात येत आहे? असा प्रश्न मनात प्रत्येकाच्या मनात उद्‌भवतो.

साहित्यगंगा प्रवाहित

स्वातंत्र्यपूर्वकाळात दऱ्याखोऱ्यांत, जंगलपहाडांतील दुर्गमभागांत वास्तव्य करणाऱ्या आदिवासींपर्यंत औपचारिक शिक्षणाची 'गंगा' पोहोचलीच नव्हती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण कसेबसे आदिवासींच्या पाड्यांपर्यंत पोहोचले. त्यामुळे आदिवासींना शिक्षणाचे महत्त्व कळू लागले. शिक्षणामुळे आदिवासी प्रतिभेला चालना मिळाली. स्वानुभव, व्यथा, वेदना, कथा, गाथा भाव-भावना स्वभाषेतून व्यक्त करू लागले. पूर्वजांचा गौरवशाली इतिहास, वीर-वीरांगनांचे सामर्थ्यशाली चारित्र्य, मौखिक परंपरेतील भौतिक व अनौपचारिक शिक्षण देणारे साहित्य, मूल्याधारित सामाजिक, सांस्कृतिक, आणि कृतिशील अशा विचारधारा आदिवासींच्या साहित्यातून / लेखणीतून अभिव्यक्त होऊ लागल्या.

आदिवासी भाषासमूह व्यापक, प्राचीन व समृद्ध आहेत. मराठी भाषेपेक्षाही आदिवासींच्या भाषा अत्यंत प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. असे असले तरीही भारतीय संविधानात राष्ट्रीय भाषा म्हणून 'बोडो' व 'संथाली' वगळता इतर कोणतीत्याही आदिवासी भाषांना भारतीय संविधानाच्या ८ व्या सूचित स्थान दिले गेले नाही. आर्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेल्या कोया (गोंडी) भाषेलासुद्धा राष्ट्रीय भाषा म्हणून स्वीकारले गेले नाही. ही खेदाची बाब आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या भिल्ली, गोंडी, कोलामी, कोंकणा, कोरकु, कातकरी, परधानी, पावरी, वारली, ढोर कोळी, मल्हार कोळी, मावळी, राठवा, निहाली, निमाडी, ठाकरी, मथवाडी, माडिया, मांगेली, हलबी इ. प्रमुख बोलीभाषा मौखिक रूपाने अस्तित्वात आहेत. त्याशिवाय काही पोटभाषा आहेत. उदा. भिल्ल जमातीत बोलल्या जाणाऱ्या 'देहवाली' या बोलीचे 'खळवाड' व 'मेवासी' असे दोन पोटप्रकार पडतात. धुळे, नंदूरबार या भागात बोलल्या जाणाऱ्या या आदिवासी देहवाली बोलीत प्रचलित असलेले मौखिक साहित्य चामुलाल राठवा यांनी शब्दबद्ध केले आहे. या भाषांसह महाराष्ट्रात आदिवासींच्या सुमारे ७५ बोलीभाषा आजतरी अस्तित्त्वात आहेत.

थोडक्यात, भारतासह जगातल्या अनेक आदिवासी भाषांना आजही लिपी उपलब्ध नाही. गोंडी (कोया) भाषेचा अपवाद वगळता इतर बोली लिपिबद्ध झाल्या नाहीत. त्यामुळे बोलीचे मौखिक अस्तित्व संपले की त्या नष्ट होतात. भाषा नष्ट झाली की, त्या भाषेतील संस्कृती नष्ट होते. विचार नष्ट होतात. आणि ते नुकसान पुन्हा कधीही भरून निघत नाहीत. म्हणून बोलीभाषा जिवंत व प्रवाही ठेवण्यासाठी त्या त्या भाषकांनी प्रयत्न करावे हाच एक उपाय असू शकतो.

महाराष्ट्रातील आदिवासी बोलीभाषांचा ऐतिहासिक, सामाजिक, वर्णनात्मक आणि व्याकरणिकदृष्ट्या अनेकांनी अभ्यास केला. गोंडी भाषा व उत्पत्तीच्या संदर्भाने व्यंकटेश आत्राम यांनी 'गोंडी संकृतीचे संदर्भ' या संशोधन ग्रंथात अनेक संदर्भ देले आहेत. गोंडी भाषा आणि तिची लिपी ही ब्राम्ही लिपीपेक्षा प्राचीन आणि ब्राम्ही लिपीची जननी आहे, असे आत्राम यांनी म्हटले आहे. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेली चित्रलिपी ही गोंडी लिपी होय, असे गोंडी साहित्यिक आचार्य मोतीरावन कंगाली यांनी त्यांच्या 'सैधवी लिपी का गोंडी मे उद्गाचन' या ग्रंथात सिद्ध करून दाखवले आहे. प्रा. स्टीपण हिस्लाप, मुन्शी भगवानदास मसराम, सुन्हेरसिंह ताराम, मानिरावन दुग्गा आणि अलीकडील सीताराम मंडाले यांचे 'कोयाबोली' हे गोंडी लिपीवर आधारित पुस्तक जागतिक युनिकोड मिळवण्यासाठी अमेरिकेतील जागतिक भाषा परिषदेत पाठवण्यात आले आहे. आदिवासी बोलीभाषांच्या दृष्टीने वरील अभ्यासक आणि संशोधकांचे कार्य महत्त्वाचे आहे.

आदिवासी साहित्य : सर्जनात्मक

आदिवासी समाज हा आर्थिकदृष्ट्या मागास असला तरी सांस्कृतिकदृष्ट्या तो संपन्न आणि सुखी आहे. त्यांची मौखिक परंपरा समृद्ध असून निसर्ग हे त्यांचे सर्वस्व आहे. पशुपक्षी, झाडे, वेली, दऱ्या, खोरे, कड्या-कपारी, जंगल पहाडांच्या सान्निध्यात वास्तव्य करणारा आदिवासी अत्यंत समाधानी आहे. आदिवासींच्या लिखित साहित्याला प्रारंभ होण्यापूर्वी त्या त्या जमातींचे आदिवासी लोकसाहित्य बहुरूढ होते. नैसर्गिक पर्यावरणातील प्रेरणेतून आदिवासी भाषा आणि साहित्याची दमदार निर्मिती झाली आहे. त्यांच्या मौखिक आणि लिखित साहित्यात निसर्गजीवनाचा गंध आहे. सामाजिक बांधिलकीचे अंग आहे. नृत्य, गाणाचा छंद आहे. समूह मनाशी त्यांचे अतूट नाते आहे. एकूणच त्यांची जीवनशैली मानवतावादाला प्रमाण मानणारी आहे.

१९६० नंतर उदयास आलेल्या ग्रामीण, दलित, स्त्रीवादी इ. वाङ्मय प्रवाहांबरोबरच आदिवासी साहित्यप्रवाहाची वाटचाल अतिशय महत्त्वाची राहिलेली आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षा आणि वैचारिक लेखनातून आदिवासी समाजाचे प्रतिबिंब ठळकपणे उमटत आहे.

भारतीय समाजव्यवस्थेने ज्यांना दीर्घकाळ कोसोदूर ठेवले तो आदिवासी आता बोलू लागला आहे. जीवन-जाणिवांचा साकल्याने शोध घेऊ लागला आहे. वाट्याला आलेल्या व्यथा, वेदना, दु:ख, संघर्ष याविषयी सजगपणे विचार मांडण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करू लागला आहे. दीर्घकाळापासूनच्या मौनाला बोलते करण्याचे धाडस करत आहे.

आदिवासींच्या विविध बोलीभाषांत निर्माण होणारे हे साहित्य व त्यातील शब्द आजच्या मराठी साहित्याला पूरक आणि पोषक ठरत आहे. आदिवासी जीवनाचा आशय व्यापक असल्याकारणाने त्यांच्या साहित्यातील विश्व चैतन्यदायी अशा स्वरूपाचे आहे. गोंडी, भिलोरी, कोलमी, ठाकरी, कोरकू, माडिया, परधान, आंध, वारली, कातकरी, महादेव कोळी इत्यादी आदिवासी भाषांतील साहित्य आज मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत आहे. जीवनातील पावित्र्य जोपासणाऱ्या आदिवासी बोलीभाषांनी साहित्याच्या माध्यमातून एका वेगळ्या पर्वाला सुरुवात करत आहेत. निसर्गातील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, निरागसता, निष्ठा, उदात्तभाव, अनुकंपा इत्यादी भाव आदिवासींच्या विविध बोलीभाषांतून प्रकटतात. सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक संचितांचे दर्शन घडवणाऱ्या आदिवासी साहित्याचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

आदिवासींच्या विविध बोलीभाषांतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दांमुळे आदिवासी साहित्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. उदा. उलगुलान, गोटुल, तारपा, हाकारा, ढोल, ढोलिया, उरस्कल, कामठा, पुंगार, तपाड, इळा, पेन, येर, दंडार, ढेमसा, रेलॉ, पाटा, कांबड, खम्म, फगवा, मांडळ, जीरोती, घुसाडी असे कितीतरी आदिवासी बोलीभाषांतील विविध शब्दांमुळे मराठी भाषा अधिक देखणी समृद्ध आणि प्रगल्भ झाली आहे. तिच्या सौंदर्यात आदिवासी साहित्यामुळे विशेष भर पडत आहे. मराठी भाषा समृद्ध करण्यात आदिवासी साहित्याचे योगदान महत्त्वाचे आहे. या साहित्यविश्वात जागतिक पातळीवरील विविध भाषांमध्ये आदिवासी साहित्याची जी काही निर्मिती होत आहे. ती अनुवादाच्या रूपाने विविध भाषांमध्ये वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. भारतासह महाराष्ट्रातदेखील आदिवासींच्या संदर्भाने संथाली, बोडो, मुंडा, गौंडी, ठाकरी, कातकरी, मावची, कोलामी इत्यादी भाषांतील साहित्यनिर्मिती प्रामुख्याने मराठी भाषा व देवनागिरी लिपीद्वारे होऊ लागली. 'स्व' बोलीभाषेतील 'शब्द आणि त्याला पर्यायी 'मराठीशब्द' यामुळे आदिवासींच्या समृद्ध अशा साहित्यकृतींमुळे मराठी भाषा प्रगल्भ होण्यास कारणीभूत ठरली आहे. थोडक्यात, आदिवासी साहित्य हे 'मराठी' सुंदर बनवणारे मौलिक अलंकार आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

(लेखक भाषा संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सहायक प्राध्यापक आहेत.)

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्य, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांत मोठ्या सुधारणा केल्या. या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची, त्यांच्या कार्याची ओळख सर्वांना व्हावी यासाठी राज्य शासनाच्या 'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती'मार्फत गेल्या तीन वर्षांत ६२ ग्रथांची निर्मिती केली. ही समिती व ग्रंथांविषयी जाणून घेऊ या...

समग्र सयाजीराव महाराज

डॉ. राजेंद्र मगर

सयाजीराव महाराजांचे जन्मगाव महाराष्ट्रातील मालेगाव जवळचे कौळाणे. त्यांची दत्तकविधानाने बडोदा राज्याच्या प्रमुखपदी २७ मे १८७५ रोजी निवड झाली. प्रादेशिक, सांस्कृतिक आणि सामाजिक भिन्नता असूनही त्यांनी बडोदा राज्यात राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्य, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रांत सुधारणा केल्या. प्रजेची उन्नती हेच जीवनाचे अंतिम ध्येय मानले. आपल्या कार्यकर्तृत्वाने हिंदुस्थानात पुढारलेले बडोदा राज्य निर्माण केले.

महाराष्ट्रातील अनेक समाजधुरीणांना त्यांनी मदत केली. महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची जडणघडण करण्यात मोठा हातभार लावला. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या महाराजा सयाजीराव यांच्या चरित्रविषयक अक्षरधनाचे प्रकाशन करण्यासाठी राज्य शासनाने १७ ऑक्टोबर २०१६ रोजी 'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती' गठित केली. महाराजांची दुर्लक्षित आणि दुर्मीळ चरित्रसाधने त्याचबरोबर नव्याने लिहिलेले ग्रंथ प्रकाशित करणे ही समितीसमोरील प्रमुख उद्दिष्टे होती. समिती स्थापन झाल्याबरोबर समिती सचिव बाबा भांड आणि इतर सदस्य झपाटून कामाला लागले. त्यांच्या परिश्रमातून अवघ्या दोन

९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याची ओळख करून देणाऱ्या ग्रंथांचे प्रकाशन करताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, संचालक धनराज माने, समिती सचिव बाबा भांड, राजमाता शुभांगिनीराजे गायकवाड आदी.

अल्पावधीत ६२ ग्रंथांची निर्मिती

'महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती'ने २०१८ मध्ये पहिल्या टप्प्यात १२ खंड बडोदा येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशित केले. दुसऱ्या टप्प्यातील १३ खंडातील ५० ग्रंथांचे प्रकाशन नाशिक येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशित केले. समितीने निर्मितीपासून अवघ्या तीन वर्षांत मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ६२ ग्रंथ तयार केले. ग्रंथांची एकूण पृष्ठ संख्या २६,६४२ आहे.

वर्षांतच १२ खंड तयार झाले. खंडाचे प्रकाशन बडोदा येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात २०१८ मध्ये झाले.

त्यानंतर समिती सदस्यांनी अनेक लेखक आणि अनुवादकांच्या मदतीने पुन्हा नव्याने परिश्रम घेत पुढील दोन वर्षांत १३ खंडातील ५० ग्रंथांची निर्मिती केली. या ग्रंथांचे प्रकाशन त्यांच्या जन्मभूमीतील नाशिक साहित्य संमेलनात झाले. पूर्वीच्या १२ खंडांचेही प्रकाशन साहित्य संमेलनात झाले होते. महाराज इ.स. १९३२ च्या कोल्हापूर येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्याचबरोबर त्यांनी तीन मराठी साहित्य संमेलनांचे (इ.स. १९००, इ.स. १९२१ आणि इ.स. १९३४) बडोद्यात यशस्वी आयोजनही केले होते. त्यास भरीव आर्थिक मदत केली होती. त्यामुळे त्यांच्या चरित्रविषयक ग्रंथांचे प्रकाशन त्यांच्या कर्मभूमीत, जन्मभूमीत आणि मराठी साहित्य संमेलनात व्हावे हा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. नाशिक येथील ९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ४ डिसेंबर २०२१ रोजी ५० ग्रंथांचे प्रकाशन झाले. एखाद्या ऐतिहासिक व्यक्तित्वावर एकाच वेळी ५० ग्रंथ प्रकाशित होण्याची ही पहिलीच वेळ होती.

१२ खंडांतून बुद्धिमत्तेची झलक

बडोदा येथील ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात १६ फेब्रुवारी २०१८ रोजी चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने सयाजीराव महाराजांच्या भाषणांचे दोन मराठी खंड (संपादक : डॉ. रमेश वरखेडे), पत्रांचे तीन मराठी खंड (संपादक : डॉ. एकनाथ पगार), महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा महापुरुषाची (संपादक : बाबा भांड) असे सहा मराठी खंड आणि महाराजांच्या भाषणांचे दोन इंग्रजी खंड (संपादक : डॉ. अविनाश सप्रे) आणि महाराजांच्या इंग्रजी पत्रांचे चार खंड (संपादक : एकनाथ पगार) अशा सहा इंग्रजी खंडांचे (एकूण १२ खंडांचे) प्रकाशन करण्यात आले. या खंडातील महाराजांच्या भाषणांतून आणि



पत्रांमधून त्यांच्या वैचारिक बुद्धिमत्तेची झलक दिसते. एक तत्त्वज्ञ, प्रज्ञावंत राजा म्हणून महाराजांची ओळख सलामीच्या १२ खंडांतून होते. गौरवगाथा महापुरुषाची या खंडातील समकालीन इतर मान्यवरांच्या लेखातून महाराजांच्या बौद्धिक प्रतिमेवर शिक्कामोर्तब होते. त्याचबरोबर त्यांच्या बहुविध क्षेत्रातील कार्याची झलक खंडांतून पाहावयास मिळते.

साहित्यप्रेमी राजा

या ५० ग्रंथांमध्ये १३व्या खंडामध्ये ('महाराजा सयाजीरावांचे लेखन') भाग १ आणि २ मध्ये सयाजीराव महाराजांनी लिहिलेल्या 'फ्रॉम कैसर टू सुलतान' (इंग्लिश) आणि 'कैसरकडून सुलतानाकडे' (मराठी अनुवाद - राजारामशास्त्री भागवत) या दोन ग्रंथांचा समावेश आहे, तर भाग ३, ४ आणि ५ मध्ये बडोद्यात इ.स. १८९८-९९ मध्ये दुष्काळ पडल्यावर महाराजांनी प्रजेला मदत केलेल्या आणि आपत्तीवर मात कशी करायची याबद्दलच्या 'नोट्स ऑन फॅमिन टूर' ग्रंथाचा अनुवाद अनुक्रमे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत आहे. महाराजांनी स्वतः लिहिलेल्या ग्रंथांचा समावेश १३व्या खंडात आहे. महाराज लिपीचा, भाषेचा, कलेचा, साहित्याचा, साहित्यिकांचा, प्रकाशकांचा विचार करणारे प्रज्ञावंत साहित्यिक आणि साहित्यप्रेमी राजा होते. त्यांनी देशातील नव्हे; तर परदेशातील साहित्यावर स्वतःच्या चिंतनाने भाष्य केले. साहित्यनिर्मितीसाठी आर्थिक मदत केली. तसेच स्वतःही नानाविध विषयांवर लेखन केले. त्यांनी आयुष्यभर विद्याव्यासंग सोडला नाही. त्यांच्या विचारात, लेखनात आणि चिंतनातही अनेक दिवसांची तपश्चर्या होती. त्यांचे साहित्य म्हणजे त्यांनी कष्टपूर्वक मिळवलेल्या ज्ञानाचा परिपाक होता. अभ्यासाचे फलित होते. म्हणून समितीने प्राधान्याने त्यांच्या लेखनाचा समावेश १३व्या खंडात केला आहे.

महाराजा सयाजीरावांचे सुप्रशासन

सयाजीराव महाराजांचे दत्तकविधान झाल्यावर ब्रिटिशांनी एफ.ए.एच. इलियट यांच्या मार्गदर्शनाखाली सहा वर्षे शिक्षण दिले. शिक्षणक्रमाच्या शेवटी त्यांना प्रशासनातील नानाविध विषयावर व्याख्याने देण्यात आली. त्या अनुभवी आणि जाणकार व्याख्यात्यांच्या व्याख्यानामुळे त्यांना बडोदा राज्य प्रगतिपथावर घेऊन जाता आले. महाराजांच्या सुप्रशासनाचे गमक त्यांच्या प्रारंभीच्या शिक्षणात आणि व्याख्यानात आहे. ही सर्व व्याख्याने त्या काळातच ग्रंथरूपाने प्रकाशित करण्यात

आली; परंतु हे ग्रंथ आता दुर्मीळ झाले होते. व्याख्यानांचे महत्त्व आजही कालातीत आहे. त्यामुळेच १४व्या 'महाराजा सयाजीरावांचे सुप्रशासन' खंडात, भाग १ : 'सुप्रशासनाची सूत्रे', भाग २ : 'गूड ॲडमिनीस्ट्रेशन' आणि भाग ३ मध्ये 'बडोद्याचा राज्यकारभार' (संपादक: डॉ. राजेंद्र मगर) ग्रंथ समाविष्ट केले आहेत. महाराज सुप्रशासक असल्यानेच राजा भोज आणि महेंद्रपाल, प्लेटोला अपेक्षित असणारे राज्य निर्माण करणारा राजा अशा उपमा चरित्रकारांनी दिल्या आहेत. चरित्रकारांच्या उपमांची खात्री या खंडामुळे होते.

सयाजीराव यांचा जगप्रवास

सयाजीराव महाराज जगप्रवासी होते. त्यांनी २६ वेळा जगप्रवास केला. सर्व जगप्रवासाचे अहवाल त्यांनी अधिकाऱ्यांमार्फत तयार करून घेतले होते. समितीचे सचिव बाबा भांड यांनी सर्व अहवाल मराठीत अनुवादित करून घेतले. १५व्या 'महाराजा सयाजीराव यांचा जगप्रवास' या खंडात सर्व अहवाल मराठी ३ भागांत आणि इंग्रजी ३ भागांत प्रकाशित केले. मराठी खंडाचे संपादन बाबा भांड यांनी केले, तर इंग्रजी खंडांचे संपादन डॉ. विशाल तायडे यांनी केले आहे. महाराजांनी केलेला प्रत्येक प्रवास बडोदा राज्यासाठी लाभदायक ठरला. त्यांनी पुढारलेल्या देशात पाहिलेली आणि बडोद्यास उपयुक्त ठरणाऱ्या प्रत्येक गोष्टीला भारतीय रूप देऊन बडोद्यास आणली किंवा निर्माण केली. त्याचे उदाहरण म्हणजे त्यांनी बडोद्यात उभारलेले आशिया खंडातील सर्वांत मोठे ग्रंथालय होय. त्याचबरोबर औद्योगिक आणि ललितकलांच्या शिक्षणासाठी उभारलेले कलाभवन होय. जगप्रवासाचे अहवाल बडोद्याच्या प्रगतीतील महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

स्वातंत्र्य युद्धाचे समर्थक

महाराज इतर संस्थानिकांसारखे मांडलिक राजे नसून इंग्रजांचे मित्र आणि स्वतंत्र राजे होते. त्यांनी उमेदीच्या काळात इंग्रजांशी संघर्ष केला. स्वातंत्र्य लढ्यातील धुरीणींना पाठबळ दिले. इंग्रजांच्या नजरेतून ही बाब सुटली नाही. यामुळेच त्यांनी सीआयडीचा ससेमिरा त्यांच्या मागे लावला. पोलीस आणि सीआयडी प्रमुखांनी अनेक अहवाल वरिष्ठांना पाठवले. सर्व अहवाल 'बँडेड बॉक्स फाईल' आणि 'मोस्ट सिक्रेट्स फाईल'मध्ये बंदिस्त होते. आज ६० वर्षानंतर अहवाल सर्वांसाठी खुले आहेत. समिती सचिव बाबा भांड यांनी मित्रांच्या साहाय्याने अहवाल लंडनवरून मिळवले. अहवालाच्या आधारे त्यांनी 'स्वातंत्र्य लढ्याचे पाठीराखे महाराजा सयाजीराव' हा नवा इतिहास लिहिला. या ग्रंथाचा हिंदी



आणि इंग्रजी अनुवाद सोळाव्या 'महाराजा सयाजीराव स्वातंत्र्य युद्ध के समर्थक' खंडात भाग १ आणि भाग २ मध्ये (अनुक्रमे हिंदी आणि इंग्रजी) आहे. महाराज आणि इंग्रज यांच्या संघर्षातील नावीन्यपूर्ण आणि सत्यनिष्ठ इतिहास वाचायला मिळतो. एक राजा असूनही 'इंग्रजांशी दोन हात करणारे, क्रांतिकारकांना मदत करणारे महाराज सयाजीराव हे एक इतिहासातील सोनेरी पान होते' हे या ग्रंथांमुळे समजते.

शिक्षणविषयक सुधारणा

सयाजीराव महाराजांच्या सुधारणा शिक्षणाच्या भक्कम पायावर उभ्या होत्या. यामध्ये त्यांना मिळालेले शिक्षणही लाभदायी ठरले. त्यांच्या शिक्षणाचा सविस्तर अहवाल रियासतकार गो.स. सरदेसाई यांनी त्या वेळीच लिहून ठेवला होता. खेडेगावातील शेतकऱ्याचा एक मुलगा ते पुढारलेल्या बडोदा राज्याचे नृपती असा महाराजांचा सामान्य ते असामान्य प्रवास अहवालातून स्पष्ट होतो. अहवालाचे मराठी आणि इंग्रजी भाषेत पुनर्प्रकाशन १७व्या 'शिक्षण आणि शिक्षण सुधारणा' या खंडातील भाग १ आणि २ मध्ये केले आहे, तर भाग ३ मध्ये बडोद्यातील स्त्री शिक्षणविषयक सुधारणांवर मंदा हिंगुराव यांनी लिहिलेला ग्रंथ इंग्लिशमधून प्रकाशित केला आहे. महाराजांनी बडोद्यात सुरू केलेले सक्तीचे मोफत प्राथमिक, स्त्रीशिक्षण, औद्योगिक शिक्षण, शेतीशिक्षण आणि बडोद्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात पाठवणे या शिक्षणविषयक सुधारणांचा मूळ पाया त्यांच्या स्वतःच्या शिक्षणात आहे. त्यांची शैक्षणिक जडणघडण आणि त्यांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा समजण्यासाठी तीनही ग्रंथ मौल्यवान आहेत.

महाराजांचा सत्कार

१८व्या (सत्कार, आठवणी आणि लेख) खंडात तीन ग्रंथांचा समावेश आहे. महाराजांच्या सुधारकी बाण्यामुळे भारताबरोबर जगभरात त्यांचे सत्कार आयोजित केले जात. अशीच सत्कारांची मालिका त्यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात आयोजित केली गेली. त्या वेळी त्या मालिकेचा अहवाल महाराजांचे विश्वासू अधिकारी रामचंद्रराव माने पाटील यांनी 'सयाजीराव महाराजांचा महाराष्ट्रातील सत्कार' या नावाने ग्रंथरूपाने लिहून ठेवला. त्याचे भाग १ मध्ये पुनर्प्रकाशन केले आहे. महाराजांच्या समकालीन मान्यवरांनी काही आठवणी लिहून ठेवल्या आहेत. त्याचे संपादन बाबा भांड यांनी भाग २ मध्ये केले आहे, तर जगभरातील आणि भारतातील मान्यवरांनी महाराजांविषयी अनेक लेख लिहिले. त्याचे

संपादन (सयाजीरावांचे जागतिक वेगळेपण) भाग ३ मध्ये डॉ. राजेंद्र मगर यांनी केले आहे. हा खंड महाराजांची चरित्रविषयक साधने पुनर्जीवित करण्यासाठी उपयुक्त आहे. त्याचबरोबर तत्कालीन काळात त्यांच्याविषयी जनमानसात असणारा आदरही समजतो.

महाराजांची चरित्रे

सर्वसामान्यांना असामान्य व्यक्तींच्या चरित्राविषयी उत्सुकता असते. त्यामुळे खंड १९, २० आणि २१ मध्ये महाराजांची काही चरित्रे अनुक्रमे मराठी, हिंदी आणि इंग्रजीमधून पुनर्प्रकाशित केली आहेत; तर काही नव्याने लिहून घेतली आहेत. यामध्ये १९व्या खंडात मराठी चार चरित्रे आहेत. महाराजांचे समकालीन दा. ना. आपटे यांनी लिहिलेले चरित्र दोन भागात आहे. तिसऱ्या भागात महाराजांचे पणतू फत्तेसिंगराव गायकवाड यांनी लिहिलेल्या इंग्रजी चरित्राचा मराठी अनुवाद 'महाराजा सयाजीराव - एक राजा एक माणूस' आहे. चौथ्या भागात महाराजांच्या प्रज्ञावंत व्यक्तिमत्वाच्या पैलूबद्दल नावीन्यपूर्ण चरित्र डॉ. राजेंद्र मगर यांनी लिहिले आहे, तर पाचव्या भागात महाराजांच्या अर्धांगिनी 'महाराणी चिमणाबाई' या मंदा हिंगुराव लिखित चरित्राचा समावेश आहे. २०व्या खंडात भाग १ मध्ये बाबा भांड लिखित 'लोकपाळ महाराजा सयाजीराव' आणि भाग २ मध्ये 'प्रज्ञावंत महाराजा सयाजीराव' चरित्रांचा हिंदी अनुवाद आहे. २१व्या खंडात समकालीन चरित्रकारांनी लिहिलेल्या चार इंग्रजी चरित्रांचे पुनर्प्रकाशन केले आहे, तर एक नव्याने लिहिलेले चरित्र आहे. सर्व चरित्रकारांनी प्रथम साधनसामग्रीचा वापर करत चरित्रे सत्यनिष्ठ आणि तटस्थपणे लिहिली आहेत. त्याचबरोबर समरसता ठेवली आहे. दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, देशप्रेम आणि बंधुत्वाची शिकवण हे सर्व या चरित्राचा गाभा आहे. त्यामुळे देशाचे हित पाहणाऱ्या सर्वांना हे चरित्रे उपयुक्त आहेत.

महाराजांची भाषणे व पत्रे

खंड २२ मध्ये 'महाराजा सयाजीराव गौरवग्रंथांचा' (खंड १२वा) हिंदीमध्ये अनुवाद केला असून त्याचे संपादन समितीचे सचिव बाबा भांड यांनी केले आहे. २३व्या खंडात महाराजांची भाषणे आणि २४व्या खंडात पत्रे हिंदीत अनुवादित केली असून, यासाठी अनेक अनुवादकांचे योगदान लाभले आहे. यामध्ये भाषणे दोन भागामध्ये, तर पत्रे तीन भागामध्ये आहेत. मराठी भाषणांचे आणि पत्रांचे खंड पहिल्या टप्प्यात बडोद्यात प्रकाशित केले होते. खंड २२ ते २४मध्ये महाराजांची चरित्रविषयक अस्सल साधनसामग्री आहे. हा मोठा दस्तऐवज पुनर्जीवित केल्याने पुढील अनेक अभ्यासकांना याची मदत होणार आहे.



वैश्विक सुधारणांची ओळख

महाराजांनी बडोद्यात वैश्विक सुधारणा केल्या. त्यांच्या नानाविध सुधारणांवर २५व्या खंडात एकूण १० ग्रंथ नव्याने प्रकाशित केले आहेत. शिक्षण - डॉ. विशाल तायडे, शेती - पूनम मगर, आपत्ती निवारण - डॉ. राजेंद्र मगर, ग्रंथालय - जी.ए. बुवा, ललितकला - धारा भांड मालुंजकर, वास्तुकला - अर्की सारंग/ वैशाली पाटील, धर्म आणि सामाजिक - दिनेश पाटील, स्त्री सुधारणा - डॉ. सुनीता बोर्डे खडसे, सहकार - राहुल वनवे आणि उद्योग - सौरभ गायकवाड यांनी लेखन केले आहे. महाराजांनी सुधारणांमध्ये बडोद्याबरोबर देशहिताचा विचार केलेला होता. त्यांच्या सुधारणांना आपण फॉलो केले असते तर देशभरात वेगळे चित्र दिसले असते. महाराजांच्या वैश्विक सुधारणा समजून घेण्यासाठी दहाही भाग महत्त्वाचे आहेत. या भागातून सुधारणांची ओळख नेमकेपणाने होते.

राज्य शासनाने या ग्रंथांची छपाई बालभारतीमार्फत केली असून ती सुंदर आणि सुबक झाली आहे. पृष्ठसंख्येमुळे आकारात वैविध्यपूर्णता आली तरी; छोट्या ग्रंथाची किंमत ६० रुपये आणि मोठ्या ग्रंथाची किंमत १२० रुपये ठेवल्यामुळे ग्रंथ अल्प किमतीत उपलब्ध होणार आहेत.

सयाजीराव महाराजांनी सुधारणा, उन्नती, धर्म आणि इतर सर्वच बाबतीत नेहमीच सर्वसमावेशक भूमिका घेतली. आज सर्वत्र भेदाभेदाच्या अनेक भिंती उभ्या राहत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराजांची सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका आणि कार्यकर्तृत्वाची नव्याने ओळख होण्यासाठी राज्य शासन त्यांची चरित्रविषयक साधने 'चरित्र साधने प्रकाशन समिती'मार्फत प्रकाशित करत आहे. दुर्मीळ होत चालेलला आणि नव्याने लिहिलेला इतिहास पुन्हा समोर येत आहे. हा ऐतिहासिक दस्तऐवज महाराजांच्या पुरोगामी, सुधारक, प्रज्ञावंत आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची सखोल ओळख होण्यास उपयुक्त होईल. थोडक्यात, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, देशप्रेम आणि बंधुत्वाची शिकवण हा या ग्रंथांचा मूळ गाभा आहे. माणूस जन्माने नव्हे, तर कर्तृत्वाने संस्मरणीय ठरत असतो, हेही ग्रंथ अधोरेखित करतात. आजच्या स्थितीत निरामय समाज घडवू पाहणाऱ्यांसाठी हे ग्रंथ उपयुक्त आहेत.

(लेखक महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीमध्ये संशोधन सहायक आहेत.)

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन डिसेंबर महिन्यात मुंबईत झाले, पाच दिवस चाललेल्या या अधिवेशनात अनेक निर्णय घेण्यात आले, महत्त्वाची विधेयके मंजूर करण्यात आली, तर २४ विभागांच्या ३१ हजार २९८ कोटी २६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर करण्यात आल्या. अगदी कमी वेळेत जास्तीत जास्त काम करून हे अधिवेशन ऐतिहासिक ठरले.

ऐतिहासिक अधिवेशन...

वर्षा फडके-आंधळे

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण जग कोविड-१९ महामारीशी सामना करत आहे. यंदाही कोविड विषाणूचा प्रादुर्भाव पाहता हिवाळी अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत घेण्यात आले. नागपूर करारातील तरतुदीनुसार हिवाळी अधिवेशन दरवर्षी नागपूरला घेतले जाते. १९६२-६३ चा अपवाद वगळता नियमितपणे हिवाळी अधिवेशने नागपुरात व्हायची. मात्र, कोविड विषाणूची स्थिती पाहता गेल्या दोन वर्षांपासून हिवाळी अधिवेशन मुंबईतच होत आहे. २२ ते २८ डिसेंबर २०२१ या कालावधीत पार पडलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विविध निर्णय घेतले गेले, अनेक विधेयके मंजूर झाली, तर हजारो कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या. खरे तर हिवाळी अधिवेशनाचा काळ साधारणपणे तीन आठवड्याचा असतो. पण कोविडचा धोका ओळखून सुरक्षिततेला प्राधान्य देत या वेळी हिवाळी अधिवेशन मुंबईत घेण्याबरोबरच कालावधीही कमी करण्यात आला. पाच दिवसांचे अधिवेशन असले तरी या पाच दिवसात विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

महिलांना मिळाली 'शक्ती'

या हिवाळी अधिवेशनात महिला अत्याचारविरोधात शक्ती प्रदान करणारे 'शक्ती विधेयक' दोन्ही सभागृहात संमत करण्यात आले, हे विधेयक राज्यपालांकडे पाठवण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर शक्ती कायदा राज्यात लागू होणार आहे. शक्ती विधेयकानुसार महिला अत्याचाराच्या प्रकरणात ३० दिवसांत पोलीस तपास पूर्ण करून, २१ दिवसांत आरोपपत्र सादर करावे लागणार आहे. या विधेयकात बलात्कार, लैंगिक छळ, महिलांवरचे ॲसिड हल्ले यांसारख्या गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षेची तसेच समाज माध्यमांवर महिलांची बदनामी, ॲसिड हल्ला, विनयभंग आदी गुन्हे अजामीनपात्र करण्याची तरतूद आहे. याशिवाय खोटी तक्रार दाखल करणाऱ्या महिलांविरूद्धही कारवाईची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात विशेष अधिवक्त्यांची नियुक्ती, पीडितांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी समुपदेशन, त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न आदी तरतुदींचा शक्ती विधेयकात समावेश असल्यामुळे महिला अत्याचाराविरोधातील गुन्ह्यांना चाप बसण्यास निश्चितच मदत होणार आहे.

शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे

राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेला 'शांतता मराठीचं कोर्ट चालू आहे' हा लघुपट विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात लोकप्रतिनिधींना दाखवण्यात आला. विधानमंडळ सचिवालय, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या आणि राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत 'वातावरणीय बदल' या विषयावर विधानभवनात विधिमंडळ सदस्यांसाठी सादरीकरण करण्यात आले. राज्यातील लोकप्रतिनिधींनी आयपीसीसीच्या (इन्टरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज) अहवालाचा गांभीर्याने विचार करून आपल्या मतदार संघात पर्यावरणपूरक उपक्रम राबवून वातावरणीय बदलामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची झळ कमी करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचा नित्कर्ष या सादरीकरणातून समोर आला.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन.

२४ विधेयके मंजूर

या हिवाळी अधिवेशनात २४ विधेयके संमत करण्यात आली. यामध्ये ऐतिहासिक अशा शक्ती विधेयकाचाही समावेश आहे. याशिवाय या अधिवेशनात एक विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्याचा निर्णय झाला. तर तीन विधेयके मागे घेण्यात आली.

अधिवेशनातील महत्त्वाचे

- शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक २०२० दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीने सादर केल्यानंतर गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी विधासनभेत सादर केले. सर्व सदस्यांनी एकमतने विधेयाकाला पाठिंबा दिल्यानंतर हे विधेयक मंजूर झाले. बलात्कार, ॲसिड हल्ला आणि समाजमाध्यमातून महिला आणि बालकांबद्दल आक्षेपार्ह मजकूर आणि छायाचित्र या गुन्ह्यासाठी शक्ती फौजदारी कायद्यात सुधारणा करून कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. बलात्कारासंबंधी गुन्ह्यात मृत्युदंड करण्यासंदर्भातही तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. महिलेवरील ॲसिड हल्ला गुन्ह्यात आजन्म कारावास, महिलेच्या विनयभंग प्रकरणी नवीन कलम ३५४ ड प्रस्तावित, बलात्कारासंबंधी गुन्ह्यात कलम ३७६ मध्ये सुधारणा करून मृत्युदंडदेखील देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. तसेच लैंगिक अपराधाच्या बाबतीत ३० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करण्याची तरतूद या विधेयकातून करण्यात आली आहे.
- आरोग्य विभागाच्या गट 'क' आणि गट 'ड' या पदासाठी झालेल्या कथित गैरव्यवहाराची निवृत्त मुख्य सचिवांमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. तसेच फेरपरीक्षा घेतल्यास उमेदवारांकडून कोणतेही परीक्षा शुल्क घेतले जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी विधानपरिषदेत केली.
- राज्यातील वैद्यकीय व संशोधन विभागाच्या आधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, त्याअनुषंगाने अंदाजपत्रक तयार करणे, संबंधित प्राधिकरणाच्या आवश्यक परवानग्या प्राप्त करणे, संस्थेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे आणि अग्नि सुरक्षेसाठी सल्ला देण्याकरिता नोडल एजन्सी नियुक्त करण्याबाबत अभिव्यक्ति स्वारस्याचा मसुदा तयार करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिली.
- राज्यात विविध इमारती आणि रुग्णालयांमध्ये आग लागून दुर्घटना होण्याचे प्रकार दुर्दैवी आहेत. सर्व रुग्णालयांना फायर, इलेक्ट्रिकल, स्ट्रक्चरल आणि ऑक्सिजन ऑडिट करणे बंधनकारक करण्यात आल्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत सांगितले.
- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या ज्या कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबीयांच्या वारसांना नोकरीत सामावून घेणे याबाबत शासन सकारात्मक आहे. कर्मचाऱ्यांना राज्य शासनात विलिनीकरण करण्यासंदर्भात त्रिस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर विलिनीकरणासंदर्भातील निर्णय घेण्यात येणार असल्याची

पाच दिवसात विक्रमी कामकाज

- हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानपरिषद तालिका सभापती आणि विधानसभा तालिका अध्यक्षांची निवड करण्यात आली. विधानपरिषदेत ४ विधेयके पुनर्स्थापित करण्यात आली, तर ४ विधेयके संमत करण्यात आली, तर विधानसभेत १७ विधेयके पारित करण्यात आली. तसेच विधानसभेकडे ३ विधेयके (धन विधेयक) शिफारशीशिवाय परत पाठवण्यात आले होते.
- विधानपरिषदेत एकूण ५ दिवसात ४२ तास ४८ मिनिटे कामकाज चालले, तर साधारणपणे सरासरी कामकाज ८ तास ३३ मिनिटे कामकाज झाले.
- विधानसभेत एकूण ५ दिवसात ४६ तास ५० मिनिटे कामकाज चालले, तर साधारणपणे सरासरी कामकाज ९ तास कामकाज झाले.
- या पाच दिवसाच्या काळात दोन्ही सभागृहांनी प्रत्येकी ५ बैठका आयोजित केल्या.
- या पाच दिवसाच्या काळात विधानपरिषदेत १ हजार ४३४ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते, तर ३५८ प्रश्न स्वीकृत करण्यात आले आणि ३३ प्रश्नांना उत्तरे सभागृहात देण्यात आली. याशिवाय ३० अतारांकित प्रश्न प्राप्त झाले. तारांकित प्रश्नातून अतारांकित ३१६ प्रश्न झाले, तर ८५० उत्तरीय प्रश्नांची संख्या होती. विधानसभेत ५ हजार १४४ तारांकित प्रश्न प्राप्त झाले होते. २९९ प्रश्न स्वीकृत करण्यात आले आणि ३२ प्रश्नांना उत्तरे सभागृहात देण्यात आली. याशिवाय १ हजार ०६५ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या. यापैकी ५७ लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यात आल्या, तर २१ चर्चा झालेल्या सूचना आल्या. याशिवाय दोन्ही सभागृहांमध्ये प्रश्नोत्तरे, अशासकीय विधेयके, लक्षवेधी सूचना, नियम ९३ अन्वयेच्या सूचना, औचित्याचे मुद्दे, अल्पकालीन चर्चा, नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चा करण्यात आल्या.
- विधानपरिषदेत विधानपरिषद सदस्यांची सरासरी उपस्थिती ७८.९८ टक्के इतरकी तर विधानसभेत विधानसभा सदस्यांची सरासरी उपस्थिती ८२.९७ टक्के होती.
- याशिवाय या अधिवेशनात दोन्ही सभागृहात प्रत्येकी एका नवनिर्वाचित सदस्याचा शपथविधी आणि नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय विधानपरिषदेत करून देण्यात आला.
- याशिवाय दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव मांडण्यात आले.
- विधानपरिषदेचा कार्यकाळ संपत असलेल्या विधानपरिषदेतील सदस्य यांना विधानपरिषदेत निरोप देण्यात आला.

माहिती परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी विधानसभेत दिली.

- दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना मुदतीनंतर परीक्षेचे अर्ज भरल्यास विलंब शुल्क भरावे लागत होते, मात्र सध्याची आव्हानात्मक परिस्थिती पाहता या वर्षी मुदतीनंतर अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना विलंब शुल्क आकारण्यात येणार नाही, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी विधान परिषदेत दिली.
- विदर्भ-मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रांतर्गत निदेशानुसार घालून दिलेल्या निकषापेक्षा अधिकच्या निधीची तरतूद विदर्भ-मराठवाड्यासाठी करण्यात आली आहे. राज्याच्या एकसंध विकासासाठी शासन कटिबद्ध असून विदर्भ- मराठवाड्याच्या विकासाला निधी कमी पडू देणार नाही. शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य शासन उभे असून नैसर्गिक आपत्तिकाळात शेतकऱ्यांना एसडीआरएफच्या निकषापेक्षा अधिकची मदत सरकारने केली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.
- गेल्या पावणेदोन वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्र कोविड संकटाशी लढत असतानाही पायाभूत सुविधा आणि विकास प्रक्रियेची कामे कुठेही थांबणार नाही याची काळजी राज्य शासनाने घेतली आहे. विधानसभेत एकूण २४ विभागांच्या ३१ हजार २९८ कोटी २६ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. इतर मागास प्रवर्गाच्या इम्पिरिकल डेटासाठी ४३५ कोटी रुपयांची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सांगितले.
- स्वराज्याचे दुसरे छत्रपती, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या ऐतिहासिक हौतात्म्याचा आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचे जागतिक दर्जाचे, भव्य, प्रेरणादायी स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात आला आहे. तसेच हवेली तालुक्यातील तुळापूर येथील स्मृतिस्थळ, शिरुर तालुक्यातील वढू बुद्रुक येथील स्मारक तसेच तूळापूर आणि वढु बुद्रुक परिसराचा विकास करण्यात येणार आहे. स्मारक परिसराच्या विकासासाठी १५० कोटी रुपये टप्प्याटप्प्याने खर्च करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधासनभेत सांगितले.

कोविड चाचणी अनिवार्य

हिवाळी अधिवेशनाच्या काळात कोविडबरोबरच ओमायक्रॉन या विषाणूचा धोकाही बळावला असल्याने खबरदारी म्हणून विधिमंडळात प्रवेश करण्यासाठी कोविड चाचणी अनिवार्य करण्यात आली होती. विशेष म्हणजे अधिवेशन काळात

दोन वेळा प्रत्येक सहभागी सदस्य, अधिकारी-कर्मचारी आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्या कोविड चाचण्या करण्यात आल्या. या तपासण्यानंतर ज्यांचे तपासणी अहवाल निगेटिव्ह होते त्यांनाच विधानभवन परिसरात प्रवेश देण्यात आला. कोरोना विषाणूने पॉझिटिव्ह आढळून आलेल्यांच्या उपचारांची व्यवस्थाही करण्यात आली. विधिमंडळात कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करण्याबरोबरच मास्कचा अनिवार्य वापर, सुरक्षित अंतर याबरोबरच ठिकठिकाणी सॅनिटायझरची सुविधा करण्यात आली होती.

आसन व्यवस्थेत बदल

विधानभवनाच्या आतही कोविडचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व आवश्यक ती तयारी करण्यात आली होती. पण कोविडमुळे हिवाळी अधिवेशनाच्या काळात स्वच्छतेबरोबरच येथे येणाऱ्यांची सुरक्षितता यालासुद्धा सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते. सर्व महत्त्वाची ठिकाणे दरदिवशी सॅनिटाईज करण्याबरोबरच सोशल डिस्टन्सिंगवरही भर देण्यात आला. विधानसभा आणि विधानपरिषदेत पुरेसे अंतर ठेवून सदस्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली. प्रेक्षक गॅलरी बंद ठेवण्यात आली होती, तर वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनाही सोशल डिस्टन्सिंगच्या नियमाचे काटेकोर पालन करत प्रवेश देण्यात आला.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन मुंबईत पार पडल्यानंतर आता पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ फेब्रुवारी २०२२ पासून नागपूरात घेण्याची घोषणा दोन्ही सभागृहात करण्यात आली. या अधिवेशनात २०२२-२३ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प वित्तमंत्री आणि वित्त राज्यमंत्री दोन्ही सभागृहात मांडतील. आगामी आर्थिक वर्षात शासनाला सर्व मार्गांनी आणि साधनांद्वारे उपलब्ध होणारे उत्पन्न तसेच हे उत्पन्न शासन कोणकोणत्या बाबींवर खर्च करणार आहे, याचे शासन एक विवरण तयार करते त्या विविध खात्यांनी केलेल्या पैशांच्या मागण्यांना विधानमंडळाच्या मान्यतेसाठी ते विधानमंडळासमोर सादर केले जाते, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०२ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या विवरणालाच अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्प म्हटले जाते. हा अर्थसंकल्प या आगामी अधिवेशनात मांडला जाणार आहे.

कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सर्व प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून पार पडलेले हिवाळी अधिवेशन विशेष संस्मरणीय ठरले. आदर्श संसदीय लोकशाही परंपरांचे पालन करत आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर ठोस निर्णय घेत सर्वांच्या सहभागातून हे अधिवेशन यशस्वी झाले.

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी शासनाने महिलांच्या सुरक्षेला प्राथमिकता दिली आहे. महिलांना सन्मानाने जगण्यासाठी आणि त्यांना घरात व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. आता तर शक्ती विधेयकासारख्या महत्त्वाच्या पावलामुळे महिला सुरक्षेला बळही मिळेल.

महिलांसाठी 'शक्ती' कवच

मनिषा पिंगळे

महाराष्ट्र राज्यात गेल्या ६० वर्षांत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम, धोरणे राबवून, निर्णय घेऊन महिलांचा सन्मान आणि हक्काची जपणूक केली जात आहे. महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी महाराष्ट्र शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. राज्य शासनाने राबवलेल्या वेगवेगळ्या योजनांमुळे 'महिलांसाठी सुरक्षित राज्य' अशी महाराष्ट्राची ओळख निर्माण झाली आहे.

कायद्याचे संरक्षण

महिला आणि लहान मुलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या तक्रारींवर प्रभावीपणे कारवाई करता यावी, यासाठी प्रस्तावित कायद्यांची चौकट अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने 'महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ (महाराष्ट्र अमेंडमेंट) ॲक्ट-२०२०' हे विधेयक २०२० सालच्या अधिवेशनात मांडण्यात आले होते.

महिलांवरील अत्याचार प्रकरणांमध्ये २१ दिवसांत आरोपपत्र दाखल करणे, महिलांवरील ॲसिड हल्ला आणि बलात्कारासारखे गुन्हे अजामीनपात्र करणे, सोशल मीडिया तसेच ईमेल-मेसेजवर महिलांची बदनामी वा छळ करण्यात आल्यास त्यासाठीची कारवाई आदी तरतुदी या शक्ती विधेयकात आहेत.

नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात काही सुधारणांसह सादर करण्यात आलेले 'शक्ती' विधेयक संमत करण्यात आले. या विधेयकास राष्ट्रपतींकडून मान्यता मिळाल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होणार आहे. राज्यातील विविध घटकांच्या प्रतिनिधींच्या सूचना, शिफारसी लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे सर्वसमावेशक 'शक्ती' विधेयक महिला सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरेल.

पोलीस अन्वेषणाकरिता डाटा पुरवण्यात कसूर केल्याबाबत इंटरनेट किंवा मोबाइल टेलिफोनिक डाटा पुरवठादारांना तीन महिन्यांपर्यंतच्या मुदतीच्या साध्या कारावासाची किंवा २५ लाख रुपये दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील. याबाबत कलम १७५-क हे नव्याने दाखल करण्यात येत आहे.

खोटी तक्रार केल्यास किंवा लोकसेवकास विवक्षित अपराधांची खोटी माहिती दिल्याबद्दल तक्रारदार व्यक्तीस एक ते तीन वर्षांइतकी असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि १ लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्याचे नवीन कलम १८२-क प्रस्तावित करण्यात आले आहे. याद्वारे लैंगिक अपराधांबाबत खोटी तक्रार केल्यास तक्रारदारास शिक्षा होऊ शकेल. जेणेकरून खोट्या तक्रारींचे प्रमाण आणि त्यामुळे निरपराध माणसाची अनावश्यक मानहानी याला आळा बसू शकेल.

ॲसिड हल्ल्याच्या संदर्भात कलम-३२६ मध्ये सुधारणा करण्यात येऊन ॲसिड हल्ला करणाऱ्या गुन्हेगारास १५ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु अशा व्यक्तीच्या उर्वरित नैसर्गिक जीवनाच्या काळापर्यंत असू शकेल इतका कारावास आणि द्रव्य दंडाची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच पीडित महिलेस ॲसिड हल्ल्यामुळे कराव्या लागणाऱ्या वैद्यकीय उपचार खर्चामध्ये प्लास्टिक सर्जरी व मुखपुनर्रचना यांचा खर्च या दंडातून भागवला जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

महिलेचा विनयभंग करण्याशिवाय संदेशवहनाच्या कोणात्याही साधनाद्वारे (इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल) क्षोभकारी संभाषण करणे किंवा धमकी देणे याबाबत नवीन कलम-३५४ (ड) प्रस्तावित करण्यात

येऊन त्यामधील शिक्षा ही पुरुष, स्त्री किंवा ट्रान्सजेंडर यांनाही देता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

कलम ३७६ मध्ये सुधारणा

बलात्कारासंबंधातील कलम-३७६ मध्ये सुधारणा करण्यात येऊन त्यामध्ये अपराधी व्यक्ती सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल किंवा ज्या प्रकरणी अपराध घोर स्वरूपाचा आहे आणि जेथे पुरेसा निर्णायक पुरावा आहे व जरब बसवण्याची शिक्षा देण्याची खात्री होईल, अशा प्रकरणी न्यायालय मृत्युदंडदेखील देईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

फौजदारी प्रक्रियेच्या संहिता कलम-१०० मध्ये सुधारणा करण्यात येऊन लैंगिक अपराधाच्या बाबतीत दोन लोकसेवक किंवा शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने मान्यता दिलेले दोन सामाजिक कार्यकर्ते पंच म्हणून घेण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

लैंगिक अपराधांच्या बाबतीत फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम-१७३ मध्ये सुधारणा करण्यात येऊन पोलीस अन्वेषण हे ज्या दिनांकास खबर नोंदवली होती त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पूर्ण करण्यात यावे, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच या प्रकरणी असे अन्वेषण ३० दिवसांत पूर्ण करणे शक्य झाले नाही, तर संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षक किंवा पोलीस आयुक्त यांना कारणे नमूद करून आणखी ३० दिवसांपर्यंत मुदत वाढवता येईल, अशी तरतूद केली आहे. तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम-३०९ मध्येही सुधारणा करून लैंगिक अपराधाच्या बाबतीत न्याय चौकशी ही ३० कामकाजाच्या दिवसांत पूर्ण करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

लैंगिक अपराधांच्या बाबतीत खोटी तक्रार करणे किंवा त्याद्वारे एखाद्या व्यक्तीस जाणूनबुजून त्रास देण्याच्या उद्देशाने तक्रार दाखल करणे, याबाबत अटकपूर्व जामिनाची तरतूद नाही, अशी मूळ विधेयकात केलेली तरतूद विधिज्ञांचे मत तसेच विधेयकावरील आलेल्या हरकती व सूचना लक्षात घेऊन वगळण्याची शिफारस करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

जलदगती न्यायालये

महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मुंबई, नागपूर, पुणे येथील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये महिला व बालअत्याचार गुन्ह्यामधील दाखल प्रकरणी पुराव्याचे जलदगतीने विश्लेषण करून दोषींवर न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यासाठी जलदगती 'डीएनए युनिट' स्थापन करण्यात आले आहे.

कम्युनिटी पोलिसिंग आणि मुस्कान

राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये 'कम्युनिटी पोलिसिंग' ही संकल्पना राबवण्यात येत आहे. यामध्ये भरोसा सेल, बडीकॉप/पोलीस दिदी या उपक्रमांच्या माध्यमातून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी तत्काळ दखल घेऊन प्रभावी पावले उचलण्यात येत आहेत.

मुंबई पोलिसांचे महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र 'निर्भया पथक' आहे. राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला पोलीस कक्ष सुरू करण्यात आले असून, हे कक्ष महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी कार्यरत आहेत. महिलांवरील अत्याचार, विशेषतः बलात्कार, हुंडाबळी, अपहरण, अनैतिक व्यापार आणि घरगुती हिंसाचार इत्यादी गुन्ह्यांबाबत संपूर्ण राज्यात प्रत्येक पोलीस घटकात विशेष तपास पथके तयार करण्यात आली आहेत. या तपास पथकांचे काम राज्यात प्रभावीपणे सुरू आहे.

महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. पोलीस प्राधान्याने तक्रार घेऊन योग्य ती कार्यवाही करत आहेत. हे आपण नुकतेच घडलेल्या साकीनाका घटनेच्या वेळी पाहिलेच आहे. या प्रकरणी पोलिसांचा 'रिस्पॉन्स टाईम' १० मिनिटे इतका जलद होता.

महिला सुरक्षेला तंत्रज्ञानाचे बळ

राज्यात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. तसेच मुंबईसह प्रमुख शहरांमध्येही मोक्याच्या ठिकाणी कॅमेरा बसवण्याचे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. हेल्पलाइन्स, संकेतस्थळे, विविध ॲप्स अशा बाबींद्वारे पोलीस विभाग महिला व बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अधिकाधिक तंत्रसज्ज होत आहे. महिलांबाबत घडणारे सायबर गुन्हे हाही अलीकडच्या काळात चिंतेचा मुद्दा झाला आहे. परंतु सायबर गुन्हेविषयक विभाग अशा प्रकरणांचा माग काढत गुन्हेगारांना अटकाव करण्यासाठी सक्षम आहे.

कायदे, कार्यक्षमता आणि कर्तव्यभाव

हुंडा प्रतिबंधक कायदा-१९६१ याद्वारे हुंडा देणे आणि घेणे हा गुन्हा ठरवण्यात आला आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीकडे लक्ष देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दक्षता समिती सक्रिय आहेत. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्यान्वये संरक्षण अधिकारी घोषित करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होऊ नये म्हणून 'विशाखा गाईडलाइन्स'ची अंमलबजावणी राज्यात केली जात आहे. यासाठी तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. देवदासींचे आणि त्यांच्या मुलांचे पुनर्वसन, शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाचे मार्ग प्रशस्त करण्याच्या दृष्टीने देवदासी प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. कन्या भ्रूणहत्या रोखण्यासाठी लिंगनिदान प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सर्वत्र केली जात आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

कोविड-१९ या विषाणूने गेली दोन वर्षे अवघे जग मेटाकुटीला आले आहे. त्यातच त्याची अल्फा, बीटा, गॅमा, डेल्टा, ओमायक्रॉन अशी विविध रूपे म्हणजेच उत्परिवर्तन (Mutation) हे सर्वांची चिंता वाढवत आले आहे. या विषाणुजन्य आजारावर विशिष्ट औषध सध्या तरी उपलब्ध नसल्याने कोविड अनुरूप वर्तन हाच त्यावर उपाय आहे. जाणून घेऊ या, या विषाणूच्या उत्परिवर्तनाविषयी...

कोविड-१९ चे उत्परिवर्तन

डॉ. दीपक म्हैसेकर

'कोविडमुक्तीचा मार्ग' या पुस्तकाच्या मनोगतामध्ये कोविडच्या दोन लाटा आल्यानंतर अजूनही लाटा येऊ शकतात असे अंदाज व्यक्त केले होते. परंतु लाटा आल्यास त्यांची तीव्रता किती असेल हे संपूर्णत: कोविड लसीकरण व कोविड प्रतिबंध अनुरूप वर्तन तसेच कोविड-१९ विषाणूमधील (SARS Cov-2) भविष्यात होणाऱ्या उत्परिवर्तनावर (Mutation) अवलंबून राहील, असे नमूद केले होते.

विषाणूचे नामकरण

दुर्दैवाने सार्स कोव्ह-२ च्या उत्परिवर्तित विषाणू 'डेल्टा' प्रकारामुळे कोविड-१९ ची भारतात दुसरी व इतर पाश्चिमात्य देशांमध्ये तिसरी किंवा चौथी लाट आली व ही लाट कमी झालेली नसतानाच दक्षिण अफ्रिकेतील गोतांग प्रातांत नवीन उत्परिवर्तित कोरोना विषाणू आढळून आला. जागतिक आरोग्य संघटनेच्या धोरणानुसार उत्परिवर्तित विषाणू प्रकाराला संबंधित देशाचे नाव न देता ग्रीक बाराखडीप्रमाणे नामकरण केले जाते. उदा. अल्फा, बीटा, डेल्टा, गॅमा इ. या बाराखडीतल्या मुळाक्षराप्रमाणे या पूर्वीच्या उत्परिवर्तित विषाणूला Mu हे नाव देण्यात आले होते व ग्रीक बाराखडीतील पुढील मुळाक्षरे Nu व Xi असल्यामुळे Nu (न्यू /नू) किंवा Xi (झी) हे नांव देणे क्रमप्राप्त होते. तथापि, न्यू / नू म्हणजे नवीन किंवा झी म्हणजे चीनी असा गोंधळ होऊ नये म्हणून, या उत्परिवर्तित विषाणूला ग्रीक बाराखडीतील त्यापुढचे अक्षर असलेले 'O ओमायक्रॉन किंवा ओमिक्रॉन' असे नाव देण्यात आले.

आजमितीला अनुक्रमे अमेरिका, भारत, ब्राझिल, युनायटेड किंग्डम, रशिया, फ्रान्स, तुर्की, जर्मनी, स्पेन, ईरान, इटली, अर्जेंटिना व कोलंबिया हे १४ देश सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. कोविड उत्परिवर्तित विषाणू 'ओमायक्रॉन'चे जगात ३० डिसेंबर २०२१ पर्यंत एकूण १२५ देशांत एकत्रित ३,६७,३१४ रुग्ण आढळून आले. सर्वाधिक ओमायक्रॉनने रुग्ण अनुक्रमे युनायटेड किंग्डम, डेन्मार्क, जर्मनी, अमेरिका, कॅनडा, नॉर्वे या देशांत आढळून आले. डेल्टापेक्षा याची संक्रमणशीलता किमान तीनपटीने जास्त असल्याचे आढळते, म्हणूनच जागतिक आरोग्य संघटनेने याला सुरुवातीपासूनच चिंता वाढवणाऱ्या प्रकारात वर्गीकृत केले आहे.

ओमायक्रॉनचे उत्परिवर्तन

ओमायक्रॉन या कोविड विषाणूच्या प्रकारामध्ये मूळ वुहान कोरोना विषाणूमध्ये ६० पेक्षा जास्त उत्परिवर्तने झाल्याचे आढळून आले. विषाणूच्या स्पाईक प्रथिनांमुळे (विषाणूच्या बाह्य आवरणावरील काटे सदृश्य भाग) कोरोना विषाणू हा मानवीय पेशींना घट्ट पकडतो व याच भागामध्ये जवळपास ३२ उत्परिवर्तने झाल्याचे आढळून आले. यापैकी १५ उत्परिवर्तने प्रामुख्याने स्पाईक प्रथिनांच्या रिसेप्टर बाईंडिग डोमेनमध्ये (शरीरातील पेशींच्या संपर्कात सर्वप्रथम येणारा विषाणूचा भाग) झालेली आढळतात. त्यामुळे या विषाणू प्रकाराची संक्रमणशक्ती सर्वात घातक विषाणू प्रकार मानण्यात आलेल्या डेल्टा पेक्षा जवळजवळ दुप्पट आहे.

या पार्श्वभूमीवर पूर्ण लसीकरण होणे म्हणजेच लसीचे दोन डोस घेऊन, १४



सार्स कोव्ह-२


ओमायक्रॉन

स्पाईक प्रोटीनमध्ये ३२ म्युटेशन्स

दिवसांचा कालावधी झालेला असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच या विषाणू प्रकाराची संक्रमणशक्ती लक्षात घेतली तर मास्क वापरणे अनिवार्य ठरते. ब्रेक-थ्रू इन्फेक्शन म्हणजेच लस घेतल्यानंतरही कोविड होणे हे ओमायक्रॉनच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोविडचा मूळ सार्स व उत्परिवर्तित ओमायक्रॉनमधील फरक

Fig.१ मधील सार्स कोव्ह-२ विषाणूच्या स्पाईक प्रोटीनमध्ये उत्परिवर्तन (चींरींळेपी) न झालेले व Fig.२ मधील उत्परिवर्तित ओमायक्रॉन या विषाणूमधील स्पाईक प्रोटीनमध्ये ३२ पेक्षा जास्त बदल घडून आलेले आहेत.

उत्परिवर्तन हा एक जैविक कालचक्राचा भाग असून, प्रत्येक वेळी होणारे उत्परिवर्तन हे घातकच असेल असे नाही. आजमितीला ओमायक्रॉन हा विषाणू जरी वेगाने संक्रमित होत असला तरी, आजाराचे गंभीर रूप आढळत नसल्याचे निदर्शनास येते. मात्र यापुढेही या आजाराचे स्वरूप गंभीर असणार नाही, याची खात्री देता येत नाही.

कोविड विषाणूसंसर्गाची लक्षणे

कोविड लक्षणे : तीव्र ताप, स्नायूपेशी दुखणे, डोकेदुखी, थकवा येणे, सर्दी, घसा खवखवणे/दुखणे, श्वासाला त्रास, दम लागणे, भूक न लागणे, मानसिक गोंधळ, छातीत दुखणे, बोलताना अडखळणे, कोरडा खोकला.

डेल्टाची लक्षणे : सौम्य ताप, शिंका येणे, चव जाणे, गंध जाणे, अतिसार, मळमळ, उलटी, त्वचेवर पुरळ येणे, श्वासाला त्रास, दम लागणे, डोळे लाल होणे, खूप थकवा येणे, बोटे/अंगठ्यांचा रंग बदलणे.

ओमायक्रॉनची लक्षणे : नाक वाहणे, डोकेदुखी, अंगदुखी, खूप थकवा येणे, घसा खरखरणे, वारंवार शिंका येणे.

तर लहान मुलांमध्ये तीव्र ताप, डोकेदुखी, सतत खोकला, घशात खरखरणे, थकवा येणे, भूक न लागणे ही लक्षणे आढळून येतात.

ओमायक्रॉनची चाचणी

ओमायक्रॉन विषाणूमधील S जीन (Gene) मध्ये जवळपास ६०-७० म्युटेशन्स झालेले असल्याने, कोविडच्या नियमित चाचणीमध्ये S जीन आढळून येत नाही त्यालाच एसजीटीएफ म्हणतात (S - Gene target failure) किंवा S Gene Drop out म्हणतात. विषाणूच्या उत्परिवर्तित 'अल्फा' प्रकारात अशा प्रकारचे एसजीटीएफ आढळून आले होते. सध्या अल्फा प्रकाराचा उत्परिवर्तित विषाणू जगात कुठेही आढळून येत नाही. अशा परिस्थितीत एसजीटीएफ आढळल्यास ते ओमायक्रॉन असण्याचे सूचक आहे. आरटीपीसीआर चाचणीत विविध प्रकारच्या किट्स वापरल्या जातात. त्यापैकी काही किट्समध्ये 'ओआरएफ', 'एन', आणि 'एस' या जनुकांना शोधून कोविडचे रोगनिदान करतात. या चाचणी किट्सचा वापर केल्यास एसजीटीएफ असल्याची खात्री पटवली जाऊ शकते व ते सार्स कोव्ह-२चा ओमायक्रॉन हा उत्परिवर्तित प्रकार असल्याचे सूचक आहे. ज्याची खात्री जनुकीय क्रमनिर्धारणाने पडताळली जाऊ शकते.

ओमायक्रॉन निदानासाठी चाचणी किट

सध्या वापरात असलेल्या आरटीपीसीआर चाचणीद्वारे कोविड झाल्याचे निदान होऊ शकते तथापि, कोविड हा ओमायक्रॉन, डेल्टा किंवा तत्सम

उत्परिवर्तित विषाणू प्रकार

विषाणू प्रकार	अल्फा	बीटा	गॅमा	डेल्टा	ओमायक्रॉन
सर्वप्रथम निदान	युनायटेड किंग्डम (सप्टे.२०२०)	दक्षिण आफ्रिका (मे २०२०)	ब्राझिल (नोव्हें. २०२०)	भारत (ऑक्टो. २०२०)	बोत्सवाना, द. आफ्रिका (२४ नोव्हें. २०२१)
संक्रमणशीलता	५०%	५०%	४६%	८२-८६%	८६%
प्रसार झालेले देश	१९२	१४१	८६	१६३	१२५
दाहकता/ विषारीपणा/ रोगाची तीव्रता (Virulence/ Disease Severity) **+ = Mild** **++ = Moderate** **+++ = Severe** **++++ = Critical**	- रुग्णभरती ++ (Avg:१३.३ दिवस) - रोगतीव्रता ++ - मृत्युप्रमाण ++ - ब्रेक थ्रू संसर्ग + - दुसऱ्या व तिसऱ्या लाटेला कारणीभूत.	- रुग्णभरती ++ - रोगतीव्रता ++ - मृत्युप्रमाण + - दुसऱ्या व तिसऱ्या लाटेला कारणीभूत.	- रुग्णभरती ++ - रोगतीव्रता ++ - मृत्युप्रमाण ++ - दुसऱ्या व तिसऱ्या लाटेला कारणीभूत.	- रुग्णभरती ++++ - रोगतीव्रता ++++ - मृत्युप्रमाण +++ - ब्रेक थ्रू संसर्ग + - तिसऱ्या लाटेला कारणीभूत.	- रुग्णभरती ++ - रोगतीव्रता +++ - मृत्युप्रमाण + - ब्रेक थ्रू संसर्ग +++ - मोनोक्लोनल ॲन्टिबॉडीचा प्रभाव कमी. - तिसऱ्या व चौथ्या लाटेला कारणीभूत.
लस परिणामकारकता	६४-८९% पर्यंत प्रभावी	४८-८४% पर्यंत प्रभावी	४८-८४% पर्यंत प्रभावी	६९-८७% पर्यंत प्रभावी	३० ते ४०% पर्यंत प्रभावी

प्रकारामुळे झाला आहे किंवा कसे याचे भिन्न निदान करता येत नाही.

विषाणूचे जनुकीय क्रमनिर्धारण करून ओमायक्रॉनसारख्या उत्परिवर्तित विषाणूचे संक्रमण झाले आहे किंवा नाही, याची खात्री करता येते. परंतु त्यामध्ये काही कालावधी लागून कालापव्यय होऊ शकतो म्हणून खालील किट्स वापरून आरटीपीसीआर केल्यास ओमायक्रॉनमुळे कोविड झाला आहे किंवा कसे याबाबत सूचक निदान करता येते.

- प्रादेशिक वैद्यकीय संशोधन केंद्र, आसाम (RMRC) द्वारा विकसित चाचणी किट (ICMR).
- कुला सार्स कोव्ह-२ चाचणी किट (Mesa Biotech co)
- टॅकपाथ कोव्हिड-१९ आरटीपीसीआर कोम्बो किट (Thermo Fisher Scientific co)
- लिनिया कोव्हिड-१९ पारख किट (Applied DNA Sciences)
- एक्सपर्ट एक्सप्रेस सार्स कोव्ह-२ चाचणी किट (Cepheid)
- जीन पॅथ डायग्नोस्टिक किट (ICMR approved)

ओमायक्रॉन विषाणूचा प्रसार

- सार्स कोव्ह-२ या कोव्हिड विषाणूचा प्रसार तुषारबिंदूद्वारे (Droplets) होतो. ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणू प्रकाराचा प्रसार हवेद्वारे होतो असे मत काही संशोधकांनी मांडले आहे.
- ओमायक्रॉन व्हेरिएन्ट हा डेल्टा व्हेरिएन्टपेक्षा तिप्पट वेगाने संक्रमित होतो.
- याचा प्रसार हवेद्वारे होत असल्याने, मास्कचा वापर, बंदिस्त जागेत गर्दी टाळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

नागरिकांनी घ्यावयाची काळजी

कोविड अनुरूप वर्तन कटाक्षाने पाळावे जसे की मास्क वापरणे, साबण-पाण्याने हात धुणे, सॅनिटायझरचा वापर, शारीरिक अंतर ठेवणे बंधनकारक, हवा खेळती ठेवणे, गर्दी टाळणे, बंदिस्त जागा टाळणे, आपले लवकरात लवकर लसीकरण पूर्ण करून 'स्वतः सुरक्षित व्हा, दुसऱ्यालाही सुरक्षित करा', संशयित लक्षणे वाटल्यास स्वतः ७ दिवस गृह अलगीकरणात राहावे, प्रवाशांनी पहिल्या दिवशी, ८ व्या दिवशी व १४ व्या दिवशी विशेष आरटीपीसीआर किटद्वारे चाचणी करावी, कोविड चाचणी पॉझिटिव्ह आढळल्यास, आवश्यकतेनुसार जनुकीय क्रम निर्धारण करून घेणे.

खेळती हवा, लस आणि मास्क ।
हेच आपुले सुरक्षा टास्क ।।

औषधोपचार

आजमितीला या विषाणूजन्य आजारावर विशिष्ट असे कोणतेही औषध सध्या तरी उपलब्ध नाही, तरी काही उपलब्ध औषधांचा परिणाम यावर चांगला झाल्याचे आढळून येते. जागतिक आरोग्य संघटनेनेखालील औषधींना आकस्मिक वापरासाठी परवानगी दिली आहे.

अ) शिरेद्वारे (Intravenous) देण्यात येणारी औषधी: झेवुडी किंवा, सोत्रोविमाब (Xevudy or Sotrovimab), बामलानिविमाब (Bamlanivimab), इटेसिविमाब (Etesevimab).

ब) तोंडाद्वारे देण्यात येणारी औषधी : पाक्सलोविड (Paxlovid), मोलनुपिरॅवीर (Molnupiravir).

क) मिक्स लसीकरण करणे : उदा. फायझर व मॉडर्नाचे एक-एक डोस घेणे.

स्वयं मर्यादित संसर्ग?

विषाणूशास्त्राच्या तत्त्वांप्रमाणे जो विषाणू घातक असतो त्या विषाणूचा प्रसार हा मर्यादित होतो कारण ज्या व्यक्तीस तो संक्रमित करतो, त्या व्यक्तींसाठी घातक ठरून त्यांचा मृत्यू ओढावण्याची शक्यता दाट असल्यामुळे त्याच्यापासून त्या विषाणूचा पुढील प्रसार मर्यादित होतो, यालाच स्वयं मर्यादित संसर्ग (Self-limiting infection) असे म्हणतात. या उलट जो विषाणू सौम्य असतो, त्या विषाणूचे संक्रमण झाल्यानंतर रोगी लक्षणे विरहित राहतो किंवा त्यास अत्यल्प लक्षणे दिसतात आणि त्यामुळे त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होतो. तथापि, तो रोग्याला घातक ठरत नाही. सकृतदर्शनी ओमायक्रॉन हा दुसऱ्या प्रकारात मोडतो. तसेच ओमायक्रॉन हा कोरोना विषाणूचा प्रकार, डेल्टा या कोरोना विषाणूच्या प्रकारापेक्षा जास्त संक्रमणशील असल्यामुळे, डेल्टासारख्या घातक कोरोना विषाणू प्रकाराला अधिक्रमित करून त्याचा संसर्ग वाढवत असल्याचे दिसते.

विषाणू सौम्य जरी असला तरी, मोठ्या प्रमाणात त्याचा प्रसार झाल्यामुळे किंवा रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या किंवा रोगप्रतिकारशक्तीचे दमन केलेल्या व्यक्तींमध्ये (अवयव प्रत्यारोपण केलेल्या) या विषाणूची अमर्याद वाढ होऊन पुन्हा उत्परिवर्तन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या उत्परिवर्तित विषाणूमुळे कोविडपश्चात काय गुंतागुंती होतात हे स्पष्ट नाही. त्यामुळे ओमायक्रॉनपासून स्वतःला संरक्षित ठेवणेच योग्य.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, कोविड अनुरूप वर्तनाचे पालन करणे व पूर्ण लसीकरण करून घेणे या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

केंद्र शासनाने आता ३ जानेवारी २०२२ पासून १५ ते १८ वयोगटातील किशोरांना कोव्हॅक्सिन लसीने लसीकरण सुरू केले आहे. तसेच १० जानेवारी २०२० पासून सहव्याधी असणाऱ्या ज्येष्ठांनाही बुस्टर डोस देण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही लसीकरणासाठी पात्र लाभार्थींनी तत्काळ लसीकरण करून घेणे अत्यावश्यक आहे.

(लेखक मा. मुख्यमंत्री महोदयांचे सल्लागार व राज्याच्या कोविड-१९ कृती गटाचे मुख्य समन्वयक आहेत.)

कोरोना विषाणू सतत रूप बदलत असला तरी सर्वसामान्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. कोरोना होऊ नये म्हणून जी खबरदारी आजवर आपण घेत आलो आहोत, तीच खबरदारी या विषाणूसाठी पुरेशी आहे. शारीरिक अंतर, हातांची स्वच्छता, मास्कचा वापर या गोष्टी नव्या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक आहेत. राज्य शासनही कोरोना प्रतिबंधासाठी विविध उपाययोजना करत आहे.

कोविड : तथ्य व खबरदारी

डॉ. प्रदीप आवटे

कोरोना विषाणूचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे हा विषाणू त्याच्या जनुकीय रचनेमध्ये सातत्याने बदल करतो आहे. मागील दोन वर्षात अल्फा, बीटा, डेल्टा, ओमायक्रॉन असे अनेक विषाणूमधील बदल आपण पाहिले आहेत.

जनुकीय रचना बदलल्यामुळे विषाणूला काही वेळा नवे गुणधर्म प्राप्त होऊ शकतात. काही वेळा हे बदल विषाणू प्रसारास साहाय्यभूत ठरतात किंवा काही वेळा प्रसाराचा वेग मंदावतो देखील. तसेच विषाणूच्या घातकतेमध्ये देखील बदल होऊ शकतात.

सध्या नव्याने आढळलेला ओमायक्रॉन विषाणू पूर्वीच्या डेल्टापेक्षा वेगाने पसरतो. तसेच तो प्रत्येक व्यक्तीची प्रतिकारशक्ती भेदूनदेखील शरीरामध्ये प्रवेश करू शकतो. परंतु त्याची घातकता डेल्टापेक्षा कमी आहे असून अधिकाधिक व्यक्तींना केवळ सौम्य स्वरूपाचा आजार होताना दिसत आहे.

शासनाने केलेल्या उपाययोजना

कोविड-१९ प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजनांचा एक अविभाज्य भाग म्हणून कोविड विषाणूचे जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोमिक सिक्वेंसिंग) नियमित स्वरूपात करण्यात येत आहे. जनुकीय क्रमनिर्धारण हे प्रयोगशालेय सर्वेक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हे जनुकीय क्रमनिर्धारण दोन प्रकारे करण्यात येत आहे.

सेंटिनल सर्वेक्षण (इंसाकॉग) : राज्यातील पाच प्रयोगशाळा आणि पाच रुग्णालयांची निवड सेंटिनल सेंटर म्हणून करण्यात आली आहे. हे प्रत्येक सेंटिनल सेंटर दर पंधरवड्याला १५ प्रयोगशालेय नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि राष्ट्रीय पेशी विज्ञान संस्था या पुणे स्थित संस्थांना पाठवते. सध्या राज्यात राष्ट्रीय विषाणू विज्ञान प्रयोगशाळा पुणे, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय पुणे, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे, राष्ट्रीय कोषिका विज्ञान प्रयोगशाळा पुणे, राष्ट्रीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन, संस्था पुणे, कस्तुरबा रुग्णालय केंद्रीय प्रयोगशाळा मुंबई या सहा प्रयोगशाळा जनुकीय क्रम निर्धारण काम करत आहेत.

जनुकीय क्रमनिर्धारणासाठी सीएसआयआरसोबत समन्वय : राज्य शासनाने जनुकीय क्रमनिर्धारण सर्वेक्षणास गती मिळावी यासाठी काऊन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च संस्थेंतर्गत काम करणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ जिनोमिक्स ॲण्ड इंटिग्रेटेड बायोलॉजी या प्रयोगशाळेसोबत करार केला असून या नेटवर्कद्वारे दर महिन्याला प्रत्येक जिल्ह्यातून १०० प्रयोगशाळा नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. या जनुकीय क्रमनिर्धारण सर्वेक्षणातून आपण विषाणूमध्ये होत असलेले महत्त्वाचे जनुकीय बदल ओळखतो. त्यातून आढळणाऱ्या व्हेरिएंटचे दोन प्रकार पडतात.

- **व्हेरिएंट ऑफ कन्सर्न :** हा व्हेरिएंट चिंतेचा / काळजीचा मानला जातो. कारण या विषाणूमुळे प्रसाराचा वेग वाढतो किंवा आजाराची तीव्रता वाढते.
- **व्हेरिएंट ऑफ इन्टरेस्ट, व्हेरिएन्ट अंडर इन्वेस्टिगेशन :** या व्हेरिएंटच्या साथरोगशास्त्रीय अभ्यासाची गरज असते कारण त्याचे नेमके गुणधर्म अजून सिद्ध झालेले नसतात.

व्हेरिएंट ऑफ कन्सर्नबाबत कार्यवाही

ज्या जिल्ह्यात व्हेरिएंट ऑफ कन्सर्न असलेले रुग्ण आढळून आले आहेत त्या ठिकाणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. विभागीय पातळीवर रॅपिड रिस्पॉन्स टीम स्थापन करून डेल्टा प्लस रुग्णांचे अन्वेषण. रुग्णाच्या प्रवासाचा इतिहास, त्याच्या लसीकरणाचा इतिहास आणि त्याच्या आजाराचे स्वरूप याबद्दल सविस्तर माहिती संकलित करण्यात येत आहे. युद्धपातळीवर निकट सहवासितांचा शोध घेऊन रुग्णाच्या निकट सहवासितांपैकी कोणाला कोविड सदृश्य लक्षणे असल्यास त्यांचे प्रयोगशाळेकडून नमुने घेण्यात येत आहेत. फ्ल्यू सदृश्य आजाराचे आणि सारी आजाराचे सर्वेक्षण, पुनःसंसर्ग झालेल्या व्यक्तींचा शोध, लसीकरणानंतर कोविड संसर्ग होणाऱ्या रुग्णांचे प्रयोगशाळा नमुने घेतले जात आहेत.

या प्रकारे विषाणूमधील जनुकीय बदलांचा अभ्यास नियमितपणे केल्याने विषाणूमध्ये होणारे बदल लवकर टिपता येतात व त्यानुसार आवश्यक पूर्वतयारी करता येते.

(लेखक राज्याच्या 'एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम'चे राज्य सर्वेक्षण अधिकारी आहेत.)

नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा, मेरी आवाज ही, पहचान है, गर याद रहे, या संगीतमय धूनवर स्वरमय वातावरणात स्वरसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांना अखेरचा निरोप देण्यात आला. दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पार्थिवावर शासकीय व लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्वरसम्राज्ञीला आदरांजली

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या वतीने वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे, ज्येष्ठ नेते शरद पवार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्री पियूष गोयल, उद्योगमंत्री सुभाष देसाई, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अनिल देसाई, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, आमदार सुनील प्रभू, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, मिलिंद नार्वेकर, महापालिका आयुक्त इकबाल सिंह-चहल, तसेच लता मंगेशकर यांच्या कुटुंबातील ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, भारतरत्न सचिन तेंडुलकर, लेखक-गीतकार जावेद अख्तर, गायिका अनुराधा पौडवाल, अभिनेता शाहरुख खान, अमीर खान, रणबीर कपूर, गायक शंकर महादेवन, चित्रपट क्षेत्रातील मान्यवर, भारतरत्न लता मंगेशकर यांचे असंख्य चाहते, चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थितांनी आदरांजली वाहिली.

सुमधुर आवाजाने लोकांना मंत्रमुग्ध करण्याची अतुलनीय क्षमता

भारतरत्न लता मंगेशकर आपल्यात नाहीत. त्यांच्या जाण्याने एक पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरली जाऊ शकत नाही. येणारी पिढी त्यांना स्मरणात ठेवेल, त्यांच्या सुमधूर आवाजात लोकांना मंत्रमुग्ध करण्याची अतुलनीय क्षमता होती. लतादीदींच्या गाण्यांनी विविध प्रकारच्या भावना प्रकट केल्या. त्यांनी अनेक दशकांपासून भारतीय चित्रपट जगतातील स्थित्यंतरे जवळून पाहिली. त्या नेहमीच भारताच्या प्रगतीबद्दल उत्कट होत्या. त्यांना नेहमीच एक मजबूत आणि विकसित भारत पाहायचा होता. लतादीदींकडून मला नेहमीच अपार स्नेह मिळाला, हा मी माझा सन्मान समजतो. माझा त्यांच्याशी झालेला संवाद अविस्मरणीय राहील.

- नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

संगीत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवले

भारतरत्न लता मंगेशकर यांचे निधन ही देशातील प्रत्येक कुटुंबाकरिता दुःखद बातमी आहे. हा दिवस अटळ आहे हे माहिती असूनदेखील हा दिवस येऊच नये, असे वाटत होते.

भारतरत्न लता मंगेशकर यांचे संगीत देश, भाषा व काळ यांच्या सीमा उल्लंघून थेट अंतरात्म्याला जागवणारे होते. आपल्या

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिवंगत ज्येष्ठ पार्श्वगायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

भावगीतांनी ईश्वराला जागवण्याची, प्रेमगीतांनी तरुणाईला खुलवण्याची, देशभक्तीपर गीतांनी जवानांना स्फुरण देण्याची, तर प्रेमळ अंगाईगीतांनी तान्हुल्यांना निजवण्याची अद्‌भुत जादू त्यांच्या स्वरात होती. अभिजात भारतीय संगीत सुलभ करून लतादीदींनी ते समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवले.

- भगतसिंह कोश्यारी, राज्यपाल

मातृतुल्य आशीर्वाद हरपला

लतादिदींच्या जाण्याने एका स्वरयुगाचा अंत झाला, एक महान पर्व संपले. आमच्यावरचा मातृतुल्य आशीर्वाद हरपला आहे. स्वरसम्राज्ञी लतादिदी आपल्यातून देहाने नाहीशा झाल्या. हे अत्यंत दुःखद आहे. पण त्या त्यांच्या अमृत स्वरांनी अजरामर आहेत, विश्व व्यापून राहिल्या आहेत. त्या अर्थाने त्या आपल्यातच राहतील. अनादि आनंदघन म्हणून त्या स्वर अंबरातून आपल्यावर स्वरअमृत शिंपीत राहतील.

आपल्या लाडक्या लतादिदी आपल्यात नाहीयेत, हे सुन्न करणारे आहे. पण त्या स्वरांनी, सुरेल गाण्यांनी, चिरपरिचित आवाजाने त्या अजरामर आहेत आणि राहतील. आपल्या आयुष्यातील जवळपास सर्वच प्रसंग, क्षण लतादिदींनी आपल्या सुमधुर सुरावटींनी जिवंत केले आहेत. त्यांच्या स्वरांनी मंगल क्षण सजले. दुःखद क्षणी याच स्वरांनी सगळ्यांच्या मनाचा ठाव घेतला. लढाई, संघर्षात याच स्वरांनी उर्मी, स्फुर्ती जागवली.

- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री

स्वर्गीय सूर हरपला

'अजीब दास्ताँ है ये... कहाँ शुरू कहाँ खतम्, ये मंजिलें हैं कौनसी...? ना वो समझ सके, ना हम...' यासारख्या हजारो सुमधुर गाण्यांनी कोट्यवधी रसिकांच्या हृदयसिंहासनावर आठ दशकांहून अधिक काळ अधिराज्य करणाऱ्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर हे भारतीयच नव्हे तर, जागतिक संगीत विश्वाला पडलेले अद्‌भुत स्वप्न होते. लतादिदींच्या निधनाने ते स्वप्न भंगले आहे. संगीतविश्वातला स्वर्गीय सूर हरपला आहे. लतादिदींच्या जाण्याने महाराष्ट्रातला, देशातला प्रत्येक जण, प्रत्येक घर शोकाकूल आहे. स्वर्गीय आनंद देणारी लतादिदींची गाणी, त्यांचे दैवी सूर हे आकाशात सूर्य-चंद्र असेपर्यंत राहतील. लतादिदी जगात एकमेव होत्या. त्यांच्यासारखी गानकोकिळा पुन्हा होणे नाही.

- अजित पवार, उपमुख्यमंत्री

सुमधूर सुरांमधून लतादीदी अजरामर

स्वरसम्राज्ञी, भारतरत्न लता मंगेशकर यांचे निधन अत्यंत वेदनादायी आहे. आपल्या दैवी स्वरांच्या माध्यमातून जगभरातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होते. लतादीदी आज शरीराने आपल्यातून निघून गेल्या असल्या तरी आपल्या सुमधुर स्वरांनी त्या अजरामर झाल्या असून गाण्यांच्या माध्यमातून आपल्या सर्वांसोबत कायमच राहतील.

- बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

अलौकिक सूर हरपले

आपल्या अलौकिक सूरांनी संपूर्ण विश्वाला मंत्रमुग्ध करणाऱ्या भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्र मूक झाले आहे. लतादीदींनी आपल्या अतुलनीय सुरांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींच्या अनेक पिढ्यांना पडद्यावर आवाज देऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवले. प्रदीर्घ काळ पार्श्वगायन क्षेत्रावर त्यांची मोहिनी होती आणि पुढेही राहील. देशाप्रति अत्यंत अभिमान असलेल्या लतादीदी संपूर्ण विश्वात भारताचा अभिमान म्हणून आदरास प्राप्त झाल्या. त्यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे.

- अमित देशमुख,
सांस्कृतिक कार्य मंत्री

टीम लोकराज्य

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ पार्श्वगायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

कोविड-१९ सह ओमायक्रॉन व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढवणारे होते, तरीही प्रशासनाने यासाठी अधिक उपाययोजना आखल्या व त्याची अंमलबजावणी चालू आहे. आपण सर्वांनी नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीतही मोठ्या जिद्दीने आणि धैर्याने शासन सर्व संकटावर मात करत पुढचे पाऊल टाकत आहे. वेळोवेळी घेतलेले निर्णय, प्रकल्पांचा शुभारंभ अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

पाऊल पडते पुढे

निर्भया उपक्रमांचे उद्घाटन

महिला अत्याचाराच्या घटना घडूच नयेत, दुर्दैवाने घडल्याच तर तिथल्या तिथे आरोपींचा बंदोबस्त करणारी यंत्रणा उभी राहावी, यासाठी मुंबई पोलीस दलाने निर्भया पथक व इतर उपक्रमांच्या माध्यमातून महिला सुरक्षिततेसाठी एक अतिशय महत्त्वाचे पाऊल टाकल्याचे व यामुळे महिला सुरक्षेच्या कामाला अधिक बळकटी प्राप्त होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या दूरस्थ उपस्थितीत निर्भया पथकाचे तर मान्यवरांच्या उपस्थितीत इतर विविध निर्भया उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, दूरदृश्यप्रणालीद्वारे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, गृह राज्यमंत्री (शहरे) सतेज पाटील तसेच मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रियंका चतुर्वेदी, खासदार अरविंद सावंत यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस दलातील इतर वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या वेळी निर्भया पथकातील नवीन वाहनांचे मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले.

निर्भया पथक उद्घाटन कार्यक्रम.

दुर्गम भागात ड्रोनद्वारे लस

जव्हारसारख्या दुर्गम भागात ड्रोनद्वारे लस वाहतुकीचा यशस्वी प्रयोग करणाऱ्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे तसेच पालघर जिल्हा प्रशासनाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे. अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमांची देशपातळीवर प्रथमत: अंमलबजावणी करत महाराष्ट्राने नेहमीच आपले पाऊल पुढे टाकले आहे. ड्रोनद्वारे लस वाहतुकीच्या या उपक्रमाने दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांची आरोग्य रक्षणाची वाट अधिक प्रशस्त आणि सोपी झाली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा जनहितासाठी किती उत्तमपणे उपयोग करून घेता येतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. कर्तव्याप्रती समर्पित राहून एका वेगळ्या ऊर्जेने काम केल्याबद्दल तसेच सर्वसामान्यांची आरोग्य सुविधा प्रभावीपणे त्यांच्यापर्यंत वेगाने पोहोचवल्याबद्दल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव प्रदीप व्यास व पालघरचे जिल्हाधिकारी माणिक गुरसळ यांच्यासह आरोग्य विभागातील तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी कौतुक केले आहे.

जव्हार स्टेडियम ते प्राथमिक आरोग्य केंद्र झापमधील अंतर २५ कि.मी. आहे. जिथे रस्त्याने हे अंतर पार करण्यासाठी अंदाजे एक तासाचा कालावधी लागतो तिथे ड्रोनच्या साहाय्याने केवळ ९ मिनिटांत कोव्हिशिल्ड लसीचे ३०० डोस प्राथमिक आरोग्य केंद्र झाप येथे पाठवण्यात आले एवढेच नव्हे, तर यातून लगेचच नागरिकांचे लसीकरणदेखील करण्यात आले. हा नावीन्यपूर्ण उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाने ब्ल्यू इन्फिनिटी इनोव्हेशन लॅब आणि आय आय एफ एल फाऊंडेशनच्या मदतीने यशस्वीरितीने पूर्ण केला. यामुळे लसीची शीतसाखळी अबाधित राखणे, प्रवासादरम्यान होणाऱ्या वेळ आणि श्रमाची बचत होण्यास मदत झाली आहे.

मुंबई किनारा रस्ता प्रकल्प

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प हे सर्व मुंबईकरांचे स्वप्न आहे. मुंबईकरांच्या जीवनाला गती देणाऱ्या या प्रकल्पाचे बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मेहनतीने आणि चिकाटीने करण्यात येत आहे. ठरलेल्या कालावधीत हा प्रकल्प पूर्ण होईल, याचा मला आत्मविश्वास असून प्रकल्पाच्या पहिल्या बोगद्याचे खणन जलदगतीने पूर्ण होणे, ही त्याची पोचपावतीच आहे, असे उद्‌गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले.

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (कोस्टल रोड) बांधकामात, पॅकेज ४ अंतर्गत प्रियदर्शिनी पार्क ते छोटा चौपाटी दरम्यान २.०७० किलोमीटर अंतराचा बोगदा दोन्ही बाजूने बांधण्यात येत आहे. पैकी मरिन ड्राईव्हकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी वापरात येणाऱ्या पहिल्या बोगद्याचे खणन १० जानेवारी २०२२ रोजी पूर्ण झाले. त्या प्रसंगी आयोजित 'ऑनलाईन' समारंभात मुख्यमंत्री श्री. ठाकरे हे दूरदृश्यप्रणालीद्वारे बोलत होते.

या वेळी पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, खासदार अरविंद सावंत, महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, प्रभाग समिती अध्यक्ष मीनल पटेल हेदेखील दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते, तर मुंबईच्या महापौर किशोरी किशोर पेडणेकर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे आदी मान्यवर स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे उपस्थित होते.

'व्हॉट्सअप चॅट-बॉट' सुविधेचे लोकार्पण

नागरिकांसाठीच्या तब्बल ८० सुविधा त्यांच्या मोबाईलवर 'व्हॉट्सअप चॅट-बॉट' द्वारे सहजपणे उपलब्ध करून देणारी बृहन्मुंबई महानगरपालिका ही देशातील पहिली पालिका असून माहिती तंत्रज्ञानाचा नागरिकांना अधिकाधिक उपयोग कसा करून देता येईल याचे हे उत्तम उदाहरण आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महानगरपालिकेचे कौतुक केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'व्हॉट्सअप चॅट-बॉट' या तंत्रज्ञानस्नेही व लोकाभिमुख उपक्रमाचे लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले.

'व्हॉट्सअप चॅट-बॉट'द्वारे जनतेला ८० हून अधिक सुविधा घरबसल्या उपलब्ध करून देण्यात येत आहेत. 'आपली मुंबई, माझी मुंबई' साठी सातत्याने कार्यरत असणाऱ्या देशातील क्रमांक एकच्या महानगरपालिकेद्वारे ही सुविधा ८९९९-२२-८९९९ या क्रमांकाद्वारे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी घोषित करत या सुविधेचा स्वतः वापर करत लोकार्पण केले.

या वेळी अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) आश्विनी भिडे, साहाय्यक आयुक्त (माहिती तंत्रज्ञान) शरद उघडे आदी उपस्थित होते.

फुटबॉल महाराष्ट्र एक्सलन्स सेंटर

नवी मुंबई, खारघर येथील फुटबॉल उत्कृष्टता केंद्राचे उद्‌घाटन दूरदृश्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमल, खासदार तथा ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष व महिला आशिया चषक भारत २०२२ चे अध्यक्ष प्रफुल्ल पटेल, खासदार श्रीरंग बारणे, आमदार बाळाराम पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आदेश बांदेकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी हे दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून, तर नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी, सहव्यवस्थापक कैलास शिंदे उपस्थित होते.

चरित्र-साधने प्रकाशन कार्यासाठी निधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे या मराठी अनुवादित खंडाच्या माध्यमातून त्यांचे विचार ग्रामीण भागातील तरुणांपर्यंत पोहोचवण्यास मदत होणार

अजित पवार
उपमुख्यमंत्री

आहे. डॉ. आंबेडकरांच्या इंग्रजी भाषेतल्या २२ खंडांचा मराठी अनुवाद प्रकाशित करण्याचे काम समितीने युद्धपातळीवर करावे. या कामासाठी शासन निधी कमी पडू देणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

मंत्रालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे या इंग्रजी खंड ६ च्या मराठी अनुवादाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या खंडामध्ये डॉ. आंबेडकरांचे 'पीएच.डी.'च्या 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्त व्यवस्थेची उत्क्रांती' आणि 'डी.एससी.'च्या 'प्रॉब्लेम ऑफ रूपी' या शोध प्रबंधाचे मराठीत

भाषांतर केले आहे. या प्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे या कार्यासाठी अभिनंदन केले.

या कार्यक्रमास समितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत, समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, समितीचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, सदस्य डॉ. प्रज्ञा पवार, सहसंचालक डॉ. सोनाली रोडे, सदस्य धनराज कोहचाडे, दूरदृश्यप्रणालीद्वारे एन जी कांबळे, एम एल कासारे, गिरीराज बागुल आदींसह समितीचे सदस्य उपस्थित होते.

ऑनलाईन लॉटरी सोडत संपन्न

प्रत्येकाला हक्काचे घर मिळाले पाहिजे, हे राज्य शासनाचे धोरण आहे. पुणे म्हाडाच्या ४ हजार २२२ नवीन सदनिकांची सोडत ही त्याच धोरणाच्या दिशेने पडलेले आश्वासक पाऊल आहे. 'सर्वांसाठी घरे' हा कार्यक्रम शासनामार्फत प्राधान्याने राबवणार असून म्हाडाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

पुणे येथील जिल्हा परिषदेच्या नवीन सभागृहात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ अर्थात, पुणे म्हाडाच्या ४ हजार २२२ नवीन सदनिकांची ऑनलाईन लॉटरी सोडतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार मुंबई येथील शासकीय निवासस्थानातील कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमास गृहनिर्माण राज्यमंत्री सतेज पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष निर्मला पानसरे, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर, पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी अधिकारी नितीन माने उपस्थित होते.

शिवडी-न्हावाशेवा सी-लिंकची पाहणी

मुंबई शहराला नवी मुंबई शहर आणि रायगड जिल्ह्याशी जोडणाऱ्या शिवडी-न्हावा शेवा पारबंदर प्रकल्पातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पडला. या प्रकल्पात ऑर्थोट्रोपिक स्टिल डेक सुपर स्ट्रक्चरच्या पहिल्या गाळ्याची यशस्वीरीत्या उभारणी करण्यात आली. या वेळी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पीड बोटीतून या कामाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात खासदार राजन विचारे, एमएमआरडीएचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एकनाथ शिंदे
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

शिवडी आणि न्हावा शेवा या दरम्यान उभारण्यात येत असलेला पारबंदर मार्ग हा भारतातील सगळ्यात मोठा पारबंदर मार्ग आहे. तब्बल २२ किलोमीटर लांबीचा असा हा पारबंदर (सी-लिंक) प्रकल्प असून १८ हजार कोटी रुपये खर्च करून हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात ऑर्थोट्रोपिक स्टिल डेक सुपर स्ट्रक्चरच्या पहिल्या गाळ्याची उभारणी करण्यात आली. टाटा प्रोजेक्ट्स-देवू जेव्ही यांच्या माध्यमातून हे काम पूर्ण करण्यात येत असून असे ३२ गाळे बसवून हा ७.८१ किलोमीटर लांबीच्या पुलाचे काम पूर्ण केले जाणार आहे. या गाळ्याच्या फॅब्रिकेशनचे काम जपान, दक्षिण कोरिया, तैवान, व्हिएतनाम, म्यानमार या देशात करण्यात आले असून १८० मीटर एवढ्या लांबीच्या अजस्त्र गर्डर तयार करण्यात आले आहे. या संपूर्ण स्ट्रक्चरचे लॉंचिंग करण्यासाठी एका खास बार्जची निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात शिवाजी नगर येथील इंटरचेंजचे काम देखील करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे काम जवळपास ६५ टक्के पूर्ण झाले असून डिसेंबर २०२३ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे.

नूतनीकरण आणि विशेष दुरुस्ती

मुळा प्रकल्पांतर्गत कालवे नूतनीकरण आणि विशेष दुरुस्ती कार्यक्रम तत्काळ हाती घेण्यात यावा. त्यासाठीचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिले.

मुळा प्रकल्पांतर्गत विविध प्रकारच्या कामांबाबत जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या वेळी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, जलसंधारण विभागाचे अपर मुख्य सचिव नंदकुमार, जलसंपदा सचिव बसवंत स्वामी, मुख्य अभियंता अतुल कपोले आदी उपस्थित होते.

जयंत पाटील
जलसंपदा मंत्री

मुळा प्रकल्पांतर्गत कालव्याचे लायनिंग करावे, त्यासाठी येत्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करावी. यासाठी नियोजन आणि वित्त विभागाकडे पाठपुरावा करावा. प्रशासकीय मान्यता घेऊन पुरवणी मागण्यांमध्ये निधीची मागणी करावी, अशा सूचना मंत्री श्री.पाटील यांनी दिल्या.

या बैठकीत मुळा प्रकल्पांतर्गत उजव्या कालव्यावरील सर्व गेट बदलणे, जायकवाडी बँक वॉटरमधील गावांना नागरी सुविधा पुरवणे, भातोडी तलाव मृद् आणि जलसंधारण विभागाकडे सोपवणे आदी

मुद्द्यांवर चर्चा झाली.

ई-पीक पाहणी

राज्यातील महसूल आणि कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता असलेला महत्त्वाकांक्षी ई-पीक पाहणी प्रकल्प राजस्थान सरकारने स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. राजस्थानचे महसूल मंत्री रामलाल जाट यांनी महाराष्ट्राचा 'ई-पीक पाहणी' प्रकल्प राजस्थानमध्ये 'ई-गिरदावरी' म्हणून स्वीकारला असल्याची माहिती महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली.

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

महसूल विभागाने टाटा ट्रस्टच्या मदतीने ई-पीक पाहणी प्रकल्प विकसित केला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते १५ ऑगस्ट २०२१ पासून हा प्रकल्प राज्यव्यापी लागू करण्यात आला आहे. हा प्रकल्प महसूल आणि कृषी विभागासाठी महत्त्वाचा प्रकल्प ठरणार आहे. राजस्थानप्रमाणेच देशातील इतर राज्येही हा प्रकल्प स्वीकारून लवकरच हा प्रकल्प देशव्यापी स्तरावर राबवला जाईल, असा विश्वास वाटतो,' असेही श्री. थोरात यांनी सांगितले.

गुंतवणूक करार

दुबई वर्ल्ड एक्स्पोच्या अभूतपूर्व यशानंतर उद्योग विभागाने गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याचा वेग कायम ठेवला असून विविध १२ कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत. उद्योगमंत्री सुभाष देसाई, अतिरिक्त मुख्य सचिव बलदेव सिंग, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन व विविध कंपन्यांचे उद्योजक या वेळी उपस्थित होते.

यानिमित्ताने मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० या उपक्रमांतर्गत एकूण १.८८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करून ३ लाख ३४ हजारांहून अधिक रोजगार उपलब्ध करण्यात राज्य यशस्वी ठरल्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी नमूद केले. झालेल्या १२ सामंजस्य करारातून राज्यात ९००० पेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुंतवणूक करार पूर्णत्वास येण्यासाठी उद्योग विभागाने कंबर कसली आहे. या गुंतवणुकीद्वारे राज्याचा सर्वांगीण औद्योगिक विकास साधण्यात येणार आहे. या करारातून संरक्षण, अंतराळ संशोधन, माहिती-तंत्रज्ञान, जैव-इंधन, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती, निर्यात प्रधान उद्योग, अन्न प्रक्रिया, स्टिल, इथेनॉल, औषध निर्माण आदी क्षेत्रांना चालना मिळणार आहे. या गुंतवणूकदारांमध्ये ग्रासिम इंडस्ट्रिज, सोलार एव्हिएशन, पद्मावती पेपर्स, देश ग्रो, डी डेकॉर या नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.

सुभाष देसाई
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

पहिल्या इव्ही पोलचे उद्घाटन

भायखळा व दादर परिसरातील इलेक्ट्रिक वाहन वापरकर्त्यांसाठी मजेंडा व मध्य रेल्वेच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या देशातील पहिल्या चार्जिंग पोलचे उद्घाटन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते परळ येथे करण्यात आले.

राज्यात दिवसेंदिवस इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढत आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीला चालना देण्यासाठी राज्य शासनाने विशेष धोरण तयार केले असून इलेक्ट्रिक दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांना अनुदान देण्यात येते. एका बसमागे २० लाख रुपये अनुदान दिले जाते. याशिवाय इलेक्ट्रिक वाहने, उत्पादन, चार्जिंग स्टेशन आदींसाठी अनुदान दिले जाते. विशेष म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांच्या नोंदणीसाठी शुल्क आकारले जाणार नाही. इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशनची संख्या वाढत आहे. येत्या काळात केंद्राने अधिक प्रोत्साहने वाढवण्यावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे श्री. देसाई यांनी सांगितले.

'ईडब्ल्यूएस' आरक्षण : केंद्राकडे पाठपुरावा

आर्थिकदृष्ट्या मागास आरक्षणासाठी कमाल ५ एकर जमीनधारणेच्या मर्यादेची अट शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असून, यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करून ही अट शिथिल करण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी केली जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी दिली.

अशोक चव्हाण
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात या अटीचा उल्लेख आहे. राज्यात एकत्रित कुटुंबांची संख्या मोठी असून, अन्य कोणत्याही आरक्षणाचे लाभ मिळत नसलेले बहुतांश शेतकरी कुटुंबे केंद्र सरकारच्या या अटीमुळे १० टक्के आर्थिकदृष्ट्या मागास आरक्षणापासूनदेखील वंचित राहणार

आहेत. या गंभीर विषयासंदर्भात राज्य सरकारकडून केंद्राचे लक्ष वेधण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. याबाबत राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे, खासदार संजय राऊत यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा झाली असून, माजी कृषिमंत्री खासदार शरद पवार यांच्याशीही चर्चा करणार असल्याची माहिती श्री.चव्हाण यांनी दिली.

महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात जमीनधारणेचे प्रमाण जास्त आहे. केवळ या विभागांमध्येच नव्हे, तर इतरही विभागांत अविभाजित कुटुंबांमध्ये ५ एकरांपेक्षा जास्त शेतजमीन असू शकते. ५ एकरांपेक्षा जास्त जमीन असली तरी बहुतांश शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असते. त्यामुळे मराठा समाजासह इतर अनेक समाजातील शेतकऱ्यांना केंद्राच्या या शिफारशीमुळे मोठे नुकसान सोसावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्राने कमाल ५ एकर जमीनधारणेच्या अटीवर फेरविचार करावा आणि सर्वोच्च न्यायालयात तातडीने सुधारित प्रतिज्ञापत्र दाखल करावे, अशी राज्य शासनाची मागणी असल्याचे श्री.चव्हाण यांनी सांगितले.

गुणसंवर्धित तांदळाचे वितरण

अनिमिया आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, केंद्र शासनाकडून २०२२ पर्यंत राज्यासाठी सर्व जिल्ह्यांना गुणसंवर्धित तांदूळ म्हणजेच फोर्टीफाईड राईस वाटप करण्यात येणार आहे. या तांदळाच्या वितरणासाठी प्रशासकीय यंत्रणांनी त्यांच्या स्तरावरील कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

मंत्रालयातील दालनात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गुणसंवर्धित तांदळाच्या वितरणाचे प्रमाण वाढवणे व इतर उपाययोजना संदर्भात बैठक झाली. या वेळी अन्न, नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे, शिधावाटप नियंत्रक कान्हूराज बगाटे व वैधमापन शास्त्र विभागाचे नियंत्रक रविंद्र सिंघल, सहसचिव सुधीर तुंगार उपस्थित होते.

छगन भुजबळ
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

देहविक्री करणाऱ्या महिलांना शिधापत्रिका

अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पीडित महिलांना तसेच देहविक्री व्यवसायातील महिलांना शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

वेश्या व्यवसाय, बालवेश्या व वेश्यांच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी स्थापन केलेल्या सल्लागार समितीच्या सूचनेनुसार त्यांना शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन याबाबत शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था व राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्याकडे असणाऱ्या यादीतील स्वयंसेवी संस्थांकडून अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या पीडित महिला व देहविक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना शिधापत्रिका देण्यात येणार आहे.

नवीन शिधापत्रिकेसाठी आवश्यक असलेले पुरावे सादर करण्यामध्ये त्यांना येणाऱ्या अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून ओळखीचा पुरावा व वास्तव्याचा पुरावा सादर करण्यापासून त्यांना सूट देण्यात येत आहे. या कागदपत्रांची संबधितांकडून मागणीदेखील करण्यात येऊ नये, असे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

होमगार्डसाठी विशेष धोरण

पोलीस दलास कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी होमगार्डची मोठ्या प्रमाणावर मदत होते. राज्यात कार्यरत होमगार्डना नियमित स्वरूपात १८० दिवस काम देण्यासाठी विशेष धोरण तयार करण्याच्या सूचना गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिल्या.

दिलीप वळसे-पाटील
गृहमंत्री

होमगार्ड आणि महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या विविध समस्यांच्या अनुषंगाने मंत्रालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत होमगार्डसाठी असलेले अनुदान, कर्तव्य भत्ता अदा करण्यासाठी नियमित निधी उपलब्ध करून देणे तसेच एका आठवड्याच्या आत कर्तव्य भत्ता अदा करणे, मानसेवी अधिकाऱ्यांची नियुक्ती तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे लेखापरीक्षण, प्रलंबित सुरक्षा शुल्क वसुली यांसह विविध समस्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव संजय सक्सेना, राज्य सुरक्षा बलाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक देवेन भारती, पोलीस महासंचालक के. वेंकटेशम, अतिरिक्त पोलीस महासंचालक ब्रिजेश सिंग उपस्थित होते.

राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेत यश

केंद्र शासनामार्फत दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राने घवघवीत यश मिळवले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून गेलेल्या युवक-युवतींनी ८ सुवर्ण, ४ रजत, ७ कांस्य आणि ११ उत्तेजनार्थ पदके अशा एकूण ३० पदकांची कमाई केली आहे. महाराष्ट्राने पदकसंख्येत देशात दुसरे स्थान पटकावले

नवाब मलिक
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,
अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

आहे. पुरस्कार विजेते तरुण-तरुणी आता शांघाय (चीन) येथे होणाऱ्या जागतिक स्किल्स चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरले असून त्यांना आपले कौशल्य जागतिक स्तरावर प्रदर्शित करता येणार आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील यशाबद्दल सर्व युवकांचे कौशल्य विकास मंत्री नवाब मलिक यांनी अभिनंदन केले असून त्यांना जागतिक स्किल्स चॅम्पियनशिपसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कौशल्य विकास सोसायटीमार्फत या विद्यार्थ्यांची जागतिक स्किल्स चॅम्पियनशिपसाठी तयारी करून घेण्यात येत आहे.

स्पर्धेमध्ये १० सुवर्णपदकांसह एकूण ४९ पदके पटकावून ओडिशा राज्याने प्रथम क्रमांक पटकावला, तर ८ सुवर्णपदकांसह एकूण ३० पदके पटकावून महाराष्ट्र राज्य द्वितीय क्रमांकावर आले.

औषध विक्रेत्यांसोबत बैठक

ग्राहकांना योग्य दरात औषधे मिळावीत, त्यांना आरोग्याच्या सेवा मिळाव्यात त्याचप्रमाणे या सेवा पुरवणाऱ्या औषध विक्रेत्यांनाही न्याय मिळावा ही शासनाची

डॉ. राजेंद्र शिंगणे
अन्न व औषध प्रशासन मंत्री

भूमिका आहे, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सांगितले.

परवानाधारक औषध विक्रेते यांच्याविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत व घाऊक औषध विक्रेत्यांच्या तपासणी अनुषंगाने मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव विजय सौरभ, आयुक्त परिमल सिंह, सह सचिव दौलत देसाई सहआयुक्त दा. रा. गहाणे यांच्यासह महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, तसेच हकुमराज मेहता, नितीन मनियार, सुनिल छाजेड, दिलीप देशमुख अनिल नावंदर, प्रसाद दानवे हे संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अधिक लस पुरवठ्याची मागणी

कोविड-१९ विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरियंटचा प्रसार रोखण्यासाठी लसीकरणाची गती वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कोव्हिशिल्ड ५० लाख आणि कोव्हॅक्सिनच्या ४० लाख लसींच्या मात्रांचा पुरवठा करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली.

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विविध राज्यातील मुख्यमंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्यासमवेत दूरदृश्य प्रणालीद्वारे कोविड स्थितीबाबत आढावा घेतला. बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मंडाविया, राज्यमंत्री डॉ. भारती पवार, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, आरोग्य मंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती आदी उपस्थित होते.

'हर घर है डोनर' मोहीम

अवयवदान करण्याची चळवळ व्यापक होण्यासाठी 'हर घर है डोनर' मोहीम उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी केले.

अवयवदान चळवळ व्यापक व्हावी यासाठी 'हर घर है डोनर' मोहिमेची सुरुवात करण्यात आली. राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि प्रोजेक्ट मुंबई स्वयंसेवी संस्था यांच्या सहयोगाने ही मोहीम राबवण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी 'हर घर है डोनर' या अनोख्या मल्टी ऑर्गन आणि कॅडेव्हर दान जनजागृती मोहिमेचा दूरदृश्यप्रणालीद्वारे आरंभ केला. अवयवदानाचा निर्णय ब्रेन डेड झालेल्या व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांकडून घेतला जातो. पण याबाबत पुरेशी आणि योग्यरीत्या जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी 'हर घर है डोनर' ही योग्य संकल्पना आहे. या चळवळीत शासन आणि स्वयंसेवी संस्था एकत्र आल्या तरच जनजागृती होईल, असे श्री. टोपे यांनी सांगितले.

या वेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव प्रदीप व्यास, संचालक आरोग्य सेवा डॉ. रामास्वामी, यांच्या उपस्थितीत या मोहिमेचा आरंभ करण्यात आला.

माझी वसुंधरा अभ्यासक्रम

शिक्षण म्हणजे केवळ शालेय अभ्यासक्रम नसून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक घडवणे याला अधिक महत्त्व आहे. वातावरणीय बदलांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जागृतीसाठी पर्यावरण विभागाने अतिशय उपयुक्त अभ्यासक्रम तयार केला असून शालेय शिक्षण विभाग त्याची कालबद्ध अंमलबजावणी करून आपली जबाबदारी निश्चित पूर्ण करेल, असे शालेय शिक्षण मंत्री

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने युनिसेफच्या साहाय्याने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वातावरणीय बदल म्हणजे नक्की काय, त्याचे परिणाम आणि आपण काय करायला हवे याबाबत माहिती देणारा 'माझी वसुंधरा' अभ्यासक्रम तयार केला आहे. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी या अभ्यासक्रमाची पुस्तके शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्याकडे सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या कार्यक्रमात सुपुर्द केली. या वेळी शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंटचे महासंचालक जयराज फाटक, युनिसेफचे श्रीमती राजलक्ष्मी, श्री.युसूफ, माझी वसुंधरा अभियानाचे संचालक सुधाकर बोबडे आदी उपस्थित होते.

पुनर्विकास प्रकल्पाला प्रारंभ

नायगाव येथील बीडीडी चाळ पाडल्यानंतर रिक्त जागी होणाऱ्या नव्या इमारतींच्या बांधकामामुळे नायगाव बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्याला प्रारंभ होत आहे. बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प लवकरच जलद गतीने पूर्ण करून मार्गी लावला जाईल, असे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

मुंबईतील नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५-बी निष्कासित करून पाडण्याचे काम सुरू करण्यात आले. त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ केला जाणार आहे. या वेळी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, कार्यकारी अभियंता प्रशांत धात्रक आदी उपस्थित होते.

डॉ. जितेंद्र आव्हाड
गृहनिर्माण मंत्री

बीडीडी चाळींच्या प्रत्येक दगडाला इतिहास असून सामाजिक, सांस्कृतिक चळवळीची साक्ष देणाऱ्या या चाळी आहेत. सुमारे शंभर वर्ष जुन्या या चाळीतील इमारतींच्या पुनर्विकासाद्वारे येथील रहिवाशांना सर्व सुविधायुक्त मोठे घर देऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्याचे अनेक वर्षापासून पाहिलेले स्वप्न नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५-बी निष्कासित करून प्रत्यक्षात साकारत आहे. आशिया खंडातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या व राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाकरिता शासनाने म्हाडाची 'सुकाणू अभिकरण' म्हणून नियुक्ती केली आहे, असेही मंत्री डॉ.आव्हाड यांनी सांगितले.

बैलगाडा शर्यतीच्या नियमांचे पालन

राज्य सरकारच्या पाठपुराव्याने बैलगाडा शर्यतीला महाराष्ट्रात परवानगी मिळाली आहे. बैलगाडा शर्यतीला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील बैलगाडा शर्यत सुरू करण्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, या संदर्भातील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी केले आहे

प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम २०१७ च्या नियमांचे पालन करून राज्यात बैलगाडा शर्यतीच्या आयोजनास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. या नियमांचा भंग झाल्यास गुन्हे दाखल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या बंदी आदेशामुळे राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून बैलगाडा शर्यत बंद होती. या प्रकरणी शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. बैलगाडा शर्यतीस सर्वोच्च न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. त्यानुसार राज्य सरकारने मंजूर केलेल्या अधिनियम २०१७ च्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून बैलगाडा शर्यत आयोजनास पशुसंवर्धन विभागाने परवानगी दिली असून त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचेही मंत्री श्री.केदार सांगितले.

सुनील केदार
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

क्रीडा संकुलांच्या अनुदानात वाढ

राज्यातील क्रीडा संस्कृतीस प्रोत्साहन मिळण्याकरिता व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी सुसज्ज, सर्व सुविधांयुक्त क्रीडा संकुले

उभारण्याकरिता क्रीडा संकुलांच्या अनुदानात भरीव वाढ करण्यात आली असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी दिली.

राज्याच्या क्रीडा धोरण २००१ अंतर्गत विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल निर्माण करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. या क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा ठरवली होती. त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. अनुदान मर्यादेमध्ये वाढ करून तालुका क्रीडा संकुलासाठी १ कोटी रुपयांवरून ५ कोटी रुपये, जिल्हा क्रीडा संकुलासाठी ८ कोटी रुपयांवरून २५ कोटी रुपये आणि विभागीय क्रीडा संकुलासाठी २४ कोटी रुपयांवरून ५० कोटी रुपये याप्रमाणे अनुदान मर्यादा निश्चित करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. ही सुधारित अनुदान मर्यादा, यापुढे प्रशासकीय मान्यता देण्यात येणाऱ्या व बांधकाम सुरू करण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलांसाठी ही लागू राहणार आहे.

पुनर्वसनाचा प्रश्न प्राधान्याने सोडवणार

कोयना वन्यजीव प्रकल्पातील बाधित मौजे वेळे ग्रामस्थांच्या मागणीबाबत शासन सकारात्मक आहे. ग्रामस्थांनी पुनर्वसनाच्या अनुषंगाने केलेल्या मागणीनुसार कार्यान्वयीन यंत्रणांकडून तत्काळ कार्यवाही करण्यात येईल, असे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

मंत्रालयात सातारा जिल्ह्यातील कोयना वन्यजीव प्रकल्पातील प्रकल्पबाधित लोकांच्या पुनर्वसनाबाबत बैठक झाली. या वेळी प्रधान सचिव मदत व पुनर्वसन असिमकुमार गुप्ता, डॉ. जितेंद्र दहाडे, अमोल पवार, दीपक कांबळे, चंद्रकांत कांबळे, रामचंद्र पाटील तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

खारभूमी योजना शासनास हस्तांतरित

कोकणातील ६४ खासगी खारभूमी योजना पूर्ण झालेल्या आहेत या योजना शासनास हस्तांतरित करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश खार जमिनी विकास, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले.

खार जमिनी विकास विभागातील कामांच्या अनुषंगाने मंत्रालयातील दालनात दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित बैठकीत मंत्री श्री. वडेट्टीवार बोलत होते. या वेळी आमदार जयंत पाटील जलसंपदा विभागाचे कोकण प्रदेशचे मुख्य अभियंता विजय गोगाटे, खारभूमी विकास महामंडळचे प्रकल्प संचालक तथा अधिक्षक अभियंता श्री.काठेकोरी तसेच खारभूमी विकासचे इतर अधिकारी उपस्थित होते.

विजय वडेट्टीवार
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

कोकणातील पाच जिल्ह्यांतील ६४ खासगी खारभूमी योजना पूर्ण झालेल्या आहेत या योजनांमुळे १५ हजार एकर क्षेत्र सुपिक होणार आहे. खारभूमी योजना शासनाला हस्तांतरित करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव सादर होणे आवश्यक आहे, यासाठी विभागाने यावर तातडीने कार्यवाही करावी. मागील चार वर्षात बांधकामाच्या खर्चात व दरात झालेली वाढ लक्षात घेता बऱ्याच योजना या प्रचलित आर्थिक मापदंडात बसत नाहीत यासाठी मापदंड सुधारित करण्यासाठीच्या प्रस्तावावरही कार्यवाही करण्याच्या कामाला गती देण्यात यावी, अशा सूचना मंत्री श्री. वडेट्टीवार यांनी दिल्या.

अस्मिता अभियान

राज्यातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्व प्रमाणपत्र तसेच वैश्विक ओळखपत्र देण्यासाठी दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान राज्यभरात व्यापक स्वरूपात राबवण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान आणि वैश्विक ओळखपत्र वितरण कार्यक्रम राज्यात राबवण्यात येणार आहे. याबाबतची आढावा बैठक वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त विरेंद्र सिंह, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे सर्व अधिष्ठाता, दिव्यांग आयुक्तालयाच्या सहायक आयुक्त आदी उपस्थित होते.

अमित देशमुख
वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री

मुंबईतील किल्ल्यांचा विकास आराखडा

मुंबई आणि मुंबई उपनगर परिसरातील एकूण सहा किल्ल्यांच्या विकासाबरोबरच जतन आणि संवर्धनाचे काम पुरातत्त्व संचालनालयामार्फत करण्यात येणार आहे. मुंबईतील सेंट जॉर्ज, शिवडी, वरळी, माहिम, धारावी, आणि वांद्रे या ६ किल्ल्यांच्या विकासाबाबतचा सविस्तर आराखडा यापूर्वी तयार करण्यात आला असून हा आराखडा शासकीय निधीबरोबरच बाह्यस्रोताद्वारेही राबवण्याचे नियोजन करावे, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिले.

सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील किल्ल्यांच्या विकासासंदर्भात ऑनलाईन बैठक

आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, उपसचिव विलास थोरात, पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये संचालक डॉ. तेजस गर्गे, कन्सल्टंटचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सामंजस्य करार

कोविड-१९ सारख्या जागतिक आपत्तीमुळे विद्यार्थ्यांना ऑफलाईन शिक्षणाकडून ऑनलाईनकडे यावे लागले. त्यामुळे विद्यार्थ्यांची जीवनशैली बदलली. या बदललेल्या जीवनशैलीमुळे विद्यार्थी मानसिक तणावाच्या स्थितीकडे जाऊ नयेत, यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था आणि राज्यातील विविध नऊ शैक्षणिक संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्यात आल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

सह्याद्री अतिथिगृह येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था आणि विविध शैक्षणिक संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले. या वेळी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, आमदार रोहित पवार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक विनायक निपुण विविध शैक्षणिक संस्थांचे मान्यवर उपस्थित होते.

या सामंजस्य करारामध्ये आयसीटी, मुंबई आणि विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे, डॉ. आंनद नाडकर्णी यांची आयपीएच आणि डॉ. हमीद दाभोळकर यांची परिवर्तन ट्रस्ट, एसएनडीटी विद्यापीठ, सेंट झेविअर्स कॉलेज, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, सर जे जे स्कूल ऑफ आर्ट, डेक्कन इन्स्टिट्यूट, पुणे यांचा समावेश आहे. या विविध संस्थांच्या माध्यमातून मानवी जीवनातील कला, संस्कृती, पुरातत्त्व, माहिती तंत्रज्ञान, स्त्री-पुरुष समानता, दिव्यांगांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन अशा विविध विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे.

स्वयंचलित हवामान केंद्रे

तापमान, वाऱ्याची दिशा आणि वेग, सापेक्ष आर्द्रता, पर्जन्यमान यांची अद्ययावत माहिती मिळण्यासाठी सध्या मंडळस्तरावर काही ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. ही केंद्रे आता ग्रामपंचायत स्तरावर बसवण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात राज्यातील ६ हजार ग्रामपंचायतीमध्ये ही केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या.

प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र बसवण्याच्या अनुषंगाने कृषिमंत्री श्री. भुसे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. या वेळी कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरजकुमार यांच्यासह स्कायमेट वेदर सर्व्हिसेसचे अधिकारी उपस्थित होते.

ठिबक सिंचनासाठी निधी उपलब्ध

राज्यातील सूक्ष्म सिंचन संच बसवणाऱ्या शेतकऱ्यांना पूरक अनुदान देण्याकरिता २०० कोटी रुपये निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन आदेश ६ जानेवारी २०२२ रोजी जारी करण्यात आल्याची माहिती कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

राज्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचाकरिता अनुदान देण्यात येते. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्च मर्यादेच्या ५५ टक्के व इतर शेतकऱ्यांना खर्च मर्यादेच्या ४५ टक्के अनुदान ५ हेक्टर कमाल क्षेत्राकरिता देण्यात येते. योजनेकरिता केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के या प्रमाणात निधी उपलब्ध करून देते. राज्य शासनाने १८ नोव्हेंबर २०२१ रोजी राज्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन संच बसवणाऱ्या शेतकऱ्यांना पूरक अनुदान देण्याचा निर्णय शासन निर्णयाद्वारे घेतला आहे.

या निधीतून २०२१-२२ या वर्षामध्ये सूक्ष्म सिंचन संच बसवलेल्या शेतकऱ्यांना पूरक अनुदानाचे वितरण करण्यात येणार आहे. ७५ टक्के व ८० टक्के अनुदानाचा लाभ झाल्यामुळे शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन संच बसवण्यासाठी लागणाऱ्या खर्चामध्ये बचत होणार आहे. तसेच यामुळे राज्यातील अधिकाधिक क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यास मदत होईल. राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंत्री श्री.भुसे यांनी केले आहे.

दादाजी भुसे
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

कृषी संजीवनी प्रकल्पासाठी निधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) २०२१-२२ साठी विविध बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी ६०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाच्या बाबी

(शेततळी, ठिबक संच, फळबाग लागवड, इलेक्ट्रिक मोटर इ.), शेतकरी गटांना लाभ (शेतीसाठी सोयीसुविधा व कृषी प्रक्रिया उद्योग) तसेच पाण्याच्या ताळेबंदावर आधारित मृद् व जलसंधारणाची कामे अशा विविध बाबींचा समावेश आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाकरिता बाह्य हिश्श्याचा ४२० कोटी रुपये व राज्य हिश्श्याचा १८० कोटी रुपये असा एकूण ६०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात येत आहे. हा निधी पोकरा (हवामान अनुकूल कृषी विकास प्रकल्प) अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी कामे पूर्ण केली असतील त्यांना तत्काळ वर्ग करावा, असे निर्देशही मंत्री श्री. भुसे यांनी दिले आहेत.

जलजीवन मिशन योजनेंतर्गत मंजुरी

जलजीवन मिशन योजनेंतर्गत राज्यातील दरडोई निकषापेक्षा जास्त असलेल्या ६० ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना, राज्यातील ८५८ कोटीच्या कामांना पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

गुलाबराव पाटील
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

या वेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, जलजीवन मिशनचे संचालक ऋषिकेश यशोद यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अभय योजना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ग्राहकांकरिता पाणीपट्टीच्या मुळ मुद्दलावरील विलंब आकार/शुल्क माफीच्या सवलतीची अभय योजना जाहीर झाली असून ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. याबाबतचे शासन परिपत्रकही पाणी पुरवठा विभागाकडून निर्गमित करण्यात आले आहे.

अभय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ग्राहकांकरिता पाणीपट्टीच्या मूळ मुद्दलावरील विलंबाचा आकार, दंड, व्याज यात पाणीपुरवठा विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सूट देण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी टप्प्याटप्प्याने पैसे भरावे. पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान पाणीपुरवठा केंद्राच्या मागणीच्या आधारावर ही योजना संपूर्ण राज्यात सुरू झाली आहे.

आदिवासी संवर्धन परिषद

आदिवासी बांधवांच्या अधिकार व हक्कासाठी कार्य करणाऱ्या जयपाल सिंग मुंडा यांनी आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी दिलेला लढा अविस्मरणीय आहे. त्यांनी आदिवासी समाजाची बाजू संसदेच्या संविधान सभेत

ॲड. के. सी. पाडवी
आदिवासी विकास मंत्री

भक्कमपणे मांडून आदिवासींना न्याय मिळवून दिला. जयपाल सिंग मुंडा यांच्या जयंतीनिमित्त स्थापन केलेली 'आदिवासी संवर्धन परिषद' आदिवासी संस्कृती संवर्धनासाठी काम करेल, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री ॲड. के. सी. पाडवी यांनी केले.

मानव शास्त्रज्ञ डॉ. आर. के. मुटाटकर यांच्या अध्यक्षतेखाली जयपाल सिंग मुंडा यांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त ऑनलाईन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. या परिसंवादास जयपाल सिंग मुंडा यांचे सुपुत्र जयंत जयपाल सिंग मुंडा यांची विशेष उपस्थिती होती. साहित्य समीक्षक व भाषाशास्त्रज्ञ डॉ. गणेश देवी, आमदार कपिल पाटील, विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, आदिवासी विकास आयुक्त हिरालाल सोनवणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त राजेंद्र भारुड तसेच महाराष्ट्र, मध्यप्रदेश, झारखंड, आसाम, उत्तरप्रदेश, गुजरात, राजस्थान, जम्मू व काश्मिर या राज्यांतील राजकीय क्षेत्रातील आदिवासी समाजातील खासदार, आमदार व मान्यवर उपस्थित होते.

स्मार्ट कार्ड योजनेला मुदतवाढ

ओमायक्रॉन या नवीन कोरोना विषाणूचा महाराष्ट्रात शिरकाव झाल्याने एसटी महामंडळाने खबरदारीचे पाऊल टाकत ज्येष्ठ नागरिक व इतर सवलत धारकांच्या स्मार्ट कार्ड योजनेला ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी दिली आहे.

ॲड. अनिल परब
परिवहन मंत्री

राज्य परिवहन सेवेतील प्रवासासाठी १ एप्रिल २०२२ पासून स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार असल्याने या मुदतवाढीचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहनही परिवहन मंत्री श्री. परब यांनी केले आहे. यापूर्वी स्मार्ट

कार्ड योजनेसाठी ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

राज्य शासन एसटी महामंडळाच्या माध्यमातून सुमारे २९ विविध सामाजिक घटकांना ३३ टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत प्रवासी भाड्यामध्ये सवलत दिली जाते. या सवलत योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित लाभार्थींना आधार क्रमांकाशी निगडित असलेल्या स्मार्ट कार्ड काढण्याची योजना एसटीने सुरू केली आहे. त्यानुसार एसटीच्या प्रत्येक आगारामध्ये ज्येष्ठ नागरिक व अन्य सवलत धारकांना स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू आहे. परंतु, राज्यात ओमायक्रॉन या नव्या विषाणूचा शिरकाव झाल्याने राज्य शासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना आगारात येऊन स्मार्टकार्ड घेणे शक्य नसल्याने तसेच त्यासंबंधीची माहिती आगारात येऊन प्रत्यक्ष देता येत नसल्याने, या योजनेला ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचेही श्री.परब यांनी सांगितले.

पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी

जिल्हा नियोजन समितीच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून ५ कोटी रुपयांपर्यंतचा निधी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी खर्च करण्याचा निर्णय मत्स्यव्यवसाय विभागाने घेतला असून या संदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे. १८ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आल्यामुळे आता मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी जिल्हा वार्षिक योजनेमधून एका घटकावर खर्च करण्याची कमाल मर्यादा २५ लाखांवरून ५ कोटींपर्यंत वाढवण्यात आली आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी दिली.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत लहान मच्छिमार बंदरांचा विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक कामांना प्रशासकीय मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. लहान मच्छीमार बंदरांच्या विकासाच्या योजनेंतर्गत प्रसाधनगृहांचे

अस्लम शेख
मत्स्यव्यवसाय मंत्री

बांधकाम, विद्युत पाणीपुरवठा, जेट्टीची लांबी वाढवणे, मासे उतरवण्याच्या केंद्रासाठी जोडरस्ता बांधणे, मासे सुकवण्यासाठी ओट्यांचे तसेच गाईड पोस्ट बांधकाम अशा विविध ११ कामांचा समावेश करण्यात आला आहे. यातील एका कामाची अंदाजपत्रकीय रक्कम २५ लाखांपर्यंत १८ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली होती.

मासेमारी करणाऱ्यांना दिलासा

राज्यातील यांत्रिकी मासेमारी नौकांना डिझेल परताव्याचे १२ कोटी रुपये वितरित करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शवली असून तसा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. डिझेलच्या परताव्यामुळे मासेमारी करणाऱ्या यांत्रिकी नौकाधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी दिली.

मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीची प्रतिपूर्ती करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाची योजना असून या योजनेसाठी २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यापूर्वी ४८ कोटी रुपयांचा निधी मत्स्यव्यवसाय विभागाला वितरित करण्यात आला होता. डिझेल परताव्याचा वाढत चाललेला अनुशेष पाहता उर्वरित १२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यासाठी मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी सातत्याने पाठपुरावा केला, या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत ६० कोटी रुपयांपैकी उर्वरित १२ कोटी रुपये वितरित करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

मालमत्ताविषयक हक्क संरक्षित कार्यपद्धती

कोविड प्रादुर्भावामुळे घरातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन विधवा झालेल्या महिलांचे योग्य पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने व त्यांचे न्याय्य हक्क अबाधित राखण्याच्या अनुषंगाने जिल्हा कृती दलाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. मागील दोन वर्षात कोविडमुळे विधवा झालेल्या महिलांना त्यांच्या मालमत्ताविषयक हक्कापासून वंचित ठेवल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या महिलांचे मालमत्ताविषयक व अन्य आर्थिक हक्क संरक्षित करण्याच्या अनुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली.

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

मिशन वात्सल्य योजनेंतर्गत गाव पातळीवर कार्यरत शासकीय कर्मचाऱ्यांच्या पथकाने विधवा झालेल्या महिलेस व तिच्या कुटुंबास भेट देणे आवश्यक आहे. या भेटी दरम्यान पथकाने संबंधित महिलेस तिचे आर्थिक व वित्तीय हक्क नाकारले जात आहेत किंवा कसे याबाबत माहिती करून घ्यावी. संबंधित महिलेबाबत पतीची स्थावर मालमत्ता, वित्तीय साधनसंपत्ती, उत्पन्न याबाबत वारसा हक्क नाकारणे, कौटुंबिक कारणांनी किंवा अन्य प्रकारे स्थावर तसेच जंगम मालमत्तेवर व उत्पन्नावर असणारा संबंधित महिलेचा हक्क नाकारणे. स्त्रीधन, संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे मालकी असणारी

मालमत्ता यापासून महिलेस वंचित ठेवणे, संबंधित महिला व तिच्या मुलांना घरगुती गरजांसाठी आवश्यक साधन संपत्तीपासून वंचित करणे, संबंधित महिलेस राहत्या घरामध्ये प्रवेशास निर्बंध करणे याबाबतची माहिती संरक्षण अधिकाऱ्यास द्यावी, असे महिला व बालविकास मंत्री श्रीमती ठाकूर यांनी सांगितले.

शिष्यवृत्ती प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार शिष्यवृत्ती योजना, राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती, सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील प्रवेश पूर्णपणे संगणकीकृत करून ऑनलाईन पद्धतीने राबवण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

मंत्रालयात संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अपर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी, बार्टीचे महासंचालक डॉ. धम्मज्योती गजभिये, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव दिनेश डिंगळे आदी उपस्थित होते.

यापुढे विद्यार्थी व निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या लोकप्रतिनिधींना पासपोर्टच्या धर्तीवर जात प्रमाणपत्र पडताळणी करून मिळावी यासाठी ही प्रक्रियासुद्धा पूर्णपणे ऑनलाईन केली जावी, यात असलेल्या सर्व त्रुटी दूर करून पासपोर्टच्या धर्तीवर सुटसुटीत व अद्ययावत प्रणाली तातडीने विकसित करून कार्यान्वित केली जावी, असे निर्देश मंत्री श्री. मुंडे यांनी दिले आहेत.

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

तज्ज्ञ समिती गठित करण्याचे निर्देश

पाली त्रिपिटक भाषांतर प्रकल्पासाठी बार्टीने तज्ज्ञ समिती गठित करण्याचे निर्देश सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. मंत्रालयात पाली त्रिपिटक भाषांतर प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सामाजिक न्याय विभागाच्या अपर मुख्य सचिव जयश्री मुखर्जी, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, बार्टीचे उपायुक्त श्री. सोनावणे उपस्थित होते.

बौद्ध धर्मातील अत्यंत प्राचीन साहित्य असलेल्या त्रिपिटकांच्या भाषांतरासाठी बार्टीने तज्ज्ञ समिती गठित करावी. पाली त्रिपिटक भाषांतर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी या कामाला प्राधान्य देण्यात यावे, असे मंत्री श्री.मुंडे यांनी सांगितले.

केंद्राकडे प्रस्ताव पाठवणार

ठाणे खाडी परिसरात जैवविविधता असल्याने या परिसरास आंतरराष्ट्रीय रामसर पाणथळ क्षेत्र म्हणून मान्यता मिळण्यासाठी केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. यामुळे या परिसरातील जैवविविधता जपणे सुलभ होईल, असे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेटलँड प्राधिकरणाची चौथी बैठक सह्याद्री अतिथिगृह येथे झाली. या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या वेळी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, वनविभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक, प्रधान मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक विरेंद्र तिवारी आदी उपस्थित होते.

खरशेत ग्रामस्थांशी संवाद

साहेब, आमची व्यथा तुम्ही जाणली आणि २४ तासांच्या आत पाणी आणण्यासाठी असणारा लोखंडी पूल तयार झाला. आमच्या यातना संपल्या अशा शब्दांत शेंद्रीपाडा.. खरशेतमधील ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावर तेवढ्याच संवेदनशीलतेने उत्तर देत, हे महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाचे सरकार आहे. त्याच्याप्रती असणारी आमची बांधिलकी कायम राहील, असा विश्वास पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला. जलजीवन मिशन अंतर्गत खरशेत आणि लगतच्या ९ पाड्यांना जून महिन्या अखेरपर्यंत त्यांच्या घरापर्यंत नळाद्वारे पाणी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

नाशिक जिल्ह्यातील खरशेत (ता. त्र्यंबकेश्वर) येथील महिलांना पाण्यासाठी करावी लागणारी कसरत काही माध्यमातून

आदित्य ठाकरे
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

समोर आली. त्याची तत्काळ दखल घेत पर्यटनमंत्री श्री. ठाकरे आणि पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील यांनी, तेथे पाण्यासाठी जाणाऱ्या महिलांना रस्ता तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याची दखल घेत यंत्रणांनी केवळ २४ तासांत तेथे लोखंडी पूल उभारून व्यवस्था केली होती. त्याचबरोबर, हे गाव जलजीवन मिशनमध्येही समाविष्ट आहे. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत खरशेत येथील ग्रामस्थांशी पर्यावरण मंत्री श्री. ठाकरे आणि पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील यांनी ऑनलाईन संवाद साधला. राज्यमंत्री संजय बनसोडे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल, जलजीवन मिशन कक्षाचे प्रमुख हृषिकेश यशोद यांच्यासह नाशिकहून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड, इतर वरिष्ठ अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

टीम लोकराज्य

राज्य मंत्रिमंडळाच्या १५, डिसेंबर २०२१ व १२, २० अणि २७ जानेवारी २०२२ रोजीच्या बैठकीत ग्रामविकास, मराठी भाषा, फलोत्पादन, महसूल, उच्च व तंत्र शिक्षण, नगरविकास, सहकार व पणन, कामगार, वैद्यकीय शिक्षण, परिवहन, महिला व बालविकास, अल्पसंख्याक विकास, जलसंपदा, विधि व न्याय, क्रीडा व युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..

मंत्रिमंडळात ठरले

प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव साकारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार भिलारच्या धर्तीवर 'पुस्तकांचे गाव' ही योजना राज्य मराठी विकास संस्थेच्या स्तरावर स्वतंत्रपणे उपक्रम म्हणून राबवण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाचे गाव व्हावे, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या चर्चेनुसार पुस्तकांचे गाव ही योजना विस्तारित स्वरूपात सुरू करताना पहिल्या टप्प्यात सहा महसुली विभागात आणि नंतर दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव सुरू करण्यात येणार आहे.

पद निर्मितीस मान्यता

नगरविकास विभागाच्या आस्थापनेवर उप सचिव तथा उप संचालक, नगररचना संवर्गाचे १ पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात सातत्याने नागरीकरण वाढत आहे. राज्यातील प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका किंवा नगरपंचायत स्थापन झाल्या आहेत. सोबतच नवनगर प्राधिकरणांची स्थापना, वाढत्या शहरांचे विकास आराखडे आणि इतर विविध योजनांमुळे नगरविकास विभागाकडील कामकाज मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

त्यामुळे नगरविकास विभागाला मनुष्यबळाची गरज भासत आहे. त्यादृष्टीने नगररचना विभागासाठी उप संचालक, नगररचना तथा उप सचिव या संवर्गाचे एक नियमित पदाची निर्मिती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा दुसरा टप्पा राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयानुसार राज्यातील १० हजार किलोमीटर्सच्या ग्रामीण रस्ते बांधणीचे कामे करण्यात येणार आहेत. राज्याच्या २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये ग्रामीण सडक विकास योजनेंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते विकासासाठी ४० हजार कि.मी.लांबीचे रस्त्यांचे काम हाती घेवून ते २०२० ते २०२४ या कालावधीत पूर्ण करण्याचे वित्त मंत्र्यांनी नमूद केले होते. त्यानुसार या वर्षी सुमारे १० हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

मोसंबीसाठी सिट्रस इस्टेट

औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील ६२ एकर जागेवर सिट्रस इस्टेट स्थापन करण्याची घोषणा २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानुसार त्यास मान्यता देण्यात आली.

मराठवाड्यात सुमारे ३९ हजार ३७० हेक्टर क्षेत्रावर मोसंबीचे उत्पादन घेतले जाते. यामध्ये औरंगाबाद आणि जालना जिल्ह्याचे क्षेत्र अनुक्रमे २१ हजार ५२५ व १४ हजार ३२५ हेक्टर आहे. मराठवाड्याच्या दृष्टीने मोसंबी फळाच्या शाश्वत उत्पादन, प्रक्रिया तसेच निर्यातीसाठी क्लस्टर निर्माण करण्याची गरज लक्षात घेऊन सिट्रस इस्टेटची ही स्वायत्त संस्था म्हणून स्थापन करण्यात येईल. याअंतर्गत जिल्हा कृषी अधिक्षक औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण व कार्यकारी समितीची स्थापना करण्यात येईल. ही सुविधा नव्याने उभी करण्यासाठी ३६ कोटी ४४ लाख ९९ हजार रुपयांची तरतूद उपलब्ध करून देण्यास तसेच यासाठी लागणारे मनुष्यबळ प्रतिनियुक्तीने तसेच बाह्य स्रोताद्वारे कंत्राटी पद्धतीने भरण्यासही मान्यता देण्यात आली.

पैठण, जिल्हा औरंगाबाद केंद्रबिंदू मानून ६० कि.मी. परिघात असणाऱ्या उत्पादनक्षम किमान १० हजार हेक्टरवरील मोसंबी बागांचा पैठण सिट्रस इस्टेटच्या कार्यकक्षेत समावेश असेल.

कृषीविषयक तीनही विधेयके मागे

राज्य विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात, विधानसभेमध्ये ६ जुलै २०२१ रोजी मांडण्यात आलेली तीनही कृषीविषयक विधेयके मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाने (१) शेतकरी उत्पादनाचे व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियम २०२०, (२) शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) आश्वासित किंमत आणि शेती सेवा करार अधिनियम, २०२० (३) अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम २०२० असे कृषी क्षेत्राशी संबंधित ३ विधेयक संसदेच्या अधिवेशनात पारित केले होते. या अधिनियमांची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात

अधिनियमातील त्रुटी व उणीवा यांचा अभ्यास करण्यासाठी उप मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली होती. मंत्रिमंडळ उपसमितीने सुचवलेल्या शिफारशीनुसार ही तीन विधेयके मांडण्यात आली होती.

विद्यापीठ अधिनियमात सुधारणा

विद्यापीठांच्या प्र-कुलपती पदी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री असतील अशी तरतूद विद्यापीठ अधिनियमात करण्यास तसेच कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी राज्य शासनाच्या माध्यमातून नावांची शिफारस राज्यपालांना करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणी तसेच राज्यातील उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे, गुणवत्ता वाढवणे, त्यांचे बळकटीकरण करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने डॉ. सुखदेव थोरात माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

गहाण खतांमध्ये एकसूत्रता

राज्याचे महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी गहाण खतांच्या दरांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ अनुसूची-१ मधील अनुच्छेद ६(१)(ब) (हक्क विलेख-निक्षेप), ६(२) (ब) (हडपतारण) व अनुच्छेद ४० (ब) (गहाणखत) मधील सुधारणा तसेच अनुच्छेद ४० (ब) चे अनुषंगिक अनुच्छेद ३३ (ब) (अधिक प्रभार), अनुच्छेद ४१ (एखाद्या पिकाचे गहाणखत) व अनुच्छेद ५४ (प्रतिभूति - बंधपत्र किंवा गहाणखत) असल्याने या अनुच्छेदामध्ये सुद्धा अनुच्छेद ४० (ब) च्या धर्तीवर सुधारणेमुळे मुद्रांक शुल्काची वसुली होऊन राज्य शासनाच्या महसुलामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ मधील अनुसूची- १ च्या उपरोक्त नमूद अनुच्छेदांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सहकार कायद्यामध्ये सुधारणा

सहकार कायद्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात सन २०१३ मध्ये विविध कलमात सुधारणा करण्यात आल्या होत्या. या सुधारणा केल्यामुळे राज्यातील सहकारी क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापि, या घटना दुरुस्तीच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवली असल्याने, राज्यातील सहकारी संस्थांच्या कामकाजात सुलभता आणण्याच्या हेतुने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील विविध कलमात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई महापालिका क्षेत्रातील घरांचा मालमत्ता कर माफ

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील ५०० चौरस फूट किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या घरांचा मालमत्ता कर माफ करण्यास मान्यता दिली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी १ जानेवारी २०२२ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये मुंबई महापालिकेच्या मागणीनुसार ४६.४५ चौ.मी. (५०० चौ.फूट) अथवा त्यापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या निवासी मालमत्तांना संपूर्ण मालमत्ता कर माफ करण्याचे जाहीर केले होते.

मंत्रिमंडळाच्या मंजुरीनुसार या निर्णयाची १ जानेवारी २०२२ पासून अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयामुळे मुंबई महापालिका क्षेत्रातील १६.१४ लाख निवासी मालमत्तांना या संपूर्ण कर सवलतीचा लाभ मिळणार आहे. या सवलतीमुळे महापालिकेच्या कर महसुलात सुमारे ४१७ कोटी आणि राज्य शासनाच्या महसुलात सुमारे ४५ कोटी असा एकूण ४६२ कोटींचा महसूल कमी होणार आहे.

दुकानांचे नामफलक मराठीत

राज्यातील सर्व दुकाने व आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेमध्ये असावेत, असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून या संदर्भात महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यात येईल.

कामगार संख्या १० पेक्षा कमी असलेल्या आस्थापना तसेच १० पेक्षा अधिक असलेल्या आस्थापना, अशा सर्व आस्थापना, देवनागरी लिपीत मराठी भाषेमध्ये नामफलक प्रदर्शित करतील. मालक आस्थापनेचा नामफलक हा मराठी देवनागरी लिपीबरोबरच इतर भाषेतही लिहू शकतो. परंतु मराठी भाषेतील नामफलक प्रारंभी लिहिणे आवश्यक आहे आणि मराठी भाषेतील नामफलकावरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये. ज्या आस्थापनेत कोणत्याही प्रकारे मद्यविक्री किंवा मद्यपान सेवा दिली जात असेल अशा आस्थापनेस महापुरुष/महनीय महिला यांची किंवा गडकिल्ल्यांची नावे देण्यात येऊ नयेत, असाही निर्णय घेण्यात आला.

शालेय बसेससाठी करमाफी

कोविडमुळे शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांना करमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला. शाळांच्या मालकीच्या तसेच केवळ स्कूल बस म्हणून वापरात येणाऱ्या बसेस, शाळांनी कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या तसेच केवळ शाळेतील मुलांना ने-आण करण्यासाठी शाळेव्यतिरिक्त इतरांच्या स्कूल बसेसना १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च

२०२२ या कालावधीसाठी वार्षिक करातून १०० टक्के कर माफ करण्यात येईल. मात्र ज्या स्कूल बस प्रकारातल्या वाहनांनी वरील कालावधीसाठीचा कर भरला असेल, तर अशा कराचे महाराष्ट्र मोटार वाहन कर

अधिनियम १९९८ मधील कलम ९ (४ अ) नुसार आगामी काळात समायोजन करण्यात येईल.

वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अध्यापकांची पदे

सेंटर ऑफ एक्सलन्स योजनेंतर्गत नागपूर, पुणे तसेच अकोला येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सध्याच्या उपलब्ध मनुष्यबळात वाढ करून ९ अध्यापकीय पदांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार वै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला या तीन संस्थांकरिता १ प्राध्यापक, ३ सहयोगी प्राध्यापक व ५ सहायक प्राध्यापक अशी एकूण ९ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महिला व बाल सशक्तीकरणासाठी निधी

जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक सर्वसाधारण योजनेत महिला व बाल सशक्तीकरण या योजनेसाठी कायमस्वरूपी ३ टक्के निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा नियोजन समित्यांना नियोजन विभागाकडून कायमस्वरूपी मिळणाऱ्या निधीतून किमान ३ टक्के म्हणजेच दरवर्षी सुमारे ४५० कोटी रुपये इतका निधी महिला व बालविकास विभागास मिळणार आहे. महिला व बाल सशक्तीकरण ही सर्वसमावेशक योजना महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी राबवण्यात येते. महिला व बालकांचे सक्षमीकरण करताना महिला व बालविकास विभागाच्या जिल्हास्तरीय विविध कार्यालयांना एकाच छताखाली आणणे देखील आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांत महिला व बालभवनाचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय यात त्रिस्तंभ धोरण म्हणजेच उपयोजना 'अ', 'ब' व 'क' या पुढीलप्रमाणे राबवण्यात येतील.

जिल्हास्तरावरील महिला व बालभवनांच्या बांधकामासह महिला सबलीकरण व बालकांचा विकास यांच्याशी संबंधित बाबी तसेच जिल्हास्तरावर/मोठ्या धार्मिक स्थळांच्या ठिकाणी शासकीय भिक्षेकरी गृहांचे बांधकाम, दुरुस्ती करणे इत्यादी बाबींसह अन्य महिला व बालविकास विभागाशी संबंधित अन्य इमारती/योजनांचा विकास करण्यात येईल.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासकीय जागेवर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जागेवर महिला बचतगट भवनाचे बांधकाम करणे. तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकरिता प्रत्येक जिल्ह्याकरिता एक अशी ३६ वाहने उपलब्ध करून देणे. महिला बचतगटांच्या उत्पादक वस्तूला सुलभ प्रकारे विक्री होण्याकरिता राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच मुख्य जिल्हा मार्गाला लागून शासकीय जागेत/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेत लहान स्टॉल बांधकाम करण्यात येईल.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेत अंगणवाडी केंद्रांचे नवीन बांधकाम, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, स्वयंपाकघरांचे आधुनिकीकरण, इमारतीचे विस्तारीकरण, इमारतींची विशेष दुरुस्ती करणे, मातांच्या स्वतंत्र प्रतिक्षागृहाचे बांधकाम, संरक्षक भिंत, वाढ संनियंत्रण संयंत्रांचा पुरवठा व देखभालीसाठी खर्च इत्यादी बाबींचा समावेश आहे.

या घटकांतर्गत राज्यातील निराधार, निराश्रित, अनाथ, अनैतिक संकटात सापडलेल्या, कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिला तसेच अनाथ व काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके, स्तनदा माता, किशोरवयीन मुली, दुर्बल घटकातील महिला, भिक मागणाऱ्या व्यक्ती इत्यादींसाठी व्यापक प्रमाणावर नवीन कार्यक्रम, योजना हाती घेता येणार आहेत.

गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक

केंद्र किंवा राज्य शासनाच्या पायाभूत अथवा जलसंपदा प्रकल्पाच्या कामाकरिता विभागीय आयुक्त यांना आवश्यकता वाटल्यास रात्रीच्या वेळीदेखील गौण खनिजाच्या उत्खननाची व वाहतुकीची परवानगी देण्याबाबत मान्यता देण्यात आली.

याशिवाय आपला खाणकामाचा पारंपरिक व्यवसाय चालू ठेवण्यास इच्छुक असणाऱ्या कुंभार आणि वडार समाजाच्या कुटुंबाच्या बाबतीत अर्ज केल्यावर स्फोटके वापरून अथवा स्फोटकाशिवाय उत्खनन करण्यासदेखील परवानगी देण्यात येईल. राज्यामध्ये होणाऱ्या खनिजाच्या वाहतुकीस राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे प्रतिमेट्रिक टन किंवा प्रतिब्रास 'नियमन शुल्क' आणि सेवा शुल्क वाहतूकदाराने अथवा खाणपट्टाधारकाने राज्य शासनास अदा करावे लागणार आहे.

रॉयल्टी, डेड रेंट दरात सुधारणा

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या ३१ गौण खनिजाच्या रॉयल्टी (स्वामित्वधन) व डेड रेंट (मृतभाटक) या दरात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील संबंधित नियमात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. खनिज अगेट, कोरोंडम हे प्रतिमेट्रिक टन २०० रुपये किंवा विक्री मुल्याच्या २० टक्के यापैकी जे जास्त असेल ते दर, चायना क्ले, डोलोमाईट, फायर क्ले, लॅटराईट, क्वार्टझाईट, शेल, सिलिका सँड व अन्य घोषित गौण खनिजे ही प्रतिमेट्रिक टन १०० रुपये किंवा विक्री मूल्याच्या १० टक्के यापैकी जे जास्त असेल ते दर, फेल्सपार हे खनिज प्रतिमेट्रिक टन १०० रुपये किंवा विक्री मुल्याच्या २० टक्के यापैकी जे जास्त असेल ते दर, पायरोफिलाईट प्रतिमेट्रिक टन १५० रुपये किंवा विक्री मुल्याच्या २० टक्के यापैकी जे जास्त असेल ते दर, क्वार्टझ प्रतिमेट्रिक टन १२० रुपये किंवा विक्री मूल्याच्या १० टक्के यापैकी जे जास्त असेल ते दर.

मृतभाटकाचे दर १० फेब्रुवारी २०१५ रोजीच्या अधिसूचनेअन्वये ९ हजार रुपये प्रतिहेक्टर असतील.

वाळू, रेती उत्खननाबाबत धोरण

राज्यातील नदी व खाडी पात्रातील वाळू, रेती उत्खननाबाबतचे आता असलेले धोरण रद्द करून जनतेस माफक दरात वाळू

मिळावी, या दृष्टीने वाळू, रेती उत्खननाबाबत सर्वंकष असे सुधारित धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यात नदी पात्रातील व खाडी पात्रातील वाळू, रेती निष्कासनासाठी शासन निर्णय ३ सप्टेंबर २०१९ व २१ मे २०१५ अशा या दोन शासन निर्णयांद्वारे धोरण निश्चित करण्यात आले होते. हे धोरण रद्द करण्यात आले आहे.

जनतेस माफक दरात वाळू मिळावी, म्हणून हातची किंमत स्वामित्त्वधनाच्या (रॉयल्टी) दराने करण्यास, वाळू उत्खननाचा कालावधी ५ वर्षांपर्यंत वाढवण्यास आणि यशस्वी लिलावधारकास हेतूपत्र मिळाल्यानंतर पर्यावरण अनुमती प्राप्त करून घेण्यास त्याचप्रमाणे खाडीपात्रात हातपाटीने वाळू काढण्याच्या पारंपरिक व्यवसायाकरिता स्वामित्वधनाच्या दराने परवाने देण्याचा समावेश करून हे एकत्रित सुधारित धोरण तयार करण्यात आले आहे.

महामंडळाचे भागभांडवल वाढवले

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा ५०० कोटी रुपयांवरून ७०० कोटी रुपये वाढवण्यास मान्यता देण्यात आली. उपमुख्यमंत्र्यांनी २०२१ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल २०० कोटी रुपयांनी वाढवण्याची घोषणा केली होती. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला. हे अतिरिक्त २०० कोटी रुपये भागभांडवल टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल.

निविदा मर्यादेत वाढ

मंत्रिमंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या जलसंपदा प्रकल्पांच्या निविदा निश्चितीच्या बाबीमध्ये बदल करून ११४ कोटी रुपयांऐवजी ६२४ कोटी रुपये किमतीच्या मर्यादेत निविदा निश्चिती करण्यास मान्यता देण्यात आली.

धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व ३ हा केंद्र शासन पुरस्कृत जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने हाती घेतलेला प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश हा देशातील निवडक धरणांच्या सुरक्षिततेमध्ये तसेच परिचालन कामगिरीत सुधारणा करताना संबंधित संस्थांचे बळकटीकरण करून योजनाबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणे व धरणांचे परिचालन व देखभाल यामध्ये सातत्य राखणे हा आहे. या प्रकल्पामध्ये देशातील १८ राज्ये व दोन केंद्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे.

या प्रकल्पाकरिता देश पातळीवर एकूण सुमारे १०,२०० कोटी रुपये इतका निधी मंजूर असून त्यापैकी ७,००० कोटी रुपये हे जागतिक बँकेकडून कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध होणार असून, सहभागी राज्यांचा वाटा २,८०० कोटी रुपये इतका आहे व केंद्रीय संस्थांचा वाटा ४०० कोटी रुपये इतका असणार आहे. महाराष्ट्राकरिता मंजूर नियतव्यय ९४० कोटी रुपये असून, त्यापैकी ७०% रक्कम ६५८ कोटी रुपये जागतिक बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध होणार आहे व हे कर्जरूपी अर्थसाहाय्य प्रत्यक्ष खर्च झाल्यानंतर लगेच मिळणाऱ्या प्रतिपूर्ती स्वरूपात असणार आहे. उर्वरित २८२ कोटी रुपये ही रक्कम राज्य शासनाच्या निधीतून खर्च करावी लागणार आहे.

मंत्रिमंडळाच्या ३० जुलै २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व ३ योजनेत राज्याने सहभागी होण्यास मान्यता देण्यात आली आहे. १२ प्रकल्पांच्या घटकांना एकूण ६२४ कोटी रुपये किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास, ११४ कोटी रुपये किमतीच्या निविदा निश्चिती करणे, करार होईपर्यंत राज्याच्या निधीतून खर्च करण्यास व जागतिक बँकेच्या निविदा कागदपत्रात नमूद लवादविषयक तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासन व जागतिक बँक यांच्यात ४ ऑगस्ट २०२१ रोजी कर्ज करारनामा व जागतिक बँक व जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यादरम्यान प्रकल्प करारनामा अंतिम होऊन त्यावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. कर्ज करारनाम्यातील तरतूदी १२ ऑक्टोबर २०२१ पासून लागू झाल्यामुळे यापूर्वी मंजुरी दिलेल्या धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प टप्पा-२ व ३ बाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हा न्यायालयासाठी नवीन पदे

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर, मानोरा व कारंजा या तालुक्यांसाठी मंगरूळपीर येथे नियमित स्वरूपात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करून त्यासाठी आवश्यक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय ही जोड न्यायालये २०१३ पासून कार्यरत आहेत. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, मंगरूळपीर यांच्यासाठी २२ नियमित पदे व २ बाह्ययंत्रणेद्वारे काल्पनिक पदे निर्माण करण्यास आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरूळपीर यांचेसाठी २२ नियमित पदे व २ बाह्ययंत्रणेद्वारे काल्पनिक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सावनेर येथील न्यायालयात पदनिर्मिती

नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापन करण्यास व पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी ४ नियमित पदे व ३ बाह्ययंत्रणेद्वारे काल्पनिक पदे निर्माण करण्यास आणि दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सावनेर या न्यायालयातून दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, सावनेर या न्यायालयासाठी १५ पदे हस्तांतरित करण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

अनुदानाची मर्यादा वाढवली

राज्यातील क्रीडा सुविधा वाढवण्यासाठी विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल तसेच तालुका क्रीडा संकुलांसाठी वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या विभागीय क्रीडा संकुलांसाठी आर्थिक मर्यादा २४ कोटी असून ती वाढवून ५० कोटी, जिल्हा क्रीडा संकुलांसाठी आठ कोटी रुपये आर्थिक मर्यादा असून ती वाढवून २५ कोटी रुपये आणि तालुका क्रीडा संकुलांसाठी एक कोटी रुपये आर्थिक मर्यादा असून ती वाढवून पाच कोटी रुपये याप्रमाणे वाढवण्यास मान्यता दिली. ही सुधारित अनुदान मर्यादा, यापुढे प्रशासकीय मान्यता देण्यात येणाऱ्या व बांधकाम सुरू करण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलांसाठी लागू राहील.

ज्या क्रीडा संकुलांना यापूर्वीच प्रशासकीय मान्यता दिली असून बांधकाम पूर्ण झाले आहे अथवा बांधकाम सुरू आहे अशा संकुलांबाबत तालुका क्रीडा संकुल ३ कोटी, जिल्हा क्रीडा संकुल १५ कोटी व विभागीय क्रीडा संकुल ३० कोटी रुपये याप्रमाणे अनुदान देण्यात येईल. हे सुधारीत अनुदान अशा क्रीडा संकुलामध्ये अतिरिक्त क्रीडा/मूलभूत सुविधा याचे बांधकाम, नवीन क्रीडा उपकरणे व साहित्य तसेच उपलब्ध क्रीडा सुविधांचे अद्ययावतीकरण, बळकटीकरण याकरिता वापरता येईल.

क्रीडा संकुलांचा वापर खेळाडू, सर्वसामान्य नागरिक इत्यादींना जास्तीत जास्त करता यावा व क्रीडा संस्कृती वाढीस लागावी, यासाठी पुढील निर्देशही लागू राहतील ते असे- क्रीडा संकुले, खेळाडू, सर्व संबंधित व सामान्य जनतेसाठी उपलब्ध/खुली राहतील. क्रीडा संकुलांचा वापर क्लब हाऊससारखा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या क्रीडा संकुलांचे व्यवस्थापन खासगी व्यक्तींकडे सोपवू नये. क्रीडा संकुलाचा वापर करताना अधिकृत राज्य/राष्ट्रीय क्रीडा संघटना यांना प्राधान्य देण्यात यावे. क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन खासगी व्यक्तीकडे/व्यक्तींकडे सोपवण्याचा निर्णय घ्यावयाचा असल्यास अशा प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

हे अनुदान मंजुरीसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात येणार असून क्रीडा संकुलांचे देखभाल दुरुस्ती धोरण, क्रीडा संकुल पालकत्व धोरण याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात स्थापन केलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर समितीच्या कार्यगटाचा अहवाल मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. त्यावर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने स्थापन करण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील या कार्यगटात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण, शालेय शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, कौशल्य विकास व उद्योजकता या खात्यांचे मंत्री यांचा समावेश असेल. तसेच समितीने शिफारस केलेल्या काही मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती बैठकीत देण्यात आली.

कंत्राटी नियुक्त्यांसाठी सुधारित कार्यपद्धती

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदांवर कंत्राटी तत्त्वावर नियुक्त्या देण्याच्या सुधारित कार्यपद्धतीस मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे बिगर सेवानिवृत्त डॉक्टरांना कंत्राटी तत्त्वावर नियुक्त्या देता येणार आहेत.

शेल्फ-इन-शॉप पद्धतीने वाईन विक्री

सुपर मार्केटमध्ये किंवा वॉक इन स्टोअरमध्ये शेल्फ-इन-शॉप या पद्धतीने वाईनची विक्री ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्याचे वाईन धोरण प्रामुख्याने द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना फायदा व्हावा, तसेच वाईन उद्योगास चालना मिळावी या हेतुने राबवण्यात येत आहे. वाईन उद्योगास चालना मिळण्यासाठी पर्यायाने शेतकऱ्यास त्याच्या मालास योग्य किंमत मिळण्याच्या दृष्टीने वाईन उद्योगाची वाढ तसेच, वाईनचे परिणामकारक विपणन होणे आवश्यक आहे. राज्यात सध्या फळे, फुले, केळी व मधापासून वाईन उत्पादित करण्यात येते. ज्या वाईनरी वाईन तयार करतात व त्याबाबत विपणन करण्यास असमर्थ आहेत, अशा वाईनरींनी उत्पादित केलेली वाईन थेट सुपर मार्केटमध्ये किंवा वॉक इन स्टोअरमध्ये शेल्फ-इन-शॉप या पद्धतीने विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाल्यास त्याचा फायदा छोट्या वाईनरी घटकांना व पर्यायाने राज्यातील शेतकऱ्यांना मिळू शकेल.

सध्या सुपर मार्केटशी संलग्न बीअर व वाईन विक्रीचा (नमूना एफएल/बीआर-II अनुज्ञप्ती) परवाना देण्यात येतो. आता वाईन विक्रीसाठी पूरक म्हणून सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरमध्ये शेल्फ-इन-शॉपची संकल्पना राबवण्यात येणार आहे. यासाठी सुपर मार्केटमध्ये किंवा वॉक इन स्टोअरमध्ये (स्वतः स्वयंसेवेने खरेदी करण्याची सुविधा असलेले) कुलूपबंद करता येईल अशा कपाटामधून नमूना एफएल-एक्ससी परवानाधारकास, सीलबंद बाटलीमध्ये वाईनची विक्री करण्याकरिता नमूना ई-४ परवाना मंजूर करण्यात येणार आहे. यासाठी किमान १०० चौ.मी. क्षेत्रफळ असणाऱ्या आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ च्या कलम ६ अन्वये नोंदणीकृत असलेलेच सुपर मार्केट किंवा वॉक इन स्टोअर पात्र ठरणार आहेत. या ठिकाणी २.२५ घनमीटर इतके कमाल आकारमानाचे एकच कुलूपबंद कपाट ठेवता येणार आहे.

या निर्णयानुसार वाईन विक्री करणाऱ्या सुपर मार्केट आणि स्टोअर्सनादेखील शैक्षणिक व धार्मिक स्थळांपासूनच्या अंतराचे निर्बंध लागू राहतील. नमूना ई-४ अनुज्ञप्तीचे ५ हजार इतके वार्षिक अनुज्ञप्ती शुल्क निश्चित करण्यात आले आहे. मात्र ज्या जिल्ह्यांमध्ये दारुबंदी आहे, अशा जिल्ह्यांमध्ये असे परवाने दिले जाणार नाहीत.

मंत्रिमंडळातील निर्णयांच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

टीम लोकराज्य

राज्यात पशुसंवर्धन हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू असल्यामुळे मराठवाडा विभागात कृषी विद्यापीठाची स्थापना करताना १९७२ मध्ये परभणी पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या महाविद्यालयाने सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केले असून 'पशुसंवर्धनातून समाज विकास' असे ध्येय समोर ठेवून हे महाविद्यालय काम करत आहे.

वसा पशुसंवर्धनाचा

डॉ. नितीन मार्कंडेय

पदवी शिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या या महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण आणि आचार्य शिक्षणाच्या सोयी पहिल्या दहा वर्षात निर्माण करण्यात आल्या. त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांच्या सोयी, कार्यक्षेत्र विस्तारीकरण आणि दर्जेदार संशोधनातून राष्ट्रीय पातळीवर तांत्रिक सहभाग यामुळे महाविद्यालयाचा लौकिक सर्वदूर पसरला. राज्यात वेगळ्या पशुवैद्यक विद्यापीठाची म्हणजेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरची स्थापना २००० मध्ये झाल्यानंतर परभणी येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाने पशुसंवर्धनात विकासाची मोठी झेप घेतली आहे.

संशोधन, विस्तार आणि संधी

महाविद्यालयाच्या मुख्य उद्देशात पशुवैद्यकीय अध्यापन, विभागातील स्थानिक पशुधनाच्या गरजांबाबत संशोधन आणि सक्षम शाश्वत पशुपालनासाठी प्रभावी विस्तार शिक्षणाची संकल्पना अंतर्भूत आहे. गेल्या ५० वर्षांत या महाविद्यालयातून ग्रामीण भागातील अंदाजे तीन हजार विद्यार्थ्यांनी पशुवैद्यक पदवी शिक्षण, १२०० विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर, तर ४० पशुवैद्यकांनी आचार्य शिक्षण पूर्ण केले आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय पशुवैद्यकीय शिक्षण संस्थेत संधी लाभल्या असून या संस्थेत शिक्षण पूर्ण केलेले पशुवैद्यक तज्ज्ञ राष्ट्रीय संस्थेत आपले देदिप्यमान कार्य करत आहेत. या महाविद्यालयात असणाऱ्या सुसज्ज प्रयोगशाळा आणि सर्व सोयीयुक्त ग्रंथालयातून पशुवैद्यक क्षेत्रातील अध्यापन व तंत्रज्ञानाची माहिती प्राप्त झाल्यामुळे शिक्षणासह विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

'अ' श्रेणी प्राप्त महाविद्यालय

महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी दरवर्षी ८० विद्यार्थ्यांना, तर पदव्युत्तर शिक्षणासाठी ४८ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. इतर राज्यातील आणि परदेशातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाच्या सोयीसाठी संधी उपलब्ध आहेत. भारतीय पशुचिकित्सा परिषद, नवी दिल्लीच्या प्रमाणकानुसार महाविद्यालयातील शिक्षण दर्जेदार असल्याचे शिक्कामोर्तब नुकतेच झाले असून राष्ट्रीय मानांकनानुसार महाविद्यालयाने सुवर्णजयंती वर्षात 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे. पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्य कक्षात २० खासगी शिक्षण संस्थांतर्गत पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका विद्यालये कार्यरत असून पशुसंवर्धन व दुग्धविकास व्यवस्थापनाचे धडे दरवर्षी १२०० विद्यार्थ्यांना दिले जात आहेत.

संशोधनाबाबत प्रशंसनीय अभिप्राय

संशोधन आणि विस्तार शिक्षण या दोन्ही गरजा पशुवैद्यक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या असून विभागातील गरजांबाबत हाती घेण्यात आलेले संशोधन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्यात महाविद्यालयातील प्राध्यापकांना यश मिळाले आहे. महाविद्यालयात विविध विभागात केंद्रीय अर्थ-साहाय्यातून नियमितपणे संशोधन योजना राबवल्या जात असून केलेल्या संशोधनाबाबत प्रशंसनीय अभिप्राय नोंद झालेले आहेत. या महाविद्यालयातील संशोधकांना दरवर्षी मिळत असणारे राष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या अमूल्य संशोधन शिफारशींचा दाखला आहे.

मराठवाडा विभागातील लाल कंधार या स्थानिक वंशाचा सलग १० वर्ष सविस्तर अभ्यास प्रकल्प महाविद्यालयाने पशुसंवर्धन खात्याच्या साहाय्याने राबवला. या महाविद्यालयाचा लौकिक मराठवाडा विभागातील लाल कंधार पशुधनाची राष्ट्रीय पातळीवर अधिकृत नोंद सन १९८८ मध्ये होण्यासाठी परिचित आहे. तसेच विभागातील स्थानिक मराठवाडी म्हशीबाबत राबवलेल्या संशोधन प्रकल्पातून या वंशास अधिकृत मान्यता मिळाली आहे. महाविद्यालयास शुद्ध जातीचा लाल कंधार गोवंश, मराठवाडा म्हैस वंश, उस्मानाबादी शेळी आणि दखन्नी मेंढी

संवर्धन आणि विकासाचे ध्येय अंतर्भूत आहेत.

पशु पालकांशी थेट संपर्क

शिक्षण संस्थातील तज्ज्ञ अधिकारी पशुपालकांच्या गोठ्यापर्यंत पोहचल्यास पशुपालनातील अडचणी दूर होणे, पशू उपचार राबवणे आणि शाश्वत पशुपालनाचा व्यवसाय निर्माण करता येणे शक्य असते. पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रभावी विस्तार शिक्षणाच्या अनेक अभिनव पद्धती देश पातळीवर नावाजल्या असून त्यांचा अवलंब इतर राज्यात सुरू आहे. याच दृष्टीने पशुवैद्यक महाविद्यालयाने नियमित तांत्रिक प्रकाशने, मार्गदर्शन, प्रशिक्षण, पशुचिकित्सा शिबिरे, पुस्तक प्रकाशने, ई-गोरजकट्टा सारखे प्रश्नोत्तर उपक्रम, पशुवंश संवर्धन उपक्रम, महिला मेळावे, गो-उत्पादने, आकाशवाणी - दूरदर्शन सहभाग यासह आभासी दृक्श्राव्य कार्यक्रमातून दरवर्षी लाखो पशु पालकांशी थेट संपर्क साधण्यात यश मिळवले आहे. पशु विस्तार शिक्षणाच्या सेवा २४ x ७ दिल्या जातात याचा अनुभव आणि विश्वास राज्यातील पशुपालकांनी घेतला आहे.

महाविद्यालयाच्या गत ५० वर्षांतील प्रगतीमध्ये अत्याधुनिक तंत्र आणि उपयुक्त कौशल्ये याबाबत झालेले कार्य पशुपालकांपर्यंत पोहोचत असल्याने व्यावसायिक पशुपालकांना मोठी मदत झाली आहे. महिला सक्षमीकरणासाठी पशुजन्य उत्पादनांची तांत्रिक माहिती, निर्मिती प्रशिक्षण आणि कमी गुंतवणुकीत अर्थार्जनाचा मार्ग दाखवण्याचे काम महाविद्यालयाने प्राधान्याने हाती घेतले आहे. या महाविद्यालयाकडून राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाची यंत्रणा पशुवैद्यक सेवेसाठी सक्षम करण्याकरिता वेळोवेळी नियमितपणे प्रशिक्षणासह प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे.

ठळक संशोधन कार्य

- सूक्ष्मजीवशास्त्र विभागाकडून सांसर्गिक गर्भपात आणि निलजिव्हा रोगाचे संशोधन
- पशु परोपजीव विभागाकडून परजीवी नियंत्रणासाठीचे एकात्मिक व्यवस्थापन बाबत संशोधन
- पशुऔषधी शास्त्र विभागातील संशोधनात मराठवाडा विभागातील औषधी वनस्पतींचा अभ्यास
- भिषक शास्त्र विभागात सर्पदंश, रक्त मुत्रता, कासदाह याबाबत संशोधन
- पशु शल्यचिकित्सा विभागाने निर्माण केलेल्या सोप्या विविध शल्यचिकित्सा पद्धती
- पशु वंध्यत्व निवारणासाठी हमखास उपचार पद्धतीच्या संशोधनातील शिफारसी
- औष्णिक विद्युत केंद्र मुळे प्राण्यांच्या शरिरक्रियेतील विकृतीबाबत संशोधन
- विभागातील जमीन, चारा आणि रक्तातील क्षारांचे प्रमाण नोंदण्याचा अभ्यास
- महाविद्यालयातील शरीर रचना विभागाचे विविध प्राण्यातील अस्थी संकलन संग्रहालय
- डॉ. उमेश शास्त्री संग्रहालयातील अत्यंत दुर्मीळ असे पशू परोपजीव नमुने संकलन

पशुवैद्यक सेवेचे माहेरघर

महाविद्यालयाच्या सुसज्य पशू सर्वचिकित्सालयातील रोग निदान व उपचाराची सोय यामुळे मराठवाडा विभागातील पशुवैद्यक सेवेचे माहेरघर म्हणून महाविद्यालयाची ओळख निर्माण झालेली आहे. रोग निदान उपचाराच्या अत्याधुनिक पद्धती आजारी पशुधनाबाबत राबवल्या जात असताना महाविद्यालयातर्फे विभागातील पशुधनासाठी रोग संसर्गाच्या काळात, आपत्कालीन परिस्थितीत आणि अत्यावश्यक अपघाती प्रसंगी फिरत्या पशुवैद्यक चमूची सेवा निरंतर कार्यरत आहे.

महाविद्यालयातील हरित सुशोभीकरण, सौर ऊर्जा वापरातून विद्युत बचत, परिसर सुशोभीकरण, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त परिसर, स्वच्छता अभियान, शिस्तप्रिय विद्यार्थी वर्ग आणि पशू प्रक्षेत्रावरील अत्याधुनिक यंत्रणा यामुळे महाविद्यालयास भेट देणाऱ्या पशुपालक आणि नागरिकांना सामाजिक नीतिमूल्यांचा सूचक संदेश देण्याचे काम सुरू आहे. महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीची कलात्मक रचना, व्याख्यानग्रहांची अद्वितीय मांडणी व त्यास स्मार्ट यंत्रणेची जोड यासह महाविद्यालयात लाभलेल्या ग्रंथालय आणि वसतिगृहांच्या आकर्षक इमारती या संस्थेतील शिक्षणासाठी पूरक वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

महाविद्यालयाचा गत ५० वर्षांचा कार्यकाळ स्पृहणीय असला तरी भविष्यात या महाविद्यालयाने आपले उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे अवलंबण्यासाठी आणि पशुधन विकास सक्षम करण्यासाठी संकल्प केला आहे. महाविद्यालयाचे https://covaspbn.co.in हे संकेतस्थळही तयार करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे करा पर्यटन

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या पर्यटन भेटीत आपल्याला महाविद्यालयाची सुंदर आणि कलाविश्व रचनेची इमारत व भव्य परिसर आकर्षित करेल. त्याचबरोबर स्मार्ट व्याख्यान ग्रहातील प्रेक्षागृह रचनेची सुविधा, विविध १८ विभागातील नावीन्यपूर्ण संग्रहालय व केंद्रीय मान्यताप्राप्त प्रयोगशाळा प्राणिग्रह, सुवर्णजयंती सभागृह, जैवतंत्रज्ञान विभाग आणि कामधेनू कक्ष, देशातील सर्वात आधुनिक डिजिटल क्ष-किरण यंत्रणा, अद्ययावत पशुचिकित्सालय, पशु रुग्णवाहिका, निरंतर पशु रुग्णसेवा, पशु रोगनिदानाच्या सुसज्ज प्रयोगशाळेतून विभागातील नमुन्यांची पडताळणी, सुसज्ज ग्रंथालय, पशू प्रक्षेत्रावरील शुद्ध वंश, पशुखाद्य कारखाना, मुक्त संचार व्यवस्थापन आणि चारा संग्रहालय, मांसल पक्षी गृहे, विविध पक्षी गृहे आणि स्वयंचलित पक्षी - पशुमांस निर्मिती गृह, २०० एकरचा रमणीय, सुशोभित, नयनरम्य आणि हरित शांतीवन परिसर पाहण्याजोगा व माहिती करून घेण्याजोगा आहे.

(लेखक परभणी येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता आहेत.)

आपल्या उक्ती आणि कृतीतून समाजाला प्रबोधनाच्या मार्गावर नेणाऱ्या संत गाडगेबाबा यांची २३ फेब्रुवारी रोजी जयंती आहे. समाजाला दशसूत्री देऊन त्यातून एक सशक्त समाजनिर्मितीसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. राज्य शासनाने गाडगेबाबा यांच्या दशसूत्रीचा अंगीकार केला असून त्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत विकास नेला जात आहे.

समाजनिर्मितीची रूपरेषा

प्रा. डॉ. मोना चिमोटे

विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेत एक परिणामकारक कृतिशील व्यक्तिमत्त्व म्हणजे संत गाडगेबाबा होत. गाडगेबाबांची खरी ओळख ही चिंध्या पांघरणारा, हाती खराटा घेऊन स्वच्छतेचे व्रत सांभाळणारा नि आपल्या कीर्तनातून सर्वसामान्यांना अंधश्रद्धा, कर्मकांड यांपासून मुक्त करू पाहणारा एक लोकोत्तर पुरुष! सामाजिक परिवर्तनासाठी 'स्वच्छता' आणि 'कीर्तन' या दोन प्रबोधन उपक्रमांचा उपयोग त्यांनी केला. गाडगेबाबांचे तसे औपचारिक शिक्षण झाले नव्हते. घरची अत्यंत प्रतिकूल परिस्थिती त्यास कारणीभूत होती, असे असले तरी गाडगेबाबांनी विविध पद्धतीने व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांसाठी आपल्या जीवनकार्यातून एक तत्त्वज्ञान देऊ केले.

युगनिर्माता संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे झाला. झिंगराजी जानोरकर हे त्यांच्या वडिलांचे नाव! तर सखुबाई ही त्यांची आई. गाडगेबाबांचे लहानपणचे नाव डेबू! त्यांच्या व्यसनाधीन-अंधश्रद्धाळू वडिलांचा १८८४ मध्ये मृत्यू झाला. त्या वेळी गाडगेबाबांचे वय अवघे सात वर्षांचे होते. वडिलांच्या मृत्यूनंतर गाडगेबाबांचे मामा चंद्रभान यांचे घरी त्यांचा पुढील जीवन प्रवास सुरू झाला. गाडगेबाबांचा कामसूपणा आणि प्रामाणिकपणा त्यांच्या गुरे राखणीपासून तर शेती करण्यापर्यंत ठायी ठायी दिसून येई. १८९२ मध्ये त्यांचे कुंदाबाईसोबत लग्न झाले. काही दिवसांनी मामाची शेती सावकाराने गिळंकृत करण्याचा प्रसंग त्यांच्यावर ओढवला. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी व झालेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी डेबुजीने अपार कष्ट घेतले. बाबांना आलोका व कलावती या दोन मुली तर मुद्गल आणि गोविंद अशी दोन मुले होती. १९०५ मध्ये त्यांनी कोणत्याही पाशात न अडकता गृहत्याग केला. त्यानंतर आयुष्याची ५० वर्षे व्रतस्थपणे त्यांनी जनसेवेत घालवली.

'बुडती हे जन न देखवे डोळा।
म्हणोनी कळवळा येत असे।'

या भावनेतून त्यांनी समाजाला दिशा दिली. गाडगेबाबांची दशसूत्री प्रसिद्ध आहे. त्यामध्ये समाजकल्याणाची एक रूपरेषा आपल्याला प्रतीत होते.

१) भूकेलेल्यांना : अन्न, २) तहानलेल्यांना : पाणी, ३) उघड्यानागड्यांना : वस्त्र, ४) गरीब मुला-मुलींना:शिक्षण, ५) बेघरांना : आसरा, ६) अंध, पंगू, रोग्यांना: औषधोपचार, ७) बेकारांना : रोजगार, ८) पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना : अभय, ९) गरीब तरुण-तरुणींचे : लग्न, १०) दु:खी व निराशांना : हिंमत.

अशी ही गाडगेबाबांची दशसुत्री म्हणजे कल्याणकारी राज्याच्या गुणवैशिष्ट्यांचाच भाग जाणवते.

समाजातील सुस्थितीत लोकांकडून इतर दुर्बल लोकांसाठी कार्य करण्याची ते जशी अपेक्षा व्यक्त करतात तशीच अपेक्षा ते शासनाकडूनही करतात.

या दशसूत्रीतील गर्भित अर्थ खऱ्या

अर्थाने मानवी विकासाचा निर्देशांक कसा वाढवता येईल, याचे दिग्दर्शन करतो.

भुकेलेल्यांना : अन्न

या मूलभूत सूत्राकडे त्यांनी समाजाचे लक्ष वेधले. देशातील कुणीही माणूस हा भुकेने मरू नये, याकरिता बाबांनी मांडलेला विचार अनेकांनी स्वीकारला. शासनाने देखील 'शिवभोजन योजना' च्या माध्यमातून हे सूत्र अंगिकारले आहे. आज राष्ट्रीय स्तरावरती सुमारे ८० कोटी नागरिक हे मोफत शिधा प्राप्त करत असून त्यातून त्यांना मोठा आधार मिळत आहे. सरकारने या कायद्यांच्या माध्यमातून उचललेले पाऊल व केलेले प्रयत्न म्हणजे आज कोणीही गरीब उपाशी राहणार नाही, असेच म्हणावे लागेल.

तहानलेल्यांना : पाणी

गाडगेबाबा ज्या वेळी समाजप्रबोधनाचे काम करत होते, त्या काळी पाण्याचे दुर्भिक्ष होते. विशेषत: स्त्रियांची होणारी भटकंती व गुंड - घागरी घेऊन त्यांची होणारी पायपीट, हे सार्वत्रिक चित्र होते. 'जल हेच जीवन' याचे महत्त्व सांगत असताना प्रत्येक माणसाला पाणी मिळायला हवे व तेही शुद्ध असावे, या गाडगेबाबांच्या संकल्पनेलाच केंद्र व राज्य शासनाने आपल्या धोरणांमध्ये अंगीकृत करून 'गाव तेथे पाणी पुरवठा योजना' राबवली जात आहे.

उघड्यानागड्यांना : वस्त्र

आज 'माणुसकीची भिंत' यासारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून अनेक उपयोगी कपड्यांचे दान दिले जाते आहे. गरजूंनी तेथून कपडे घेऊन आपली निकड भागवावी, अशी अपेक्षा त्यामागे आहे. शिवाय अनेक सेवाभावी संस्थामार्फत मोफत कपडे, ब्लँकेट्सचे वाटप केले जाते. यासारख्या उपक्रमांना बळ देण्यासाठी लोकमानसात सेवाभावी वृत्ती व दानत वाढवणे गरजेचे आहे. ज्यातून गरीब व उपेक्षित जनतेची वस्त्रांची गरज भागवली जाऊ शकते.

गरीब मुला-मुलींना : शिक्षण

गाडगेबाबा शिक्षणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सतत कीर्तनातून संदेश देत. अज्ञानामुळे होणाऱ्या नुकसान व शोषणाचे अनेकअंगी पदर ते उलगडून दाखवीत

आज शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणात राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्तींमुळे व वसतिगृहांच्या प्रशस्त व्यवस्थांमुळे समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयीचे झाले आहे. तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी शासनाद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य व प्रोत्साहन दिले जाते आहे.

आजच्या संदर्भात बाबांनी अपेक्षिलेला शिक्षित समाज हा केवळ शालेय शिक्षणापुरता मर्यादित नसून समाजातल्या उन्नत व विकसित घटकांच्या बरोबरीने उपेक्षित व मागास समाजाला शिक्षित करणे, असाच आपल्याला घ्यावा लागेल. त्या दृष्टीने शासनासोबतच समाजानेही कार्य करणे आज गरजेचे आहे.

बेघरांना : आसरा

बाबांना अभिप्रेत असलेली जी संकल्पना होती, त्यामध्ये कुडाच्या, तुटक्या-फुटक्या घरांमध्ये राहणारी श्रमिक माणसे, उघड्यावर संसार करणारी कुटुंबे यांना किमान हक्काचे छप्पर मिळावे, ही होती.

रानावनात भटकंती करणारी, स्थलांतरित माणसे यांना स्थायित्व मिळावे आणि देशाचे नागरिक म्हणून किमान जगण्याची पूर्तता व्हावी, याकरिता गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून सातत्याने मांडणी करत.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या उघड्या पडलेल्या माणसांना हक्काचे निवारे देण्यासाठी केंद्र शासनाने अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या. ज्यामध्ये 'लोक आवास योजना', 'वाल्मिकी आंबेडकर आवास योजना', 'प्रधानमंत्री घरकुल योजना', 'महाराष्ट्र हाऊसिंग ॲण्ड एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटी (म्हाडा) यांचा समावेश आहे. आजही केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये होणारी कोट्यवधी रुपयांची तरतूद ही बाबांच्या दूरदृष्टी व समाजभानाला अधोरेखित करणारी आहे.

गाडगेबाबांनी स्वच्छतेचे महत्त्व लहानपणीच हेरले होते नि अंगी बाणले होते. सार्वजनिक अस्वच्छतेतून साथीचे रोग, प्रदूषण आणि गलिच्छपणा या समस्यांना सामोरे जावे लागते हे , त्यांनी आपल्या भ्रमंतीतून टिपले होते. त्यामुळे स्वच्छतेचे महत्त्व लोकांच्या मनावर बाबा बिंबवत असत. त्यासह लोकांच्या मनातील आरोग्यविषयक अंधश्रद्धाही बाबा निपटून काढत.

रोग्यांना : औषध

या सूत्राच्या परिपूर्तीसाठी बाबांनी मुंबई-पुण्यासारख्या शहरांत दवाखान्यांजवळ धर्मशाळा बांधल्या. गरीब स्त्रियांसाठी प्रसूतिगृहे - दवाखाने बांधले, ते आरोग्यविषयक जाणिवेतूनच!

कॉलरा कुणाच्या अवकृपेने होतो, यावर बाबांचा मुळीच विश्वास नव्हता. तो केवळ अस्वच्छतेने होतो, हे त्यांना पक्के ठाऊक होते. त्यामुळेच यात्रेच्या ठिकाणी ते सावध असत व लोकांनाही सावध करत.

बाबांच्या विचारांचा मोठा प्रभाव हा धोरणकर्त्यांवरही पडलेला आपल्याला आज दिसून येतो आहे. गाडगेबाबांच्या सेवाभावीवृत्तीतून पेरलेल्या संस्कारामुळे व शासनाच्या प्रोत्साहनामुळे आज संपूर्ण महाराष्ट्रात गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबवले जात आहे. त्याला खेड्यातीलच नव्हे, तर शहरी लोकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो आहे. ६०-७० वर्षांपूर्वी

पेरलेल्या या संस्कारांना आज अभियानाच्या रूपाने देखणेपण मिळाले आहे. 'स्वच्छता' या शाश्वत संस्कराचा वसा जपणाऱ्या कर्मयोगी गाडगेबाबांचे नाव या अभियानास शासनाने देऊन एका परीने त्यांचा गौरवच केला आहे.

समाजातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोगमुक्त अपंग व्यक्तींच्या अपंगत्वाकडे न बघता त्यांच्यातील सामर्थ्य ओळखून, त्यांच्या सुप्त गुणांना विकसित करून त्यांना जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी द्यावी व त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय तसेच इतर विविध विभागांमार्फत कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. शिवाय सामाजिक सुरक्षितेसाठी अपंगांना काही क्षेत्रांमध्ये आरक्षण, सवलती, सूट व प्राधान्य देण्यात आले आहे. या सर्वांचा उद्देश अपंग व्यक्तींना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे हाच आहे. त्यापुढे जाऊन शासनाने तर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्षिक अर्थसंकल्पातील ५ टक्के रक्कम ही दिव्याग्यांच्या साहाय्यासाठी राखीव ठेवण्याची सक्ती केली आहे. यातून फार मोठा आर्थिक आधार त्यांना मिळतो आहे. गाडगेबाबांच्या विचारांचे हे एक मोठे यश आहे, असे म्हणता येईल.

पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना : अभय

पशु-पक्षी-मुके प्राणी हे सुद्धा सृष्टीचे अविभाज्य घटक असून माणसांप्रमाणेच त्यांनासुद्धा जगण्याचा समान अधिकार आहे, ही गोष्ट ७०-७५ वर्षांपूर्वी बाबा मांडत होते. त्याकरिता अंधश्रद्धेवर आधारलेल्या पशुबळी- नवस-सायास यांचा बाबांनी कडाडून विरोध केला. लक्षावधी लोकांना त्यापासून परावृत्त केले. आतातर केंद्र शासनाने व राज्य शासनाने पशुहत्या बंदीसारखे अनेक कायदे केले असून मुक्या जनावरांना वेदना देणाऱ्या कृती केल्या आहेत.

अशिक्षित असणाऱ्या गाडगेबाबांना आज प्रगत राष्ट्र मांडत असलेल्या जैवविविधतेच्या साखळीची महती उपजतच ठाऊक होती, ही बाब त्यांच्या असामान्यत्वाची प्रचिती देणारी आहे.

गरीब तरुण-तरुणींचे : लग्न

समाजातील हजारो गरीब तरुण-तरुणींचे लग्न होऊन, त्यांनी सुखाचा संसार करावा, असे गाडगेबाबांना वाटत असे. एकीकडे समाजात श्रीमंत व आर्थिकदृष्ट्या सबल लोकांच्या कुटुंबातील लग्ने उत्साहाने व थाटामाटात पार पडत. त्यांचे अनुकरणातून गरीब लोकं अनेकदा कर्ज काढून लग्न - समारंभ साजरे करत. कित्येक गरीब तरुण-तरुणींच्या पाल्यांजवळ पैसाच नसे. त्यामुळे ते विवाहादींपासून वंचित राहत. कर्जबाजारी होऊन लग्न करू नका, ही बाब आपल्या कीर्तनातून बाबा सतत मांडत असत.

आज शासनाने गरीब व गरजू कुटुंबातील तरुण मुला-मुलींची लग्न करण्यासाठी विविध

योजना जाहीर केल्या आहेत. ज्यांमधून लक्षावधी विवाहसोहळे सामूहिकपणे संपन्न होत आहेत. या कार्यक्रमांमधून संपन्न होणाऱ्या सोहळ्यांमध्ये जाति-पातीची कुठलीही बंधने नसून, एकाच मांडवाखाली विविध जातींच्या जोडप्यांचे विवाहसोहळे हे सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून 'जाति-पाती विरहित समाज' या संकल्पनेला खऱ्या अर्थाने मूर्तस्वरूप मिळाले असून ते बाबांना अपेक्षित असलेल्या समाज निर्मितीच्या दिशेने पुढे नेणारे आहे .

बेकारांना : रोजगार

प्रत्येकाने शिक्षण घ्यावे, शारीरिक श्रम करावे, रोजगार मिळवावा, असे बाबांना वाटे. कुठलेही श्रम कमी प्रतीचे नसतात, प्रामाणिकपणे शिस्तबद्ध पद्धतीने नियोजित कामे करून त्या कामांना प्रतिष्ठा मिळवून देता येते, असे त्यांचे परखड मत होते. बाबांच्या विचारांना पुढे नेणारे आणखी एक महत्त्वाचे पाऊल शासनाने उचललेले आपल्याला दिसते.

गरीब व बेरोजगारांना रोजगार मिळावा, या हेतूने शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ नुसार दोन योजना सुरू केल्या.

१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना. २) वैयक्तिक लाभाच्या योजना.

शासनाच्या या योजनांमधून बेकारांना रोजगार मिळण्यासाठी प्रयास केले जात असतानाच मानवी संसाधनाच्या निर्मितीसाठी व आजच्या स्पर्धेमध्ये आवश्यक असणारे कौशल्य विकसित करणारे विविध अभ्यासक्रम राबवले जात आहेत.

रोजगार आणि स्वयंरोजगार यांच्या माध्यमातून श्रमाला प्रतिष्ठा देणारी व आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर तरुणांची पिढी निर्माण, व्हावी हा यामागील उद्देश आहे. यातून बेरोजगारी व आर्थिक कुचंबना निश्चितपणे संपुष्टात येईल. गाडगेबाबांच्या 'बेकारांना : रोजगार' आणि 'दुःखी व निराशांना : हिंमत' या दोन्ही सूत्रांच्या पूर्ततेसाठी या योजना व धोरणे निश्चितच उपयुक्त ठरणारे असून मानसिक व शारीरिकदृष्ट्या अत्यंत सुदृढ असा समाज आपण याद्वारे निर्माण करू शकणार आहोत.

बाबांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक न्यायाच्या प्रत्येक समस्येवर विविध योजना शासनाकडून राबवल्या जात असल्या व समाज उन्नतीची सर्व जबाबदारी शासनाची असली तरी प्रत्येक नागरिकाने ती नैतिक कर्तव्य म्हणूनही निभावणे जरूरी आहे. आपण या दृष्टीने येणाऱ्या काळात कार्य करत राहू, हीच खऱ्या अर्थाने बाबांना आदरांजली ठरेल!

प्राध्यापक व विभागप्रमुख पदव्युत्तर मराठी विभाग,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

आपद्ग्रस्तांना मदत, शेतकऱ्यांना दिलासा

गेल्या दोन वर्षांतील कोरोना प्रादुर्भाव नियंत्रण उपाययोजना, चक्रीवादळे, अतिवृष्टी, पूर, गारपीट या आपत्तींच्या नुकसान भरपाईकरिता १२ हजार ४४० कोटी रुपयांचे वितरण.

- आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा कोरोना प्रादुर्भाव नियंत्रणासाठी राज्यात प्रभावी वापर.
- कोरोना नियंत्रणासाठी १ हजार ७२९ कोटी रुपयांचा निधी वितरित.
- कोरोनाने निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकांस ५०,००० रुपये सानुग्रह साहाय्य,त्यासाठी ९५३ कोटी रूपयांची तरतूद, आतापर्यंत १ लाख १० हजार पेक्षा जास्त नातेवाइकांना मदत. (mahacovid19relief.in)
- कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरिता व गर्दीच्या सनियंत्रणासाठी देशात सर्वप्रथम ब्लॉक चेनचा वापर. क्यूआर कोड व फोटो सोबत युनिव्हर्सल पास सुविधा सुरू .
- चक्रीवादळाची पूर्वसूचना प्राप्त होताच युद्धपातळीवर ७ हजार मच्छीमार आणि ७६ हजार नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतरण.
- रत्नागिरी,रायगड,सातारा जिल्ह्यांतील दरडी व भूस्खलनाच्या ठिकाणी तात्काळ मदत व बचावकार्य.
- दुर्घटनेमधील मृत व्यक्तींच्या वारसांना तत्काळ मदत.
- कोकणातील भूमिगत वीज वाहिनीसाठी ११०० कोटींची तरतूद.
- राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत (NCRMP) रायगड जिल्ह्यात खार प्रतिबंधक बंधाऱ्याचे सक्षमीकरण.
- अलिबाग,रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथे भूमिगत वीज वाहिनी टाकण्याच्या कामाला गती.
- आपत्तीमुळे जनजीवन विस्कळीत होऊ नये तसेच वित्तीयहानीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी राज्यात कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प, या प्रकल्पासाठी ३ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद.
- पूरप्रवण जिल्ह्यांसाठी ११६ बोटींची खरेदी.
- आपत्तिग्रस्तांना जलद मदतीसाठी आपत्ती पूर्वसूचना प्रणाली Early Warning System (EWS) करणार.
- नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था स्थापन करणार.
- आपद्ग्रस्त शेतकरी, दुकानदार, मुर्तिकार, टपरीधारक यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा वाढीव दराने भरीव मदत.

जुलै २०२१ मध्ये पूरबाधित क्षेत्रातून ४ लाख ३७ हजार ७३१ नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर. ३४९ निवारा केंद्रांमध्ये ५० हजार नागरिकांची सोय.

आपत्ती कालावधीत जलद प्रतिसाद, शोध व बचाव कार्य करण्यासाठी १८ शीघ्र प्रतिसाद वाहनांची खरेदी.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री, महसूल

श्री. विजय वडेट्टीवार
मा. मंत्री, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन

श्री. प्राजक्त तनपुरे
मा. राज्यमंत्री, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: दीपक कपूर